**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 376/2007.**

1) श्री राधेलाल जगलालसावजी पालेवार
रा.56, एम.एस.ई.बी.कॉलनी, राजगोपालाचारी वार्ड
भंडारा ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
गोंदिया मंडळ, ता. जि. गोंदिया

2) जन माहिती अधिकारी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
गोंदिया सर्कल, ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 14/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 3.10.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी म्हणून अधिक्षक अभियंता गोंदिया सर्कल एम.एस.ई.डी.सी.एल.गोंदिया यांचेकडे खालिल माहिती मागितली होती.

1) Reason for non-reasele of my claims of temporary adcances as per enclosed list and which were closed a year ago when I was working as Asstt. Engineer, Tiroda Sub Division. Whereas such claims of my other colleagues had been released timely and this can be ascertained from the records of temporary advances of C.C.O. & M Division, Gondia.

2) Date of release of claims.

सदरच्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी दि. 23.12.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती अधिकारी यांनी दिनांक 13.10.2006 रोजी कार्यकारी अभियंता यांचेकडे माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्राने कळविले होते. परंतु दिनांक 9.11.2006 रोजी कार्यकारी अभियंता गोंदिया यांनी माहिती अधिकारी अधिक्षक अभियंता गोंदिया सर्कल यांना पत्राने असे कळविले की डिव्हीजनल अकाऊंटंट हे दि. 4.10.2006 ला हजर झालेत आणि संबंधित लिपीक वैद्यकिय रजेवर असल्यामुळे माहिती शोधणे कठीण आहे तरी मुदत वाढवुन द्यावी. पुन्हा दि. 28.12.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता गोंदिया ओ. ॲन्ड एम. डिव्हीजन यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबद्यल पुन्हा एक पत्र दिलेले दिसुन

येते. दि. 25.1.2007 रोजी कार्यकारी अभियंता गोंदिया यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्याचा पत्रव्यवहार दिसुन येत आहे. परंतु अपीलकर्ता यांना दि. 25.1.2007 रोजीच्या पत्राची प्रत माहिती स्वरुपात पाठविलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी माहितीच्या अधिकाराच्या अर्जात माहिती मागितली होती त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही. परंतु अपीलकर्ता यास मिळालेल्या माहितीचासुध्दा त्यांनी उल्लेख आज दि. 3.9.2007 च्या खुलाशात सुध्दा केलेला नाही. तसेच दि. 14.2. 2007 रोजी जे द्वितीय अपील दाखल केलेले आहे त्या द्वितीय अपीलात सुध्दा मिळालेल्या माहिती बद्यल उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता सुध्दा मिळालेली माहिती लपवित आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. आता मात्र तोंडी त्यांनी मागितलेली माहिती ही त्यांना मिळालेली माहिती नाही असे ते सांगत आहेत. या सर्व प्रकरणाचा विचार केला असता असे दिसून येते की मुळात माहिती ही कार्यकारी अभियंता ओ. ॲन्ड एम. डिव्हीजन गोंदिया यांचेकडे उपलब्ध होती परंतु अपीलकर्ता हे त्याच ठिकाणी पुर्वी नोकरीस असुनसुध्दा व त्यांना माहिती कोणत्या माहिती अधिका–याकडुन उपलब्ध आहे ही बाब माहिती असुनसुध्दा व दि. 3.10.2006 रोजी माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी हे त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणात नियुक्त केले असुनसुध्दा त्यांनी अधिक्षक अभियंता ओ. ॲन्ड एम. सर्कल यांचेकडे माहिती मागितलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनीसुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे पालन केले आहे असे दिसुन येत नाही. अपीलाच्या सुनावणीस सुध्दा कागदपत्रे दाखल करतांना निर्णयाला सुरुवात होईपर्यंत त्यांनी कागदपत्रे दाखल केलेली दिसून येत नाही. व खुलाशा मध्ये आवश्यक असल्यास मागणीनुसार सादर करता येतील असे म्हटले आहे. याचा अर्थ आयोगालाच या पूर्ण कागदपत्राची गरज आहे माहितीची गरज आहे असा होतो. या एकुणच संपूर्ण प्रकरणात दोनही बाजुंनी अधिनियमाच्या तरतुदींचे पालन झालेले नाही हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. असे असले तरी माहिती अधिकारी

यांचे कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्न जरी झालेले असले तरी ते प्रयत्न हे दिशाहीन आहे. अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे उत्तर दिले असते तरी अशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्रव्यवहार करावयाची गरज नव्हती. त्यामुळे अर्जदारास माहिती मिळुनसुध्दा त्यांनी मागितलेली माहिती मिळालेली नाही असे म्हणवयाची संधी मिळालेली दिसून येते. तरीसुध्दा अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 3.10. 2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. मात्र दोनही बाजुंनी अधिनियमाच्या तरतुदींचे पालन केलेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांची दंडाची विनंती मान्य करता येणार नाही. मात्र सार्वजनिक प्राधिकरणामध्ये माहितीच्या अधिकारातील अर्जाच्या हाताळणीबद्यल जो गलथानपणा दिसुन येतो त्याबाबत मुख्य अभियंता एम.एस.ई.डी.सी.एल. नागपूर (ग्रामीण) यांनी याबाबत दखल घेणे आवश्यक आहे व संबंधितांच्या त्यांच्या सेवा नियमाप्रमाणे चौकशी करणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्या संपूर्ण अधिपत्याखालील कार्यालयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीच्या बद्यल प्रशिक्षण देणे याबद्यल त्यांनी तजविज करणे आवश्यक आहे. जेणेकरुन संबंधित प्रकरणातील अर्जाच्या हाताळणीच्या संदर्भात जो गलथानपणा दिसुन येतो तो यापुढे दिसुन येणार नाही.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दि. 3.10.2006 च्या अर्जात मागितलेल्या प्रमाणे माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 8 दिवसात माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन रजिस्टर पोष्टाने अपीलकर्ता यांचेकडे पाठविण्यात यावा.

2) मुख्य अभियंता, (ग्रामिण) एम.एस.डी.सी.एल. नागपूर यांनी सदरच्या बद्यल दखल घेवून योग्य ती कारवाई करावी व तसा अहवाल आयोगाकडे पाठविण्यात यावा. कारवाई करण्याच्या करीता सदरच्या निर्णयाची प्रत पोष्टाने मुख्य अभियंता

याचंकडे मुख्य अभियंता, (ग्रामिण) महा वितरण, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., प्रकाश भवन, गड्डीगोदाम चौक, नागपूर यांचेकडे पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 3.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 379/2007.**

1) श्री राजु किसन वानखेडे
श्रीराम वार्ड, बल्लारपूर ता. बल्लारपूर
जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री एम. एस. वैद्य
उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपूरी

2) जन माहिती अधिकारी
श्री सुनिल कोरडे
तहसिलदार, नागभिड जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 22/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 9.5.2006 रोजी श्री रविंद्र वसंत मेश्राम यांच्या दिनांक 5.7.1990 च्या जात प्रमाणपत्राची सत्यप्रत मागितली होती. नोंदणीकृत टपालाव्दारे घेणार असे नमुद केले होते. परंतु विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे दि. 17.6.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 20.6.2006 रोजी अपीलकर्ता यास पत्र देवून दि. 6.6.2006 रोजी सुनावणीस

उपस्थित राहण्यास कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे दि. 6.7.2006 रोजी अपीलकर्ता यांनी त्यांचे कथन दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचा निर्णय दि. 8.8.2006 रोजी दिलेला दिसुन येतो. व त्यामध्ये सदर दस्तऐवज शोधण्याचे काम अजुन पर्यंत सुरु असून ते दस्तऐवज आता पर्यंत सापडलेले नाही. तहसिलदार नागभिड यांचे म्हणणे आहे की सदर रेकॉर्ड 16/17 वर्षापूर्वीचा जुना असल्यामुळे शोधण्यास वेळ लागेल व रेकॉर्डचा शोध घेणे सुरु आहे. रेकॉर्ड उपलब्ध होताच पुरविण्यात येईल. तहसिलदार नागभिड यांचा हेतु माहिती न देण्याचा नाही मुद्यास धरुन अपील खारीज करण्यात येत आहे असे कळविले होते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 9.5.2006 रोजीच्या अर्जातील मागितलेली माहिती ही वास्तविक त्रयस्थ पक्षाची माहिती आहे. अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे छाननी करुन कलम 11 प्रमाणे निर्णय द्यावयास पाहिजे होता. परंतु तसे न करता रेकॉर्ड शोधुन माहिती उपलब्ध करुन देणे ते प्रथम अपीलामध्ये तहसिलदार यांचे म्हणणे मांडण्यात आलेले आहे तसेच दरम्यान दि. 7.8.2006 रोजी सदरहु प्रकरणाला जवळ जवळ 15 ते 16 वर्षाचा कालावधी झालेला असून अर्जात सदरहु माहिती मागण्याचा उद्येश स्पष्ट केलेला नाही. त्याचप्रमाणे सदरहु माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6 (2) अन्वये अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे असे उत्तर दिलेले आहे. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे माहितीचा अर्ज आल्याच्या नंतर त्याची छाननी करुन अधिनियमाच्या निरनिराळया तरतुंदींप्रमाणे अपीलकर्ता यास उत्तर द्यावयास पाहिजे असते. व अशा प्रकारचे उत्तर देवून सुध्दा मागितलेली माहिती ही मुदतीत पुरविण्याचा प्रयत्न करावयाचा असतो. मुदतीच्या शेवटच्या दिवशी किंवा मुदत संपल्यानंतर अशा प्रकारची माहिती देता येत नाही किंवा सापडत नाही हे उत्तर देणे योग्य नाही. अर्ज आल्याच्या नंतर साधारणतः

3/4 दिवसामध्ये अपीलकर्ता यास अडचणी कळविल्यास माहिती देण्याची टाळाटाळ करीत नाही किंवा माहिती देण्यास नकार देत नाही असा निष्कर्ष काढता येतो. असे असले तरी सदरची माहिती जुनी असल्यामुळे शोध घेण्यास वेळ लागण्याचा संभव असतो हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. तसेच उपविभागीय अधिकारी ब्रम्हपूरी यांनी दाखल केलेल्या आदेश प्रतीच्या प्रतींवरुन जी वेळोवेळी निरनिराळया तारखांना टिपणी केलेली आहे त्यावरुन माहिती देण्याची टाळाटाळ करीत आहे असे दिसुन येत नाही. आजही सदरची नस्ती उपलब्ध झालेली नाही असे माहिती अधिकारी तथा तहसिलदार नागभिड यांचे म्हणणे आहे. तसेच माहिती जुनी असल्याने माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन न देण्यात त्यांचा वैयक्तिक आकस किंवा स्वार्थ असल्याचे कारण दिसून येत नाही. त्यावर त्यांनी असेही सांगितले की अपीलकर्ता यांनी जे जात प्रमाणपत्र मागितलेले आहे तहसिलदार यांनी निर्गमित केलेले असल्यामुळे आता त्याचा तसा उपयोग नाही. आता जातीचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार हा उपविभागीय अधिकारी यांना असल्यामुळे त्याचे प्रमाणपत्र हे वैध धरण्यात येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना श्री मेश्राम यांचेकरीता नविन प्रमाणपत्र हवे असल्यास ते त्यांना तातडीने उपलब्ध करुन देवू शकतात.

## नि र्ण य

1) अपीकर्ता यांनी मागितलेली जातिचे प्रमाणपत्राची प्रत ही मुळ नस्ती शोध घेवूनही मिळत नसल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही असे माहिती अधिकारी यांचे म्हणणे असल्याने सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 3.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 381/2007.**

1) श्री अरुणपाल सिंग बेहल
17, गुरुनानकपूरा,
नगपूर 440 017 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री बी. आर. लूंगे
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
नागपूर

2) जन माहिती अधिकारी
श्री र. ना. होतवानी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.3
सिव्हील लाईन्स नागपूर. ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 19/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 29.6.2006 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे खालिलप्रमाणे माहिती मागितली.

Construction of Ring Road from Gausi Manapur on N.H.7 to Gondkheri on N.H.6.

a) Construction of Kms 6/00 to 9/500

b) Construction of Kms 9/500 to 13/000.

c) Construction of Kms 13/000 to 22/281

1. What was the date of work order of the above three works?

2. When did the works actually commence?

3. As per tender conditions within how many days of the work order the hot mix plant and the pug mill plant were to be installed within the required distance?

4. Have the required plants been installed and commenced within the prescribed limit?

5. If no, whether additional security has been forfeited?

सदरची माहिती स्पिड पोष्टने घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी दि. 28.7.2006 रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10. 8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 21.9.2006 रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांनी तपशिलात माहिती देण्याचा आदेश करण्यात आला होता. त्याप्रमाणे दि. 4.10.2006 रोजी अपीलकर्ता यास पुन्हा माहिती करुन दिलेली होती. परंतु सदरच्या निर्णयाने पुन्हा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे द्वितीय अपील सादर केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 मधिल ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात साहित्याच्या

स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती, त्यामध्ये उपलब्ध अभिलेखे, दस्तऐवज इत्यादी स्वरुपात माहिती देण्याची तरतूद आहे कोणत्याही प्रकरणामध्ये माहिती अधिका–यांचे अभिप्राय येतिल अशा प्रकारचे प्रश्न विचारणे अपेक्षित नाही. असे असले तरी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संक्षिप्त असली तरी विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलातसुध्दा पुन्हा सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश झालेले आहेत. हा संक्षिप्त किंवा सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रसंग प्रश्नोत्तरातील माहिती दिल्यामुळे आलेला आहे. ज्या बांधकामाविषयी अपीलकर्ता यांनी माहिती मागितली होती त्याबाबत अभिलेख्याच्या स्वरुपात माहिती अपीलकर्त्यानी मागितली असती व त्याप्रमाणे उपलब्ध करुन दिली असती तर संक्षिप्त व सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उपस्थित झाला नसता. व त्यामुळेच पुन्हा अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम जप्त करावयास पाहिजे होती अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित करुन माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे असे म्हटलेले आहे. एकुणच माहिती ही अभिलेख्याच्या स्वरुपात उपलब्ध झाल्यावर त्यातून निष्कर्ष काढून स्वतंत्रपणे योग्य त्या प्राधिकरणाकडे तक्रार करणे ही संकल्पना माहितीच्या अधिकारामध्ये आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांस विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीकर्ता यास विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये जो अतिरिक्त सुरक्षा अनामत रकमेच्या बद्यल प्रश्न उपस्थित केलेला आहे तो त्यांना स्वतंत्रपणे योग्य त्या

प्राधिकरणाकडे तक्रार करुन उपस्थित करता येईल.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 4.9.2007 ( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 384/2007.**

1) श्री लेखचंद दशरथ बनोठे

रा. कावराबांध ता. सालेकसा जि. गोंदिया 441916 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
   श्री आर. एम. तेटे
   खंड विकास अधिकारी पंचायत समिती सालेकसा
   ता. सालेकसा जि. गोंदिया

2) जन माहिती अधिकारी
   श्री एस. ए. मोहनकर
   सहा.माहिती अधिकारी पंचायत समिती सालेकसा
   ता. सालेकसा जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 13/10/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांना नोटिस मिळालेली आहे परंतु त्यांची प्रकृति ठिक नसल्याने दि. 4.9.2006 रोजी अपीलाच्या सुनावणीस हजर राहु शकत नाही व पुढिल तारीख देण्यात यावी असे दि. 30.8.2007 रोजी त्यांनी पोष्टाने आयोगाच्या कार्यालयास कळविले आहे. उत्तरवादी हजर आहेत. तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याची व माहिती उपलब्ध करुन दिली हे सिध्द करण्याची जबाबदारी ही उत्तरवादी यांची असल्याने पुढे सुनावणी घेण्यात आली.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 5.4.2006 रोजी खालील प्रमाणे माहिती माहिती मागितली आहे.

1) सदर कार्यालया अंतर्गत उपरोक्त कालावधीत कोण कोणत्या गावातील शेतक–यांनी इनवेल बोअर आणि सिंचाई विहीर योजनेचा लाभ घेतला. (वि.घ.यो. टि.एस.पी.,ओ.टि. एस.पी.,माडा व राष्ट्रीय सम विकास योजना) लाभार्थी शेतक–यांची नावे व देण्यात आलेली रक्कम सह माहिती दयावे.

2) कृषि विभागा अंतर्गत अभिकरण शुल्काचे नावाखाली रक्कम खचे केल्या जाते. त्याचे सविस्तर विवरण दयावे.

3) आपले कार्यालयाचे अधिकारी व सर्व कर्मचारी आपले मुख्यालयात राहतात काय? असल्यास ते केव्हापासून, कोणाचे घरी किती भाडा देवून राहतात.

सदरची माहिती ही व्यक्तीशः उपस्थित राहून घेणार असे त्यांनी नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यास दि. 23.5.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी पत्र दिलेले दिसून येते. सदरचे पत्र अपीलकर्ता यांस दि. 29.5.2006 रोजी मिळाले असेही त्या पत्रामध्ये नमुद केले आहे. परंतु त्याच दिवशी म्हणजे दि. 29.5.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येत आहे. व त्यात दिनांक 5.4.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नाही असे नमुद केले आहे. सदरच्या प्रथम अपीलीची सुनावणी दि. 1.11.2006 रोजी ठेवण्यात आली होती. परंतु त्या दिवशी सुनावणी झालेली दिसून येत नाही. दि. 13.11.2006 रोजी पुन्हा सुनावणी ठेवण्यात आली होती. अर्जदार त्या ठिकाणी उपस्थित राहू शकणार नाही म्हणून त्यांनी कळविले होते. मुद्या क्र. 2 ची माहिती प्राप्त न झाल्यामुळे देता आली नाही. परंतु पूर्वीच दिनांक 16.9.2006 रोजी अपीलकर्ता यांस मुद्या क्र. 1 ची माहिती दिलेली होती. असे असल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील सादर केले.

3. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही विहीत मुदतीत दिली आहे किंवा नाही किंवा माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आलेली आहे याबाबत छाननी करणे आवश्यक असते. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही सन 2000 पासून 31 मार्च 2006 पर्यंतची सालेकसा पंचायत समितीच्या क्षेत्रातील इनवेल बोअर व सिंचाई विहीर याबद्यलची विस्तृत माहिती व कृषि विभागा अंतर्गत अभिकरण शुल्काचे नावाखाली रक्कम खर्च केली जाते त्याचे सविस्तर विवरण व अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहतात काय असल्यास ते केव्हापासून कोणाचे घरी किती भाडे देवून राहतात अशा प्रकारची व्यापक माहिती विचारली होती. माहिती व्यापक असली, विस्तृत असली व ती संकलित करतांना वेगवेगळया विभागातून संकलित करावयाची असली तरी तशा प्रकारचे उत्तर हे अर्जदारास त्यांनी अर्ज केल्या पासून 3/4 दिवसात कळवावयास पाहिजे. परंतु सदरच्या प्रकरणी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास तसे काहिही न कळवता दि. 23.5.2006 रोजी मात्र मार्च 2006 चे लेखे अद्यावत करण्याचे काम सुरु असल्यामुळे माहिती देता येणे शक्य नाही. लेखे अद्यावत होताच अनुक्रमे 1 व 2 ची माहिती पुरविण्यात येईल व मुद्या क्र. 3 च्या बाबत माहिती उपलब्ध नाही असे कळविले आहे. असे विहित मुदतीत कळविले नसले तरी दि. 7.4. 2006 रोजी कृषि अधिकारी श्री एच. एम. पोहनकर यांना संबंधित माहितीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून माहिती अधिकारी यांनी पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दि. 27.4.2006 रोजी त्यांना पत्र, स्मरणपत्र दिलेले दिसते. दिनांक 19.5.2006 रोजी कृषि अधिकारी यांनी कक्ष अधिकारी पंचायत समिती सालेकसा यांना मागितलेल्या माहिती बद्यल कळविले व त्याप्रमाणे दि. 23.5.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास कळविलेले दिसते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक 29.5.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी 1.11.2006 व 13.11.2006 रोजी ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता सुनावणीस दि. 13.11.2006 रोजी हजर राहु शकणार नाही म्हणून त्यांनी कळविले होते. परंतु त्यानंतर पुन्हा जी माहिती

उपलब्ध करुन दिलेली नव्हती त्यामुळे तिच्या संदर्भात दि. 15.7.2006 रोजी श्री एच.एम. पोहनकर कृषि अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसते. त्यानंतर पुन्हा 31.8.2006 रोजी श्री एम.एच. पोहनकर यांना पत्र लिहिलेले दिसते व त्यानंतर दि. 8.9.2006 रोजी कृषि अधिकारी यांनी सदरची माहिती कक्ष अधिकारी पं. स. सालेकसा यांना पाठविलेली दिसून येते. व त्याप्रमाणे ती दि. 16.9.2006 रोजी अपीलकर्ता यांस उपलब्ध करुन दिलेली दिसते. त्याबद्यलची पोच अपीलकर्ता यांनी दिलेली दिसून येते. पुन्हा उर्वरीत माहिती ही उपलब्ध करुन देण्याकरीता पत्रव्यवहार झालेला दिसतो. पुन्हा दि. 16.11.2006 रोजी श्री पोहनकर यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा 11 जानेवारी 1007 ला पत्र दिलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हे नुकतेच त्या ठिकाणी बदलून आले आहे. त्यांनी स्वतः सदरच्या प्रकरणात लक्ष घालून व श्री पोहनकर यांना भेटून पुन्हा माहिती उपलब्ध करुन घेवून दि. 1.9.2007 पत्र तयार करुन स्वतः दि. 2.9.2007 रोजी अपीलकर्ता यांस माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे सुध्दा आज अपीलकर्ता गैरहजर असले तरी सदरच्या अपीलाची सुनावणी घेण्यात आली. या प्रकरणात असे दिसून येते की माहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्ता यांनी अर्जात मागितलेली माहिती उपलब्ध नसली तर ती त्यांना कृषि अधिकारी यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी लागते. कृषि अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब कां लावला याबद्यल प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही सन 2000 पासून असल्यामुळे संपूर्ण तालुक्यातील ती त्या त्या नस्त्यामधून काढून तयार करावी लागते व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब हा अपरिहार्य आहे. यावरुन माहिती अधिकारी यांनी ज्यांचे सहाय मागितले आहे त्या अधिका–यानी सदरची माहिती देण्याचे टाळाटाळ केलेली दिसून येत नाही. माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता वेळोवेळी पत्रव्यवहार करुन प्रयत्न

केलेले दिसून येतात. व त्यामुळे आयोगाची अशी खात्री झाली आहे की माहिती अधिकारी हे कलम 20 प्रमाणे शास्तीस पात्र नाही. अपीलकर्ता यांना माहिती जुनी व विस्तृत असल्यामुळे माहिती पुरविण्यात विलंब झालेला आहे व झालेला विलंब समर्थनिय असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**नि र्ण य**

1) अपीकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 4.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 387/2007.**

1) श्री दिनेशकुमार बनारसीलाल अग्रवाल
मु.पो.तालुका सडक अर्जुनी
जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग,
मंत्रालय, मुंबई – 32.

2) जन माहिती अधिकारी
श्री पा. जो. जाधव
अवर सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग,
मंत्रालय, मुंबई – 32. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 30/3/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असून कोणत्याही प्रकारची अनुमती त्यांनी घेतलेली नाही व अपीलाच्या सुनावणीस आवश्यक ती कागदपत्रे दाखल केले नाहीत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 2.1.2007 रोजी 13 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 7.2.2007 रोजी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना

माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. त्या करीता अर्जदारानी माहितीच्या अर्जामध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये कारवाई केल्याबद्यलची आवक जावक रजिस्टर मधिल नोंदीची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. सदरची ही माहिती विहीत मुदतीत अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी दि. 6.2.2007 रोजी प्राप्त 13.2.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आलेली दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले आहेत.

3. अपीलकर्ता यांनी 2.1.2007 च्या माहितीचा अर्ज हा 9.1.2007 रोजी कार्यालयात प्राप्त झालेला दिसतो. व त्यामुळे अपीलकर्ता यास दि. 7.2.2007 रोजी ही माहिती विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये व्यक्तीशः घेणार असे नमुद केलेले आहे. व त्यामुळे माहिती घेण्यासाठी अपीलकर्ता यांस माहिती अधिकारी अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे प्रत्यक्ष हजर राहून माहिती घेणार असा होतो. परंतु 30 दिवसाच्या कालावधीत अपीलकर्ता हे माहिती अधिकारी यांचेकडे माहिती घेण्यासाठी व्यक्तीशः हजर झाले याबद्यलचा पुरावा दिलेला नाही. व त्यामुळे दि. 7.2.2007 रोजी माहिती अधिकारी यांनी पोष्टानी माहिती पाठविली ती विहीत मुदतीत पाठविली असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अपीलकर्ता यांनी माहिती व्यक्तीशः घेणार असे अर्जात नमुद केले असल्यावर वर नमुद केल्याप्रमाणे ते माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती घेण्यास गेले नाही असे दिसून येते तरी सुध्दा त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून दि. 6.2.2007 रोजी प्रथम अपील हे दाखल केलेले दिसून येते. मात्र सदरचे प्रथम अपील हे व्यक्तीशः दिलेले आहे किंवा पोष्टाने पाठविले आहे याबद्यलचा पुरावा दिलेला नाही. माहिती अधिकारी यांनी जरी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असेल व अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले असले तरी सदरच्या प्रथम अपीलाची दखल ही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

घेतली पाहिजे. अपील याचा अर्थ दोनही बाजुंना ऐकुन घेवून निर्णय देणे असा सोपा आहे. माहिती उपलब्ध जरी करुन दिलेली होती तरीसुध्दा प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय देणे आवश्यक होते. तसे केलेले दिसून येत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींची उल्लंघन केलेले आहे. त्याबाबत अन्न व नागरी पुरवठा विभाग यांचे प्रधान सचिव यांनी दखल घेवून त्याबाबतची योग्य ती कारवाई प्रथम अपीलीय अधिकारी यांचे बाबत करणे न्यायाचे होईल. असे असले तरी अपीलकर्ता यास विहित मुदतीत माहिती मिळालेली होती परंतु त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये मात्र कोणत्याही प्रकारचा माहिती मिळाल्याचा उल्लेख हा केलेला नाही. ही सुध्दा अपीलकर्त्याची अनियमितता आहे. यावरुन अपीलकर्ता सुध्दा आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. द्वितीय अपील मेमोमध्ये जे नमूद करावयाचे असते त्यामध्ये घटना घडलेल्या क्रमाने द्यावयाच्या असतात. परंतु सरसकट माहिती मिळाली नाही असे नमुद करुन दरम्यानच्या कोणत्याही पत्रव्यवहाराचा उल्लेख हे अपीलकर्ता करीत नाहीत. याबाबत सुध्दा माहितीच्या अधिकारातील चळवळीतील कार्यकर्ते आहेत त्यांनी अर्जदाराची व संभाव्य अर्जदारांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. अन्यथा तांत्रिक कारणावरुन अशा प्रकारचे अपील खारीज केल्यास त्याबाबत सुध्दा तक्रारीचा ओघ सुरु होईल व आयोगास काम करणे अशक्य होईल. अपीलकर्ता यास मुदतीत माहिती मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. मात्र अपीलकर्ता यांची अपेक्षा अशी दिसुन येते की त्यांनी वेळोवेळी केलेल्या तक्रारीच्या बद्यल कारवाई पूर्ण झालेली त्यांना अपेक्षित होती. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कारवाई किंवा त्याबाबतचे आदेश अपेक्षित नाही. माहिती असेल त्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे एवढेच मर्यादित माहितीच्या अधिकारात अपेक्षित आहे. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्या माहितीच्या आधारे त्यांना स्वतंत्र पणे योग्य त्या प्राधिकरणाकडे तक्रार करुन त्याबद्यलची न्याय मिळवून घेणे संयुक्ति राहिल.

**नि र्ण य**

1) अपीकर्ता यांना विहित मुदतीत माहिती मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव उप सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई – 32 यांच्याकडे प्रथम अपीलाची सुनावणी न घेतल्याच्या बाबत कारवाई करण्याच्या संदर्भात पोष्टाने पाठविण्यात यावे व त्यानंतर कारवाईचा अहवाल आयोगास 1 महिन्यात सादर करण्यात यावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 5.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील तक्रार कमांक 101/2007.**

1) श्री विश्वनाथ सुखदेवराव तोंडे
श्रा. डी/29/4 कोराडी कॉलोनी, विद्युत विहार
कॉलनी, कोराडी नागपूर. ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी
प्रबंधक,
अतिरिक्त जिल्हा ग्राहक मंच नागपूर. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

तक्रारकर्ता यांनी दिनांक 19/1/2007 रोजी` राज्य माहिती आयोगाकडे राज्य जन माहिती अधिकारी प्रबंधक, अतिरिक्त जिल्हा ग्राहक मंच यांनी त्यांच्या दिनांक 11 जुलै 2006 च्या माहिती मिळणेसाठीच्या अर्जाच्या संदर्भात माहिती मिळाली नाही म्हणून तक्रार केलेली आहे. सदरच्या तक्रारीमध्ये अतिरिक्त जिल्हा ग्राहक मंच यांनी पारीत केलेल्या आदेशाच्या अनुसार प्लॉटचे विकीपत्र होत नसल्यामुळे ते करुन मिळावे अशी त्यांची मागणी आहे. याबाबत प्रबंधक, अतिरिक्त जिल्हा ग्राहक मंच यांनी खुलासा दाखल केलेला आहे. त्याप्रमाणे तक्रारदाराचा दि. 11 जुलै 2006 चा माहिती मागितल्याचा अर्ज हा त्यांचे महिनाभराचे आवक जावक रजिस्टर तपासून पाहिले असता कोणत्याही प्रकारचा अर्ज आढळून आला नाही असे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हा प्रश्नच उदभवत नाही. मात्र आयोगाकडे तक्रारदार यांनी रजिस्टर पोष्टाच्या पावत्या सादर केली असली तरी पोच पावतीवर मात्र ग्राहक मंच कार्यालयातील कोणाचीही सही नाही. तरीसुध्दा तक्रारदाराच्या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेतली असता असे दिसुन आले की ग्राहक मंचाने आदेश पारीत केल्याच्या नंतर

जर त्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही तर त्याबाबत वारंट काढुन गैरअर्जदारास हजर केले जाते. व आदेशाप्रमाणे कारवाई करण्यास त्यास बजावले जाते. तक्रारकर्त्याच्या प्लॉटचे विक्रीपत्र करुन देण्याच्या संदर्भामध्ये तक्रारकर्त्यानी सदरच्या प्रकरणामध्ये कमिश्नर नेमलेले आहे व सदरच्या प्रकरणी गैरअर्जदार यांनी सदरची जमीन गैरकृषी नसल्यामुळे विक्रीपत्र करुन देता येत नाही असे अंडरटेकिंग दिलेले आहे. ग्राहक मंचासमोर सदरची केस अजुन सुरु आहे बंद झालेली नाही व तक्रारदार प्रत्येक तारखेस हजर असतात. तसेच त्यांनी मा. उच्च न्यायालयात सुध्दा अशीच तक्रार केलेली आहे. असे असुन सुध्दा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार करुन त्यातही प्लॉटचे विक्रीपत्र करुन देण्याच्या संदर्भात तक्रार केलेली आहे परंतु ती राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षेत येत नाही. तरी मुळातच तक्रारदाराचा माहितीचा अर्ज ग्राहक मंच यांचे कार्यालयात आढळुन येत नसल्यामुळे तक्रारदाराची तक्रार ही फेटाळण्यात येत आहे.

नागपूर

दिनांक 5.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 389/2007.**

1) श्री दिनेशकुमार बनारसीलाल अग्रवाल
मु.पो.तालुका सडक अर्जुनी
जि. गोंदिया 441807 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री पी. एस. मेश्राम
तहसिलदार, तहसिल कार्यालय सडक अर्जुनी

2) जन माहिती अधिकारी
श्री पी. एस. मेश्राम
तहसिलदार, तहसिल कार्यालय सडक अर्जुनी ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31/7/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 11.9.2006 रोजी सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक 31.7.2006 रोजी माहिती मिळण्याच्या अर्जाच्या अनुषंगाने आयोगाकडे तक्रार क्र. 2007/80/02 दाखल केली होती. सदरच्या तक्रारीची सुनावणी घेण्यात आली होती. निर्णय दि. 2.2.2007 रोजी दिला होता. तक्रार मान्य करुन अर्जदारास माहिती उपलब्ध करुन द्यावी त्याचप्रमाणे मोदी व अग्रवाल यांच्याकडून सदरची माहिती मिळत नसली

तरी त्यांचेवर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी असा निर्णय दिला होता. ही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून पुन्हा दि. 21.5.2007 रोजी तक्रारदार यांनी तक्रार केली होती परंतु सदरच्या अपीलाच्या संदर्भात आज प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार सडक अर्जुनी यांनी खुलासा दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाशा प्रमाणे जी माहिती उपलब्ध आहे ती देण्यात आलेली आहे व जी उपलब्ध होवू शकत नाही त्याबद्यल माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असा खुलासा केलेला आहे व खुलासा अपीलकर्ता यांना मान्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपील ही पूर्वी तक्रारीचा निकाल दिलेला असल्यामुळे निकाली काढण्यात यावे परंतु मार्च 2005 महिन्याची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 5.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 390/2007.**

1) श्री राधेश्याम पिसे परसरामजी काबरा
तूकूमवार्ड, शिवाजी वार्ड, बम्हपूरी रोड
मु.पो.ता. देसाईगंज जि. गडचिरोली 441207 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
श्री डब्लू. एस. मानकर
अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय गडचिरोली ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 26/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर राहू शकत नाही व अपीलकर्ता यांनी अर्जात म्हटल्याप्रमाणे त्यांचे म्हणणे हेच आहे असे गृहित धरुन अपीलाची सुनावणी घेण्यात यावी असे दि. 3.9.2007 रोजी कळविले आहे. माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 4.9.2006 रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय गडचिरोली यांचेकडे 10 मुद्यांवर माहिती मागणारा अर्ज केला होता. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांनी दिनांक 29.10.2006 रोजी पुन्हा अधिक्षक जिल्हा भुमि अभिलेख कार्यालय गडचिरोली यांचेकडे तक्रारवजा अर्ज केलेला दिसून येते. व त्या पत्राची सुध्दा दखल न घेतल्यामुळे सदरचे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांचे दि. 4.9.2006 च्या माहिती मागण्याच्या अर्जामध्ये जे 10 मुद्दे आहेत त्या 10 मुद्यांमध्ये बहुतांश मुद्दे हे प्रश्नार्थक आहे म्हणजे प्रश्न विचारुन अभिप्राय मागणारे आहे. जे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे अपेक्षित नाही. उर्वरीत मुद्यांवरील माहिती ही तालुका भुमि निरीक्षक देसाईगंज वडसा या कार्यालयातील आहे. असे असले तरी त्यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन कां दिली नाही याबद्यलचा खुलासा देतांना श्री सी.के.टारपे (सेवानिवृत्त) यांचेकडे अधिक्षक भुमि अभिलेख गडचिरोली जिल्हा गडचिरोली व अधिक्षक भुमि अभिलेख चंद्रपूर जिल्हा चंदपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्यांचे गडचिरोली कार्यालयात व संबंधित अतिरिक्त कार्यभार घेतलेल्या कार्यालयाचा कामाचा व्याप अवाढव्य असल्यामुळे कामाचे घाईगर्दीत अर्जदारास विहीत कालावधीत माहिती देता आली नाही तसेच अर्जावरचे अपील पहिजे करणे आवश्यक होते. परंतु तसे त्यांनी केले नाही व वरील अडचणींमुळे दि. 20.2.2007 रोजी विलंबाने माहिती दिल्याबद्यल क्षमा करण्यास विनंती आहे. पुन्हा आज विद्यमान अधिक्षक यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी पूर्वी 7.3.2005 रोजीसुध्दा तालुका निरीक्षक भुमि अभिलेख कार्यालय देसाईगंज येथे अर्ज केला होता व त्यास 21.3.2005 रोजी उत्तर देण्यात आले होते. पुन्हा दि. 4.9.2006 च्या अर्जात मागितलेली माहिती ही त्यांनी शासकिय माहिती अधिकारी तालुका निरीक्षक भुमि अभिलेख कार्यालय देसाईगंज यांचेकडे मागितली होती व सदरच्या माहिती बद्यलचे उत्तर त्यांना तालुका निरीक्षक भुमि अभिलेख यांनी दि. 24.4.2006 रोजी दिलेले आहे पुन्हा त्यांनी दि. 6.5.2006 रोजी तालुका निरीक्षक भुमि अभिलेख कार्यालय देसाईगंज यांचेकडे माहिती मागितली होती त्याप्रमाणे दि. 2.6.2006 रोजी त्यांना उत्तर देण्यात आलेले होते. पुन्हा त्यांनी दिनांक 5.4.2006 रोजी तालुका निरीक्षक भुमि अभिलेख कार्यालय देसाईगंज यांचेकडे माहिती मागितली होती व त्यास दि. 24.4.2006 रोजी उत्तर देण्यात आलेले आहे. अशा प्रकारे आता पर्यंत तालुका निरीक्षक भुमि अभिलेख वडसा यांनी त्यांना वेळोवेळी विहित मुदतीत

माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे दि. 4.9.2006 चा अर्ज हा माहिती ही तालुका निरीक्षक भुमि अभिलेख यांचेकडे उपलब्ध असुन सुध्दा व त्यांचेकडून माहिती घेवून सुध्दा त्यांनी सदरचा अर्ज हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय गडचिरोली यांचेकडे करुन तिच माहिती पुन्हा मागितली. व त्यामुळेच कदाचित सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेले दिसत नाही. तसेच त्यांनी प्रथम अपील दाखल केले असते तर त्याबाबतची पुन्हा चौकशी झाली असती. आता पुन्हा त्यांना दि. 20.2.2007 रोजी नंतर 4.2.2006 व 15.2.2007 च्या अर्जाप्रमाणे हव्या असलेल्या नकला तालुका निरीक्षक भुमि अभिलेख वडसा यांचेकडे अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावयास सांगितले आहे. माहितीचा अर्ज प्रश्नवजा आहे व त्यामुळे निकाली काढण्यात येत आहे असे कळविले आहे. तसेच तालुका निरीक्षक भुमि अभिलेख वडसा यांनी सुध्दा सदरच्या आदेशाची प्रत पाठवून अर्जदारास रु. 2 प्रमाणे झेरॉक्स नकल द्याव्यात असे कळवून माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून कळविलेले दिसते. यात महत्वाचे दोन मुद्दे असे आहे की अपीलकर्ता यांनी तीच माहिती तालुका निरीक्षक भुमि अभिलेख यांचेकडे दि. 31.3.2006 रोजी मागितली होती. व त्याच माहितीचे उत्तर त्यांना दि. 24.4.2006 रोजी देण्यात आलेले आहे. दिनांक 6.5.2006 ला तीच माहिती मागितलेली आहे तिचे उत्तर दि. 2.6.2006 ला देण्यात आलेले आहे. 5.4.2006 चे उत्तर 24.4.2006 ला देण्यात आलेले आहे त्यामुळे अपीलकर्ता यास माहिती उपलब्ध झालेली आहे. राहिलेली माहिती ही त्यांनी उपलब्ध करुन घ्यावी म्हणून 20.2.2007 रोजी कळविण्यात आलेले आहे. फक्त तीच तीच माहिती मिळवून सुध्दा पुन्हा निरनिराळया माहिती अधिका–यांना मागून त्यांना वेठीस धरणे हे माहितीचा अधिकार अधिनियमाचे तरतुदींचा गैरवापर आहे. दि. 4.9.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध न करुन देण्याचे कारण जे दिलेले आहेत ते सुध्दा संयुक्तिक वाटते तरी सुध्दा कोणत्याही प्रकारे माहितीचा अर्ज आल्या नंतर त्याचे विहित

मुदतीत उत्तर देणे हे अपेक्षित आहे. माहिती मिळणे महत्वाचे असल्यामुळे व ती अपीलकर्त्यांना मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांनी दि. 4.9.2006 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही दिनांक 31.3.2006 च्या अर्जाप्रमाणे त्यांना तालुका भुमि अभिलेख यांचेकडून आधिच उपलब्ध झालेली आहे व त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढयात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 5.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 393/2007.**

1) श्री विलास वामनराव लोहोटे
बी–13/112, बजरंग कॉम्प्लेक्स,
सिरसपेठ, नागपूर – 440 009 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री एस. बी. सहस्त्रबुध्दे
सहपरिवहन आयुक्त,
परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकिय इमारत,
3 रा व 4 था मजला, शासकिय वसाहत, वांद्रे (पूर्व)
मुंबई 51.

2) जन माहिती अधिकारी
श्री पी. व्ही. महाजन,
परिवहन उपआयुक्त (प्रशासन),
परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकिय इमारत,
3 रा व 4 था मजला, शासकिय वसाहत, वांद्रे (पूर्व)
मुंबई 400 051. ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2006 रोजी श्री संदिप गुप्ता बस मालक यांनी केलेल्या तक्रारीच्या प्रतिची मागणी करुनही तपासी अंमलदार श्री सुभाष पानसे व मा. परिवहन आयुक्त यांच्यात झालेल्या सर्वच्या सर्व पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती देण्याची मागणी केलेली होती. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 27.4.2006 रोजी अपीलकर्ता यांनी अपेक्षित केलेली माहिती ही केंद्रिय माहितीच्या अधिकार कायद्याच्या कलम 2 (1) अन्वये देता येत नाही असे कळविले होते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 13.4.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक 29 मे 2006 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. परंतु पूर्विच दि. 6.5.2006 रोजी पुन्हा अपीलकर्ता यांस केंद्रिय माहितीचा अधिकार कायद्याच्या कलम 2 (1) अन्वये देता येत नाही असे दि. 27. 4.2006 च्या पत्राने कळविले होते. त्याऐवजी केंद्रिय माहितीचा अधिकार कायद्याच्या कलम 8 (एच) अन्वये देता येत नाही असे वाचावे असे कळविण्यात आले होते. प्रथम अपीलाच्या निकालामध्ये सुध्दा माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आला होता. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलातील त्यांच्या विनंतीच्या समर्थनार्थ त्यांनी खालील न्यायालयीन प्रकरणांचा उल्लेख केला.

1) Smt. J.L.Patel v/s The State of Gujrat
   (1992 CRIL.J.2377)
2) P. Sirajuddin v/s The State of Madras
   (AIR 1971 SC 520:1971 Cr L.J.523)
3) State of Haryana v/s Bhajanlal
   (1992 Cr L.J.527: AIR 1992 SC 604:1992)
4) Smt. Nandini Satpathy v/s P.L.Dani
   (1978 Cr L.J.968: AIR 1978 SC 1025)

न्यायालयीन प्रकरणामधिल निर्णय दाखल केलेला आहे. सदरच्या न्यायालयिन निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की जो निर्णय मा. उच्च न्यायालय गुजरात यांनी जे.एल.पटेल विरुध्द गुजरात शासन (1992 CRIL.J.2377) मध्ये First information report – It is a public document – Accused entitled to certified copy of the same – Denial is against principle of natural justice violating Art. 21 of the Constitution. अशाप्रकारचा निर्णय दिलेला आहे. परंतु तपास कामातील इतर कागदपत्रे आरोपीस उपलब्ध करुन देण्याबद्यल मात्र त्या निर्णयामध्ये कोणताही उल्लेख नाही. मा. मद्रास उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय यांचे जे निर्णय दाखल केलेले आहेत त्या निर्णयामध्ये तपास कामी सर्व कागदपत्रे आरोपीस द्यावी अशा प्रकारचे निर्णय नाहीत. परंतु आरोपपत्रामध्ये दाखल करतांना मात्र सर्व कागदपत्रे द्यावीत फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 प्रमाणे अशा तरतुदी असल्यामुळे आरोपपत्र दाखल केल्यानंतर ती कागदपत्र अर्थातच आरोपी यास मिळातातच. दाखल केलेल्या निर्णयामध्ये न्यायालयात चौकशी सुरु झाल्यानंतर पुराव्याच्या आधारावर निर्णय होत असतात व त्याप्रमाणे दाखल केलेल्या निर्णयामध्ये दिसून येते. आरोपपत्र दाखल करण्याबाबत सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिसुन येत नाही. सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की न्यायालयात आरोपपत्र दाखल झालेले आहे व त्यामुळे ही सर्व कागदपत्रे त्यांना माहितीच्या अधिकारामध्ये उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. त्यावर उत्तरवादी यांनी सांगितले की चौकशी अधिकारी हे पोलिस आहेत. अपलकर्त्याच्या विरुध्द गुन्हा हा ॲन्टी करप्शन पोलिसनी दाखल केलेले आहेत. अपीलकर्ता हे परिवहन खात्यात नोकरीस असल्यामुळे चौकशी अधिका–यानी त्यांच्याकडे चौकशीच्या संदर्भात पत्रव्यवहार केलेला आहे. सदरच्या पत्रव्यवहाराबाबत चौकशीच्या करीता किंवा आरोपपत्र दाखल

करण्याकरीता कोणते कागदपत्र आवश्यक आहेत किंवा नाही ते आज सांगु शकत नाही. ही बाब फक्त चौकशी अधिकारीच सांगू शकतात व त्यामुळे चौकशी अधिकारी यांनी त्याबाबत सदरचे अभिप्राय व्यक्त केल्यास अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही हे चौकशी अधिका–याच्या अभिप्रायावर अवलंबून राहिल.

3. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकुन घेतल्यावर उत्तरवादी यांचे म्हणणे संयुक्तिक वाटते व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या विरुध्द दाखल झालेल्या गुन्हयाच्या संदर्भात जे चौकशी अधिकारी असतील त्या चौकशी अधिका–याचे अभिप्राय घेणे हे संयुक्तिक वाटते. व सदरचे अभिप्राय हे उत्तरवादी यांनी ऐकुन त्याप्रमाणे अपीलकर्ता यास कळविणे रास्त होईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यांच्या विरुध्द दाखल झालेल्या गुन्हयाच्या संदर्भात जो पत्रव्यवहार चौकशी अधिकारी व परिवहन कार्यालय यांच्यामध्ये झालेला आहे त्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपीलकर्ता यास उपलब्ध करुन देणे वैध होईल किंवा कसे याबाबत चौकशी अधिकारी यांचे अभिप्राय घेवून त्याप्रमाणे अपीलकर्ता यांस कळवावे. सदरचा अभिप्राय मिळण्याकरीता हा निर्णय मिळाल्यापासून एक महिन्यांत कार्यवाही करण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 6.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 394/2007.**

1) श्री विलास वामनराव लोहोटे
बी–13/112, बजरंग कॉम्प्लेक्स,
सिरसपेठ, नागपूर – 440 009 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री एस. बी. सहस्त्रबुध्दे
सहपरिवहन आयुक्त,
परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकिय इमारत,
3 रा व 4 था मजला, शासकिय वसाहत, वांद्रे (पूर्व)
मुंबई 51.

2) जन माहिती अधिकारी
श्री पी. व्ही. महाजन,
परिवहन उपआयुक्त (प्रशासन),
परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकिय इमारत,
3 रा व 4 था मजला, शासकिय वसाहत, वांद्रे (पूर्व)
मुंबई 400 051. ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 5/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2006 रोजी माहिती अधिकारी यांचे अपीलकर्ता व परिवहन आयुक्त यांची प्रत्यक्ष भेटीची संधी देतील व त्याप्रमाणे वेळ व तारीख देतील व घेतलेला निर्णय कळविण्याची व्यवस्था करतील अशी माहिती मागितली आहे. सोबत दोन छायांकित प्रती सहपत्र म्हणून दिलेली आहेत असे नमुद केलेले आहे. परंतु द्वितीय अपीलाच्या सोबत छायांकित प्रती जोडलेल्या नाहीत. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यामुळे त्यांनी दि. 13.4.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर दि. 6.5.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी संदर्भाधिन अर्जात नमुद केलेल्या भ्र. प्र. कायद्यातील कलम 19 मध्ये विभाग प्रमुखांचे (मा. परिवहन आयुक्त महोदय यांचे) भेटीबाबत काहीही नमुद केलेले नाही सबब आपणास मा. परिवहन आयुक्ताची भेट घ्यावयाची असल्यास त्यांचे स्विय सहायकाकडून दिनांक वगैरे घेवून त्याप्रमाणे भेट घ्यावी असे कळविले आहे. प्रथम अपीलाची सुनावणी घेवून दि. 29 मे 2006 रोजी माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहिती मिळण्याच्या अर्जामध्ये मा. परिवहन आयुक्ताच्या भेट मिळण्याबद्यल तारीख व वेळ मागितली होती यापेक्षा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चा गैरवापर होवू शकत नाही. त्यामुळे माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) मध्ये ''माहिती'' या संज्ञेची (व्याख्या दिली आहे). व (त्र) मध्ये ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेची व्याख्या दिली आहे. सदरच्या व्याख्येप्रमाणे माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमात एखाद्या अधिका–यास भेटीची तारीख व वेळ मागता येत नाही. अपीलकर्ता यांचेच म्हणण्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे त्यांची 48 अपीले प्रलंबित आहेत. त्याचप्रमाणे अपीलकर्ता हे महिन्यातून सरासरी 15 ते 20 तक्रार अर्ज

आयोगाकडे दाखल करीत असतात. या प्रकरणातील माहितीच्या अर्जांचा विचार जर केल्यास अपीलकर्ता यांनी दाखल केलेले अर्ज व अपीले यांचे स्वरुप लक्षात येईल. अपीलकर्ता यांचे विरुध्द भ्रष्टाचार निर्मुलन कायद्याखाली गुन्हा दाखल झालेला आहे. व गुन्हयाच्या संदर्भात आरोपपत्र सुध्दा न्यायालयात दाखल झालेले आहे. अशा परिस्थितीमध्ये अपीलकर्ता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचा वापर करीत आहेत. आयोगाकडे आलेल्या अर्जावरुन व दाखल झालेल्या अपीलामध्ये असे लक्षात येते की अपीलकर्ता यांनी असे कोणतेही कार्यालय सोडले नाही की त्याविरुध्द अर्ज दाखल केलेले नाहीत. ज्या न्यायालयामध्ये आरोपपत्र दाखल झालेले आहेत त्या न्यायालयाच्या संदर्भामध्ये सुध्दा बरेच अर्ज राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले आहेत. त्यांना माहिती मागण्याचा अधिकार निश्चितच आहे त्यांच्या विरुध्द दाखल झालेल्या गुन्हयाच्या संदर्भामध्ये काही माहिती आवश्यक असेलही परंतु या प्रकरणातील अर्जाच्या प्रमाणेच जर अधिकतम अर्ज असतील तर वर म्हटल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचा हा गैरवापर आहे व निश्चितच हे माहितीचा अधिकार मिळवून देणा–या चळवळितील कार्यकर्त्यांना हे अपेक्षित नसावे. त्याबाबत त्यांनीसुध्दा दखल घेणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार हे अनमोल व अमोघ अस्त्र आहे. अनमोल व अमोघ अस्त्राचा वापर हा वारंवार छोटया शुल्लक कारणांकरीता करावयाचा नसतो अन्यथा मिळवून दिलेला माहितीचा अधिकार हा निष्प्रभ किंवा बोथट होऊ शकतो. सदरचे मत हे एवढयाच करीता व्यक्त केलेले आहे की अशा अर्जदाराना आळा बसेल. यात माहिती अधिकारी यांचा भरपूर वेळ गेलेला आहे. अपीलीय अधिकारी यांचापण त्याबाबत भरपूर वेळ खर्ची घातलेला आहे. अपील दाखल झालेले असल्यामुळे आयोगाला सुध्दा सुनावणी घ्यावी लागली. माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे मुंबईहुन शासकिय खर्चानी आलेले आहे. ही बाब मुद्याम निदर्शनास आणणे आवश्यक आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे फेटाळुन लावणे आवश्यक आहे.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही माहतीचा अधिकर अधिनियम 2005 च्या तरतुदींचे कलम 2 (च) व (त्र) यातील ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे नसल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळुन लावण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 6.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 397/2007.**

1) श्री गणपत पोटटी आलाम
मु.पो.ता.मुलचेरा जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री एस. एल. ठवरे
उपवन संरक्षक,
आलापल्ली वनविभाग, आलापल्ली
ता. अहेरी जि. गडचिरोली

2) जन माहिती अधिकारी
श्री डी. एस. जाधव
उपविभागीय वन अधिकारी,
आलापल्ली वनविभाग, आलापल्ली
ता. अहेरी जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17/10/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.6.206 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे 1) दि.1.2.1991 नंतर प्रसिध्द सेवा ज्येष्ठता योदी 2) चौकीदार/वनमजुर पदावरुन कमी केल्याचे

कार्यालयीन शासकिय आदेश 3) सन 1991–92 ते 2004–05 पर्यंत चौकीदार/वनमजुर पदावर नियमित केलेल्या उमेदवाराचे नियुक्ती आदेश 4) माहे एप्रिल 2004 व मे 2004 चे रोजंदारीची मजुरी मिळालेली नाही याबाबतची कारणे. अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे. मुद्या क्र. 3 व 4 ची माहिती दि. 7.10.2006 रोजी पुरविण्यात आली व मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती दि. 8.11.2006 अन्वये पुरविण्यात आली. परंतु माहिती अपुरी आहे असे कारण देवून माहिती परत केली. पुन्हा मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती दि. 24.3.2007 अन्वये वनपरिक्षेत्राधिकारी श्री पी.डी.गुडम मार्फत पुरविण्यात आली. सदरच्या अर्जाप्रमाणे माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 21.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात अपिलीय अधिकारी हे प्रशिक्षणास गेले होते त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी राहिली व नंतर मात्र चौकशी करुन एकत्र माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन देण्याचे कारण माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही वनपरिक्षेत्राधिकारी पी.डी. गुडम यांचेकडे होती. वनपरिक्षेत्राधिकारी पी.डी. गुडम यांचे कार्यालय मौजे वलेगुरटोला तालुका अहेरी येथे आहे. परंतु 15 नोव्हेंबर 2005 रोजी नक्षलवाद्यांनी रात्री संपूर्ण कार्यालय जाळले त्यामुळे कार्यालयातील रेकॉर्ड जळाले त्यामुळे अर्जदाराची माहिती विभागीय कार्यालयातून घेणे भाग पडले. सदरची माहिती जुनी असल्यामुळे जुने रेकॉर्ड काढुन माहिती तयार करावी लागली. जसजशी माहिती या कार्यालयास प्राप्त झाली त्याप्रमाणे वेळोवेळी अर्जदाराला पुरविण्यात आली. दि. 8.11.2006 रोजी माहिती अपुरी आहे हे कारण देवून माहिती परत केली. मात्र दिनांक 24.3.2007 अन्वये वनपरिक्षेत्राधिकारी पी.डी. गुडम मार्फत पुरविण्यात आली. त्याची पोच वनपरिक्षेत्राधिकारी पी.डी. गुडम यांनी कार्यालयास सादर केली नाही परंतु अर्जदाराने त्यांचे दि. 25.4.2007 चे अर्जात त्या पत्राचा संदर्भ दिलेला आहे. म्हणजेच त्यांना माहिती प्राप्त झालेली आहे असा खुलासा त्यांनी सादर केलेला आहे. सदरची

माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी दिनांक 23.11.2006, 30.8.2006, 7.11.2006 अशा प्रकारे वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. व त्यामुळे माहिती विलंबाने दिलेली असली तरी ज्या क्षेत्रातून माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची आहे व ज्या स्तरावरची माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची आहे त्याचा विचार करुन झालेला विलंब हा समर्थनिय ठरतो. माहिती उपलब्ध झाली असली तरी अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नाही. त्याबद्यल त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की जेष्ठता यादी ही 1991 पासून त्यांना हवी होती. परंतु 1994, 2001, 2002,2004 अशी दिलेली आहे त्यावर माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की मजुरांची जेष्ठता यादी ही दरवर्षी प्रसिध्द होत नाही तर ती ज्या ज्या वेळेस प्रसिध्द होते ती दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे दरवर्षाची यादी उपलब्ध होवू शकत नाही. मुद्या क्र. 2 च्या संदर्भामध्ये चौकीदार वनमजुरी पदावरुन कमी केल्याचे शासकिय आदेश ते त्यांना उपलब्ध करुन दिली आहे अशी माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना कमी केल्याचे आदेश पुर्वी दिलेच नव्हते. परंतु ते त्यांनी त्यावेळेस घेतले नव्हते असे अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे असून त्याकरीता पंचनाम्याची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावरही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की पंचनामा बोगस आहे. मुद्या क्र. 4 चे संदर्भामध्ये एप्रिल 04 व मे 04 चे रोजंदारी मजुरी मिळालेली नाही याबाबतची कारणे त्यावर माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांना मार्च 2004 च्या अखेरीस कमी केले होते. वर नमुद केल्याप्रमाणे त्यांनी आदेश घेतले नव्हते त्यामुळे एप्रिल 2004 ते मे 04 ची मजुरी देण्याचा प्रश्नच नाही. अपीलकर्ता यास एक महिन्याची नोटिस देण्याची आवश्यकता होती परंतु ती न दिल्यामुळे त्यांना एक महिन्याची अतिरिक्त मजुरी ही नुकसान भरपाई म्हणून तसेच त्यांनी 40 दिवसाचे जे काम केलेले आहे त्याबद्यल 15 दिवसाची मजुरी एकुण 7193 व

एक महिन्याची मजुरी 1781 मिळुन 8974 नावे बॅक ड्राफट क्र. 477273 दिच 29.3.2003 अन्वये या सोबत दिला आहे. हा डी. डी. त्यावेळेस त्यांनी स्विकारला नव्हता. यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना इतरांना घेतले तसे कामावर घेतले पाहिजे व कायम स्वरुपी कामावर घेतले पाहिजे परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की त्यांना आवश्यकता असेल त्याप्रमाणेच कामावर घेतले जाते कायम स्वरुपी कामावर घेतले जावू शकत नाही व अपीलकर्ता याची माहिती मागण्याचा मुळ उद्येश हाच दिसतो. परंतु अपीलकर्ता यांना कामावर घ्या असे आदेश देणे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामुळे त्यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे. अपीलकर्ता यांना त्यांच्या मिळालेल्या माहितीच्या आधारावरुन तक्रार करावयाची असेल तर ती स्वतंत्रपणे योग्य त्या प्राधिका–याकडे त्यांना करता येईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. 1 ते 4 मधिल माहिती ही उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 6.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 454/2007.**

1) श्री रामभाऊ नत्थुजी रंभाड
प्लॉट क्र. 16, त्र्यंबकेश्वर अपाटमेंट
कुकडे ले आऊट नागपूर 440 027. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री संजय बारई
उपआयुक्त (पुनर्वसन)
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
श्री जी. टी पूरके
सहा. अधिक्षक (जमीन)
विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.10.206 रोजी माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा विषय नरखेड–अमरावती रेल्वे मार्गाचे भुसंपादन प्र.क्र.8अ/65/94–95 मौजा मोवाड– प.ह.नं.1 उपआयुक्त (पुनर्वसन) नागपूर विभाग नागपूर यांचे पत्र क्र. कार्या 4(1)/

भूसंपादन/नागपूर/कावि–1096 दि. 7.10.2005 सोबत जोडले आहे. एका वर्षापेक्षा जास्त कालावधी संपूनही अर्जदाराला मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडून उपरोक्त विषयी अहवालाची प्रत अर्जदारास माहिती अधिकारी अध्यादेश 2005 नुसार देण्यात यावी त्यासाठी हा अर्ज सादर करण्यात येत आहे. अशी माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 26 ऑक्टोबर 06 रोजी आपण विभागीय आयुक्त यांचे नावाने उद्येशून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत आलेल्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की आपला अर्ज पुढिल कारवाईसाठी माहिती अधिकारी श्री घोडकर आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे पुढिल कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे. याबाबत काही अडचण असल्यास आपण संबंधित अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. दिनांक 30.10.2006 रोजी माहिती अधिकारी (भूसंपादन) आयुक्त कार्यालय यांनी संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने आपण जिल्हाधिकारी यांचे अहवालाची प्रत मागितलेली आहे. परंतु विषयासंबंधाने अर्जात नमुद अहवाल जिल्हाधिकारी नागपूर यांचे कडून या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर अहवालाची प्रत या कार्यालयाकडून पुरवता येत नाही. आवश्यक असल्यास या संबंधाने आपण जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालयातील संबंधित माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधावा ही विनंती. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दि. 13.11.2006 रोजी दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्यामध्ये जे मुद्ये उपस्थित केलेले दिसत आहे त्या मुद्याचा संदर्भ किंवा त्याबद्यलचे पत्र अपीलाच्या सुनावणीत दाखल केलेले नाहीत. मात्र अहवालाची प्रत 30 दिवसाच्या आत देण्यात आलेली नाही एवढाच मुद्या उपस्थित करण्यात आलेला आहे. सदरच्या अपीलाचा निर्णय दि. 22.1.07 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असा निर्णय देण्यात आला व अपील खारीज करण्यात आलेले दिसून येत आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 6.10.2006 च्या अर्जामध्ये उपआयुक्त (पुनर्वसन) यांचे दिनांक 7.10.2005 च्या पत्राचा उल्लेख केलेला असून ते सोबत जोडलेले आहे व आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन यामध्ये मात्र जिल्हाधिकारी यांचेकडून उपलब्ध विषयी अहवालाची प्रत मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून मिळाली नाही त्यामुळे अहवालाची प्रत अर्जदारास मिळावी याकरीता अर्ज केला. या संपूर्ण अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची निश्चित अशी मागणी न करता संदिग्ध मागणी करण्यात आलेली आहे त्यामुळेच विहित मुदतीत संदिग्ध उत्तर देण्यात आलेले दिसून येत आहे. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या मेमोमध्येसुध्दा कोणत्याही प्रकारचा निश्चित मुद्या उपस्थित केलेला नाही व अपीलाची प्रत मिळाली नाही एवढाच फक्त मुद्या उपस्थित केलेला आहे. व त्यामुळेच माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय प्रथम अपीलातसुध्दा कायम करण्यात आलेला दिसतो. मात्र व्दितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 14.9.2005 रोजी विभागीय आयुक्त (भूसंपादन) बद्यल तक्रार दाखल केली याचा प्रथमच उल्लेख केलेला दिसून येतो. त्यानंतर आणखी 4 मुद्ये याठिकाणी उपस्थित केलेले आहे. वास्तविक अर्जदाराने दि. 14.9.2005 च्या रोजीचा संदर्भ माहितीच्या दि. 6.10.2006 च्या अर्जात दिला असता तर त्यांना कदाचित अपेक्षित असे उत्तर मिळाले असते. परंतु माहितीच्या अधिकारातसुध्दा मोघम व संदिग्ध माहिती विचारायची व उत्तर मात्र अर्जदाराच्या मनात असेल तसे अपेक्षित करावयाचे हे निश्चितच अपेक्षित नाही. माहितीचा अधिकार हे प्रभावी अस्त्र वापरताना त्याचा निश्चित वापर केला असला पाहिजे. कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये शेकडो अर्ज येत असतात. त्यामध्ये संदर्भ न देता अर्जदाराने त्याच्या माहितीच्या अधिकाराचा संदर्भात उत्तर अपेक्षित करणे हे अपेक्षित नाही. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे भुसंपादनाच्या संदर्भात गैरवापर झालाही असेल व त्याबाबत त्यांची तक्रार खरीही असेल परंतु त्याबद्यलची मांडणी करतांना किंवा माहिती योग्य रितीने मागतांना ती मागितली असेल व माहिती त्या सार्वजनिक

प्राधिकरणात उपलब्ध आहे त्या प्राधिकरणात मागितली असेल तर माहिती ही विहीत मुदतीत सुध्दा मिळु शकते. परंतु कोणत्याही प्राधिकरणाकडे कोणतीही माहिती मागावी आणि ती त्यांनी विहित मुदतीत उपलब्ध करुन द्यावी हे निश्चितच अपेक्षित नाही अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जे माहिती अधिकारी नियुक्त केले गेलेले आहेत किंवा जे प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त केले गेलेले आहेत ते निरर्थक आहे असे निष्पन्न होईल. अपीलकर्ता यांना जर जिल्हाधिकारी कार्यालयातून अहवाल अपेक्षित होता तर तो त्यांनी त्या कार्यालयातून मागावयास पाहिजे होता. किंवा दि. 14.9.2005 चा अर्ज हा विभागिय आयुक्त यांना केला होता त्या अर्जावर काय कारवाई झाली असे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन विचारणा करावयास पाहिजे होती. ते न विचारता त्यांनी मोघम कोणताही संदर्भ लागणार नाही अशी माहिती विचारली त्यामुळेच त्यांना जी अपेक्षित माहिती पाहिजे आहे त्यांना मिळू शकली नाही. अशा प्रकारे मोघम माहिती मागावयाची आणि ती निश्चितपणे मिळाली पाहिजे हे मात्र शक्य होवू शकत नाही त्यामुळे अपीलकर्ता यांचे दि. 6.10.2006 च्या अर्जास दि. 30.10.2006 रोजी जे उत्तर देण्यात आलेले आहे ते विहित मुदतीत देण्यात आलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना दि. 6.10.2006 अर्जात मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे दिनांक 30.10.2006 रोजी विहित मुदतीत जे उत्तर देण्यात आलेले आहे ते योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 7.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 प्रमाणे तक्रार क्रमांक 103/2007.**

1) श्री शेषराव मोतीराम पवार

मु.पो.तोरनाला ता. मनोरा जि. वाशिम ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम ता.जि.वाशिम ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

तक्रारकर्ता यांनी दिनांक 2/1/2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी दि. 14.11.2006 रोजी केलेल्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकार यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 प्रमाणे तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अर्जदार हजर आहेत. जन माहिती अधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद वाशिम हजर नाहित किंवा गैरहजर राहण्याकरीता त्यांनी कोणतीही अनुमती घेतलेली नाही.

2. तक्रारकर्ता यांनी दि. 14.11.206 रोजी माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांच्याकडे 4 मुद्यांवर माहिती मागण्याकरीता अर्ज केला होता. डॉ. सुहास देशमुख वरिष्ठ वैद्य आयुर्वेदिक दवाखाना तोरनाळा ता. मानोरा हयांचे विरुध्द सन 2001 ते 2003 या कालावधीत झालेल्या प्रशासकीय कार्यवाहीची संपूर्ण माहिती. व्यक्तिशः घेणार म्हणून मागितली होती. सदरच्या माहितीच्या अधिकाराच्या संदर्भात माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी दि. 29.11.2006 रोजी माहिती ही बरीच जुनी असल्याने संबंधित माहिती करीता अजुन

15 दिवस कालावधी लागेल आपणास 15 दिवसानंतर माहिती पुरवण्यात येईल असे कळविले होते. परंतु सदरच्या निर्णयाच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत नाही मात्र राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदरची तक्रार दाखल केल्याची प्रत ही उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ अकोला यांचे कडेसुध्दा पाठविण्यात आली आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनासुध्दा पाठविण्यात आली. त्यामुळे दि. 23.3.2007 रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पत्र देवून संदर्भित माहिती द्यावी म्हणून कळविलेले दिसून येते व त्यावरुनच दि. 2.4.2007 रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी तक्रारदार यांच्या दि. 14.11.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने 4 मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सोबत कॅरेक्टर रोल वॉर्निंग दि. 3.8.2002 रोजी डॉ. सुहास देशमुख यांच्या संदर्भात काढलेल्या आदेषाची झेरॉक्स प्रत तसेच दि.11.4.02 रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी काढलेल्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या आदेशाच्या प्रतिवरुन डॉ. सुहास देशमुख यांचे विरुध्द कॅरेक्टर रोल वॉर्निंग बजावण्यात येत असून त्यांचे सन 2002–2003 चे गोपनिय अभिलेखामध्ये नोंद घेण्यात यावी असे नमुद केले असून दि. 11.4.2002 च्या आदेशात एक वार्षिक वेतनवाढ पुढिल वेतनवाढिवर परिणाम न होता बंद करीत आहे या आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवा पुस्तकामध्ये घेण्यात यावी अशाही आदेशाची प्रत त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये डॉ. सुहास देशमुख यांचेविरुध्द काय प्रशासकिय कार्यवाही केली याबद्यलचा तपशिल देवून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

3. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाकडून जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनासुध्दा सुनावणीसाठी नोटिस काढण्यात आली होती परंतु सदरच्या सुनावणीस ते विनाअनुमती गैरहजर आहेत व त्यांनी कोणत्याही अधिका–यास सुनावणीस पाठविले नाही किंवा कागदपत्रसुध्दा दाखल केले नाहीत हा राज्य माहिती आयोगाचा अवमान आहे. अशा प्रकारचा उद्यामपणा हा शिस्तभंगाची कारवाईस पात्र होतो. त्याकरीता मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे विरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे योग्य ती कारवाई करावी.

## नि र्ण य

1) तक्रारदार यास त्यांच्या दि. 14.11.2006 च्या अर्जातील मागितलेल्या माहितीप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यात येत आहे.

2) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना नोटिस मिळूनसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सिध्द करण्याची जबाबदारी त्यांची असूनसुध्दा त्यांनी कोणतेही कागदपत्र दाखल केले नाहीत व सुनावणीस हजर झाले नाहीत याकरीता त्यांचेविरुध्द मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी योग्य ती कारवाई करावी व त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) निर्णयाची एक प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना पाठविण्यात यावी.

नागपूर

दिनांक 7.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 प्रमाणे तक्रार क्रमांक 104/2007 व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 479/2007.**

1) श्री नरेंद्र राठोड (राखडे)
रा.बेलबाग तुळशिबाग रोड (महादेव मंदिर मागे)
महाल नागपूर .... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री व्हि. जी. गावंडे
कार्यशाळा व्यवस्थापक
राज्य परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यशाळा, हिंगना मार्ग,
एम. आय. डी. सी. क्षेत्र, नागपूर 400016.

2) जन माहिती अधिकारी तथा
कार्यशाळा व्यवस्थापक
मध्यवर्ती कार्यशाळा परिवहन विभाग
हिंगना रोड नागपूर. ..... **गैरतक्रारदार**

## वि वे च न

तक्रारदार यांनी त्यांना त्यांच्या दि. 17.7.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. सदरच्या अर्जामध्ये दि. 14.3.2007 द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या तक्रार अर्जामध्ये त्यांना दि. 27.7.2006 च्या अर्जाप्रमाणे आजपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही असे त्यांनी म्हटलेले आहे. तक्रारीच्या सुनावणीच्या वेळेस त्यांनी द्वितीय अपील दाखल

केली आहे ही माहिती उघड झाली परंतु त्यात सुध्दा रु. 20 ची कोर्ट फी स्टॅम्प सुध्दा लावलेले नाही. अपीलमेमो सोबत दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये सुध्दा दिनांक 27.1.2007 रोजी कार्यशाळा व्यवस्थापक यांनी तक्रारदार यांनी पाठविलेल्या पत्राची प्रत जोडलेली आहे. तक्रारीच्या सुनावणीच्या वेळेस सुध्दा तक्रारदार यांनी त्यांना उत्तरवादी यांना दिलेल्या पत्राच्या संदर्भात कोणत्याही प्रती किंवा माहिती सांगितली नाही. त्यांना कोणत्याच प्रकारची माहिती आतापर्यंत मिळाली नाही एवढेच त्यांनी सांगितले. व दरम्यानचा उत्तरवादी व अपीलकर्ता यांचेमध्ये झालेला पत्रव्यवहाराची सुध्दा माहिती दिली नाही. मात्र उत्तरवादी हे उशिरा आले असले तरी त्यांनी खुलासा सादर केलेला आहे. सदरच्या खुलाशामध्ये दि. 17.7.2006, 27.7.2006, 8.9.2006, 9.10.2006 च्या अर्जानुसार जी माहिती मागितली होती ती त्यांना या पुर्वीच पुरविण्यात आलेली आहे. त्याचे पत्र क्रमांक खालिलप्रमाणे आहे. दिनांक 17.7.2006 च्या प्रारुपातील अर्जानुसार दि. 31.8.2006 नुसार सविस्तर माहिती आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रतीसह कळविलेले आहे. दिनांक 27.7.2006 च्या दुस–या प्रारुप पत्रानुसार जी माहिती मागितली आहे (1) 1/4 पगाराविषयी त्याबाबत कळविण्यात येते की श्री बांते यांनी सदर प्रकरणी कामगार न्यायालय प्रकरण क्र. पीडब्लूए 6/6 नुसार प्रकरणत दाखल केलेले आहे व ते सुध्दा न्यायप्रविष्ट आहे. व त्यामुळे त्या प्रकरणी माहिती देता येत नाही. न्यायालयीन निर्णया नुसार कळविण्यात येईल असे दि. 27.1.2007 नुसार कळविलेले आहे. तक्रारदाराच्या दि. 1.9.2006 च्या प्रारुप अर्जानुसार मागितलेली माहिती त्यांना या कार्यालयाचे पत्र दिनांक 27.9.2006 नुसार आवश्यक कागदपत्राच्या प्रतीसह कळविलेले आहे. दि. 8.9.06 चा कोणताही अर्ज या कार्यालयात मिळालेला नाही परंतु दि. 8.9.2005 च्या प्रारुपातील अर्ज सप्टेंबर 2006 या काळात प्राप्त झाला होता. त्याप्रमाणे रु. 61 एवढा खर्च येईल असे त्यांना या कार्यालयाचे पत्र दि. 29.9.2006 नुसार कळविले आहे. परंतु त्यांनी रकमेचा भरणा केलेला नसल्याने त्यांना माहिती पाठविता आली नाही. तक्रारदार यांनी दिनांक

9.10.2006 रोजी एक निवेदन सचिव, रा. पो. महामंडळ यांना पाठविले होते. त्यानुसार प्रत या कार्यालयात दिली नव्हती त्यामुळे त्या निवेदनावर त्यांना माहिती पुरवता आली नाही. तसेच त्यांनी दि. 9.10.2006 रोजीच प्रारुपातील जो अर्ज सादर केला होता त्यावरुन त्यांना कोणती माहिती हवी याबाबत अर्थबोध होत नाही असे त्यांनी दिनांक 27.1.2006 च्या पत्रानुसार कळविले. तक्रारदार यांनी दि. 14.1.2007 रोजी प्रथम प्रपत्रा मध्ये अपील सादर केले होते. व त्यात सुध्दा 27.1.2007 नुसार अपीलाबाबत निर्णय कळविलेला आहे. यावरुन असे दिसून येते की तक्रारदार यांनी वेळोवेळी अर्ज सादर केलेले असून त्या अर्जाच्या संदर्भात त्यांना वेळोवेळी माहितीपण मिळालेली असूनसुध्दा चौकशीच्या वेळेस मात्र याबद्यल ते कोणतीही माहिती देत नाही त्यांना मिळालेल्या पत्राचेसुध्दा प्रती त्यांनी दाखल केलेल्या नहीत. उलट काहीही माहिती मिळाली नाही असेच सांगतात त्यामुळे खुलाशातील परिच्छेद क. 6 मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जे म्हटलेले आहे त्यास बळकटी येते. परिच्छेद 6 मध्ये ''याप्रकरणी आपणास विशेष माहिती सादर करण्यात येते की श्री राठोड (राखडे) वारंवार या कार्यालयात कार्यरत असलेले श्री बबन शंकरराव बांते यांच्या विषयीच माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत प्रपत्राच्या अर्जावर पुष्कळदा साध्या पत्रा नुसार माहिती मागतात. श्री बांते लिपीक हे याच कार्यालयात कार्यरत आहेत. व ते विविध प्रकरणी श्री राठोड यांच्याशी संगनमत करुन रा. प. प्रशासनास त्रास देण्याच्या हेतुने श्री राठोड (राखडे) यांच्या मार्फत माहिती मागवतात व त्याचा वापर पुढे रा. प. प्रशासना विरुध्द न्यायालयात प्रकरणे दाखल करणे, तक्रार करणे इत्यादी करतात. श्री बांते यांनी त्यांच्या रा. प. च्या सेवा काळात जवळ जवळ चार प्रकरणे रा. प. प्रशासनाच्या विरुध्द न्यायालयात दाखल केलेले आहेत. तसेच त्यांना रा. प. प्रशासनावर दबाव आणून काम पूर्ण करुन घेण्याची सवय आहे. त्याकरीता ते नेहमी उपोषण, आत्महत्या इत्यादी प्रकारचे मार्गाचा अवलंब करीत आहे असे निवेदन सादर करतात. तर कधी रा. प. प्रशासनास फौजदारी गुन्हा

दाखल करण्याची धमकी देतात. तसेच वारंवार रा. प. चे वरिष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी यांचेकडे विनाकारण निवेदने सादर करीत असतात. श्री बांते यांनी आतापर्यंत तीन ते चार वेळो उपोषण व आत्महत्या करण्याची धमकी दिलेली आहे व हया सर्व प्रकरणात ते श्री राठोड (राखडे) यांची मदत घेतात. रा. प. मध्ये श्री बांते विरुध्द ज्या शिस्त व आवेदन पध्दतीचे खाली प्रकरणे सुरु राहतात/ होती त्यामध्ये श्री राठोड (राखडे) हे त्यांचे समक्ष सुनावणीमध्ये प्रकरणे चालविण्याकरीता प्रतिनिधी म्हणून हजर राहतात. राठोड (राखडे) यांनी ज्या कर्मचा–यांची माहिती मागितली ते श्री बि.एस.बांते लिपीक हे याच कार्यकालात कार्यरत असून त्यांच्या आता पर्यंतच्या सेवाकाळात त्यांनी अनेकवेळा नियमबाहय कामे केल्यामुळे राप महामंडळाच्या शिस्त व अपील पध्दतीन्वये त्यांचे विरुध्द अनेकवेळा अपराध कारवाई करण्यात आली आहे. त्यांचे विरुध्द त्यांनी न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणांचा निर्णय सुध्दा श्री बांते यांचे विरुध्द लागला असल्यामुळे श्री बांते यांनी श्री राठोड (राखडे) यांचेशी संगनमत करुन राप प्रशासनाला जाणिवपुर्वक त्रास देण्याचा प्रयत्न करीत आहे व त्याचाच एक भाग म्हणून श्री बांते व श्री राठोड (राखडे) यांना माहिती पुरविल्यानंतरही वारंवार तोच तो पत्रव्यवहार राठोड (राखडे) करीत असतात. तसेच श्री बांते यांच्या प्रकरणामध्ये जिल्हाधिकारी यांचेकडे पण त्यांनी निवेदन सादर केलेले दिसून येते. वास्तविक जिल्हाधिकारी व राज्य परिवहन यांचा तसा संबंध नाही. दि. 31.8.2006 च्या उत्तराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की तक्रारदार यांना संपूर्ण माहिती विषद केलेली आहे.'' ज्या वैद्यकीय प्रमाणपत्राची मागणी तक्रारदार यांनी केलेली आहे त्या प्रमाणपत्राच्या संदर्भात कार्यालयीन टिपणीमध्ये उल्लेख आहे. सदरची टिपणी ही दिनांक 18.10.2003 ची आहे. व त्यामध्येच सदरचे पत्र हे गायब केलेले आहे. किंवा त्या प्रकरणातच ही शंका व्यक्त केलेली आहे. व त्याच पत्राची प्रत तक्रारदार यांनी 2006 मध्ये मागितलेली दिसून येते. आज प्रथम अपीलीय अधिकारी व प्रशासन अधिकारी हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर नाहीत. परंतु त्यांच्या हजर

नसण्याबद्यल प्रशासन अधिकारी यांनी तोंडी खुलासा केलेला आहे. त्यांच्या कुटुंबियात मयत झालेली असल्यामुळे ते आज येवू शकले नाही परंतु याबाबतही राप प्रशासनावर तक्रारीच्या सुनावणीच्या वेळेस अर्जदार व श्री बांते यांनी वेगवेगळे आरोप केले. त्या संदर्भामध्ये विचार केला असता श्री बांते यांचे रजा मंजुरीचे प्रकरण 2004 मधिल आहे. त्यावेळेसचे माहिती अधिकारी, अपीलीय अधिकारी हे बदलून गेलेले आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी 1.9.2007 ला आलेले आहेत. माहिती अधिकारी हे दोन वर्षापासून आहेत. त्यामुळे तक्रारदार व त्यांचे श्री बांते यांची तोंडी तक्रार जी आहे की अधिकारी तास देत आहेत किंवा खेळ करीत आहे यावर विश्वास ठेवता येत नाही. तक्रारदार अर्जदार यांनीसुध्दा आयोगाच्या सुनावणीस प्रामाणिकपणे माहिती दिली नाही. तक्रारदार यांनी असे पुन्हा म्हटले आहे की त्यांना कागदपत्राचे निरीक्षण मागितले होते दिले नाही. परंतु दिनांक 31.8.2006 च्या उत्तरामध्ये शेवटी त्यांना कागदपत्रे कार्यालयात समक्ष येवून पाहा म्हणून दिलेले आहे. यावरुन असे दिसून येते की माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देत नाही किंवा माहिती देण्याचे टाळाटाळ करीत आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. असे असले तरी तक्रारदार यांना त्यांचे समाधान होण्याकरीता माहिती अधिकारी यांचेकडे असलेले श्री बांते यांच्या प्रकरणा संदर्भातील सर्व कागदपत्रांची तपासणी किंवा निरीक्षण करण्यास परवानगी देणे संयुक्तिक होईल. व तक्रारदार यांना त्यांच्या अर्जामध्ये माहिती मागितल्याप्रमाणे जी कागदपत्र त्यांना आवश्यक वाटत असतील ती कागदपत्रे त्यांना निदर्शनास आणून त्याच्या प्रती हया तक्रारदारास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता तक्रारदार यांनी येणारा खर्च हा भरणे आवश्यक राहिल.

## नि र्ण य

1) तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून दिनांक 17.7.2006 च्या रोजीच्या अनुषंगाने माहिती त्यांनी मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भा मध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे निरीक्षण करुन तक्रारदारानी मागितलेली माहिती त्यांना माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी. तक्रारदार यांनी माहिती अधिकारी रजिस्टर टपालाने यांना वेळ व तारीख कळवून कागदपत्राचे निरीक्षण करण्या करीता कार्यालयात उपस्थित व्हावे व त्याबाबतच्या नोंदी ठेवाव्यात. मागितलेली कागदपत्रे उपलब्ध असल्यास त्याबाबतचा येणारा खर्च नियमाप्रमाणे माहिती अधिकारी यांचेकडे भरुन उपलब्ध करुन घ्याव्यात.

2) तक्रारदार यांनी दाखल केलेले दि. 16.3.2007 रोजीचे द्वितीय अपील हे आताच खारीज करण्यात येत आहे.

3) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 10.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 प्रमाणे तक्रार क्रमांक 104/2007.**

1) श्री महावीर दिगंबर विश्वंभर
मु.पो.मेन रोड, जैन चौक, शिरपूर (जैन)
ता. मालेगाव जि. वाशिम .... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
स्व. अण्णाभाऊ साठे शिक्षण संस्था द्वारा संचालित
मातोश्री कासाबाई दाभाडे विद्यालय शिरपूर
ता. मालेगाव जि. वाशिम ..... **गैरतक्रारदार**

## वि वे च न

तक्रारदार यांनी दि. 30.12.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक 26.11.2005 ला दिलेल्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये तक्रारदार व माहिती अधिकारी हजर आहेत.

2. तक्रारदाराच्या अर्जामध्ये त्यांनी पद मान्यता व वेतनाच्या थकबाकीबाबत माहिती मागितली होती. सदरच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की ते स्वतः प्रभारी मुख्याध्यापक आहेत व तसे त्यांना कोणत्याही प्रकारे वेतन वगैरे उपलब्ध करुन देण्याचे अधिकार नाही. परंतु तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी एकाच संस्थेत अधिकारी व कर्मचारी असल्यामुळे तोंडी त्यांना सांगितले होते परंतु आता माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी एक महिन्याची मुदत द्यावी अशी त्यांनी विनंती केली. अर्जदारानीसुध्दा ती मान्य केली

आहे. माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांना जी जी माहिती हवी असेल ती ती माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. फक्त मुदत मिळावी. तक्रारदार अर्जदारास सुध्दा सर्व वस्तुस्थिती बाबतीत माहिती असल्यामुळे त्यांनीसुध्दा याबाबत मान्यता दर्शविली आहे त्यामुळे सदरची तक्रार ही अंशतः मंजुर करणे योग्य राहिल.

**<u>नि र्ण य</u>**

1) तक्रारदार यांना त्यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही 1 महिन्याच्या आत माहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 10.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 357/2007.**

1) श्री अल्ताफ अहमद
रा. 3, अंजुमन कॉम्प्लेक्स
सदर बाजार रोड, नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त निगम आयुक्त
नागपूर महानगर पालिका, नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग, महानगर पालिका, नागपूर ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19/10/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व त्यांचे वकील हजर आहेत. माहिती अधिकारी आजारी असल्यामुळे येवू शकत नाही असे शाखा अभियंता यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांची बैठक असल्यामुळे त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री खर्डेनविस हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.8.2006 रोजी Supply information regarding the reasons & developments which compelled this office to change

the observations and office remarks in the report attached to the Order dated 25.01.2006 and the office remarks supplied on 27.12.2005 particularly discrepancy in Para No.5,6,7,9,11,12,17,22,23 & 25 as no joint site re-inspection was done between 27.12.2005 & 25.01.2006. व्यक्तिशः माहिती घेण्याचे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 10.8.2006 रोजी अपेक्षिलेली माहिती माहितीच्या अधिकारात मोडत नसल्यामुळे माहिती देता येणार नाही असे कळविले. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 28.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 30.9.2006 रोजी निर्णय दिलेला असून त्यामध्ये माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आला. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जाच्या संदर्भात हे उत्तर माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे त्या उत्तराच्या संदर्भामध्ये बरोबर नाही असे सांगितले आहे. ज्या संदर्भामध्ये बदल झालेला आहे त्या बदलाच्या संदर्भात जे काही साहित्य उपलब्ध असेल ते उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होते. परंतु तसे न करता माहितीच्या अधिकारात मोडत नाही असे थोडक्यात उत्तर दिले असल्यामुळे त्यांनी दिशाभूल केलेली आहे असे त्यांनी अपील मेमोमध्ये म्हटले आहे. माहिती अधिकारी यांना मागिल तारखेस विचारले असता त्यांनी असे सांगितले की माहितीच्या अधिकारामध्ये कारणे विचारता येत नाही व त्यामुळे सदरची माहिती ही कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ती देता येत नाही असेही त्यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीत सांगितलेले असल्यामुळे तसे उत्तर दि. 18.8.2006 रोजी देण्यात आलेले होते. माहिती अधिकारी यांचे उत्तर व प्रथम अपीलाचा निर्णय यांचा एकत्रित विचार केल्यास

माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य आहे. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये कोणत्या कागदपत्राच्या आधारे बदल केला गेला असे विचारले असते तर कदाचित त्यांना उत्तर मिळाले असते. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे त्यांना कारणे विचारले असल्यामुळे तसे त्यांना उत्तर मिळाले आहे व ते उत्तर त्यांनी विहित मुदतीत दिले आहे. आता प्रश्न असा उरतो की जे बदल अपीलकर्त्याच्या अर्जात मागितलेल्या प्रमाणे केलेले आहे त्या बदलाचा आधारे जर माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे असतील तर त्या प्रकारची कागदपत्रे पुरविणे हे संयुक्तिक राहिल. कागदपत्रे नसतील तर मात्र काल्पनिक असे कोणतेही माहिती देता येणार नाही. माहिती अधिकारी नाहित परंतु अशा प्रकारची माहिती ही दि. 25.10.2006 रोजी संबंधित ट्रस्टना देण्यात आली होती असे शाखा अभियंत्याने सांगितले होते. सदरची माहिती ही अपीलकर्ता यास मिळालेली नाही व त्याच माहितीच्या आधारे जर बदर केला गेला असतील तर ती माहिती अपीलकर्ता यास उपलब्ध करुन देण्यास हरकत नसावी व त्याप्रमाणे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यास सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या माहितीच्या अर्जामधील त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात ज्या कारणामुळे बदल झालेला आहे त्या बदलाच्या संदर्भात जरी कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल तर ती माहिती अपीलकर्ता यांस हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 11.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 326/2007.**

1) श्री वसंत प्रभाकर काळे
एस.एफ.8/3, उर्जानगर, चंद्रपूर 442404
तह. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसचिव, महानिर्मिती,
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या. 2 रा माळा,
प्रकाशगड, बांद्रा (पूर्व) मुंबई 51.

2) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिकारी
महाव्यवस्थापक (मा. स.)
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या. 2 रा माळा,
प्रकाशगड, बांद्रा (पूर्व) मुंबई 51. ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 6/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.12.2006 रोजी केलेल्या माहितीच्या अर्जाप्रमाणे त्यांना पुरेशी माहिती प्राप्त झालेली आहे त्यामुळे त्यांची कोणतीही तक्रार किंवा आक्षेप नाही असे लिहुन दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## **<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता यांना पुरेशी माहिती प्राप्त झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 11.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 327/2007.**

1) श्री प्रकाश पुंडलिकराव पुंजरवार

C/o यात्रा रोड, वणी–वरोरा गॅरेज

मु.पो.वरोरा जि. चंद्रपूर 442907 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा

उपलेखापाल,

आयुक्त कार्यालय, महसूल विभाग (भूसुधार शाखा)

जुने सचिवालय नागपूर ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 12/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.7.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी आयुक्त महसूल विभाग यांच्या कार्यालयात अर्ज केला होता. मौजा खांजी ता. वरोरा येथील स.नं.33 या आदिवासी इसमाच्या नावाने असलेले जागेचे नियमबाहय विक्री करण्याची व अकृषक परवानगी देण्या–या अधिका–याचे नाव व या संबंधाची पूर्ण माहिती कालावधी सन 2003–2004 टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन मागितली होती. सदरच्या अर्जाच्या

संदर्भात दि. 28.8.2006 रोजी माहिती अधिकारी (भूसुधार) आयुक्त कार्यालय नागपूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु सदरची माहिती चुकीची आहे म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील न दाखल करता द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले होते.

3. सदरच्या अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये आदिवासी जमीन मालकाचे नांव श्री बाबुराव लक्ष्मण चांदेकर असून त्यांनी गैरआदिवासी श्रीमती शेवंताबाई शंकर परचाके यांना विक्री करण्याकरीता परवानगी मागणी केली. या उत्तरामध्ये श्रीमती शेवंताबाई शंकर परचाके या आदिवासी असून गैरआदिवासी आहेत हे चुकीचे दिलेले आहे. व त्यामुळे ते जमीन व्यवहारात पुढे गेले पण त्यांचे जमीन व्यवहारात नुकसान झालेले आहे. त्यावर माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की माहिती उपलब्ध करुन देतांना ही टंकलेखनाची चुक आहे. परंतु अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सादर केले असते तर कदाचित ही चुक निदर्शनास आणून दुरुस्त करता आली असती. असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या प्रमाणे उपलब्ध माहिती वरुन एखाद्याचे नुकसान झाल्यास त्याबद्यलची दखल आयोगास घेता येते व म्हणून अपीलकर्ता यांना विचारले की जमिनीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार हा त्यांनी माहिती उपलब्ध होण्याच्या पुर्वी केलेला आहे किंवा माहिती उपलब्ध झाल्यानंतर केलेला आहे. परंतु त्यांनी असे सांगितले की त्यांनी जमिनीचा व्यवहार माहिती उपलब्ध होण्याच्या पूर्वीच केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये टंकलेखनाच्या चुकीमध्ये त्यांचे नुकसान झाले असे म्हणता येत नाही. पुन्हा त्यांनी प्रथम अपील केले नव्हतेच. त्यामुळे त्यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती विहीत मुदतीत उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे व इतर माहितीमध्ये त्यांची कोणतीही तक्रार नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता यांना माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 11.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 329/2007.**

1) श्री देवराव तानबाजी आंबटकर
रा. बाबुपेठ पाण्याचे टाकीजवळ, झुल्लुरवार सावकार
यांचे घरासमोर, बाबुपेठ वार्ड नं.1 चंद्रपूर
तह.जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आयुक्त तथा प्रादेशिक संचालक
नगर पालिका प्रशासन नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
श्री ओमप्रकाश राजारामजी दिवटे, मुख्याधिकारी,
नगर परिषद चंद्रपूर. तह.जि.चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 24/1/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी त्यांची प्रकृति ठिक नसल्यामुळे व ते रुग्णालयात दाखल झालेले असल्यामुळे आज सुनावणीस न घेता पुढिल तारीख देण्यात यावी व सदरच्या अपीलाच्या संदर्भात त्यांना एकुण 60 कागदपत्रे दाखल करावयाची आहेत असा अर्ज त्यांनी दिलेला आहे. असा अर्ज त्यांनी दिलेला असल्यामुळे उत्तरवादी हे हजर आहेत व अपीलकर्ता अर्जदार यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत दिली किंवा नाही हि सिध्द करण्याची जबाबदारी ही

उत्तरवादी यांची असल्यामुळे व अपीलकर्ता यांचे त्यांनी केलेला माहितीचा अर्ज, प्रथम अपीलाचा अर्ज, द्वितीय अपीलाचा अर्ज हा कागदपत्रात असल्यामुळे त्याबाबतची माहिती ही उत्तरवादी यांचेकडून घेणे आवश्यक असल्यामुळे व यापेक्षा आणखी कागदपत्राची आवश्यकता नसल्यामुळे सदरचा अर्ज हा अमान्य करण्यात आलेला असून सुनावणी घेण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांचा मुलगा अरविंद हे हजर आहेत. त्यांना हया बाबत कोणतीही माहिती नाही. ते फक्त अर्ज देण्याकरीता आले होते.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.7.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल केला होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 22.2.2006 रोजी अपीलकर्ता यांस माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 17.3.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा 20.4.2006 रोजी देण्यात आला असून पत्र दि. 17.4.2003, 17.8.2005, 20.9.2005 व 3.9.2005 च्या अर्जावर माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय देवून सदरचे अपील मंजुर करण्यात आले. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून द्वितीय अपील दाखल करण्यात आलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याच्या अर्जाची छाननी केली असता असे दिसून येते की त्यांच्या अर्जाच्या सहपत्रात ज्या मुद्यावर माहिती मागितलेली आहे परंतु मुद्यावरची माहिती दि. 22.2.2006 रोजी विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती योग्य अशीच उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यापैकी बहुतांश मुद्ये ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे अपेक्षित नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे कोणत्याही प्रकारचे कारवाईच्या बद्यलचे आदेश करण्याची मागणी करता येत नाही. तसेच एखाद्या झालेल्या कारवाईबद्यलचे कारण विचारता येत नाही. अर्ज केलेल्या तारखेस सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अभिलेख्याच्या स्वरुपात, दस्तऐवजाच्या स्वरुपात थोडक्यात साहित्याच्या

स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल तीच माहिती ही उपलब्ध करुन देणे आणि तीही विहित मुदतीत हे अपेक्षित आहे. ती आज उपलब्ध नसली तरी ती उपलब्ध होत नाही असेही उत्तर हे माहितीच्या अधिकारातील उत्तर होते. त्यामुळे कोणत्याही प्रकारची कारवाईची अपेक्षा करणे ती झाली नाही म्हणून पुन्हा पुन्हा अर्ज करणे व अपूर्ण व दिशाभूल करणाची माहिती उपलब्ध करुन दिली असे म्हणणे हे अधिनियमामध्ये अपेक्षित नाही त्यामुळे 22.2.2006 रोजी ज्या मुद्यावर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती माहिती व अपीलकर्ता यांचा मुळ अर्ज माहितीच्या अर्जासोबत असलेल्या सहपत्र नं.1 मध्ये मुद्या बरोबर तपासली असता ती माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे. हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा ज्या मुद्यावर प्रथम अपीलात माहिती उपलब्ध करुन द्या असा निर्णय दिलेला आहे त्या मुद्याच्या संदर्भात पुन्हा माहिती अधिकारी यांनी दि. 2.6.2006 रोजी सुनावणी घेतलेली आहे व दि. 11.6.2006 रोजी त्याबद्यलचे उत्तर दिलेले आहे. एकदा उपलब्ध झालेल्या माहितीवर पुन्हा पुन्हा नविन मुद्ये काढुन माहिती अपूर्ण आहे हे म्हणणे सुध्दा माहितीच्या अधिकार अधिनियमाच्या प्रमाणे अपेक्षित नाही. प्रथम अपीलात किंवा द्वितीय अपीलामध्ये तेही नविन मुद्ये उपस्थित करता येत नाहीत. माहिती अधिका–याकडून उपलब्ध झालेल्या माहितीवरुन तर नाहीच नाही. अन्यथा माहितीच्या संदर्भामध्ये ही कधीही न संपणारी बाब होईल. दि. 11.6.2006 च्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे पुन्हा माहिती अधिकारी यांनी 20.4.2006 रोजी अपीलकर्ता यांचे समाधान होत नसल्यास उपलब्ध नस्तीचे अवलोकन करावे असेही पत्र त्यांना दिलेले आहे असे त्यांचे म्हणणे आहे परंतु दिनांक 24.4.2007 रोजी अपीलकर्ता हे हजर न राहिल्यामुळे दि. 26.4.2007 ही तारीख त्यांना देण्यात आली होती. पुन्हा दि. 26.4.2007 रोजी त्यांना त्यांच्या सोयीप्रमाणे त्यांनी हजर राहून नस्तीचे अवलोकन करावे असे त्यांना कळविण्यात आले होते परंतु सदरचे पत्र

त्यांनी स्विकारले नाही असे माहिती अधिकारी यांनी सांगितले. याचा अर्थ त्यांना माहितीची आवश्यकता नाही असे दिसते. एवढा सगळा प्रयत्न झाल्यावर सुध्दा मुद्दा राहातो की अपीलकर्ता यास माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे किंवा नाही माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे किंवा नाही याबाबत वरील विवेचनावरुन असे दिसते की दि. 22.2.2006 रोजी त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता यांना त्यांचे दि. 1.2.2006 चे अर्जाप्रमाणे दि. 22.2.2006 रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 11.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 356/2007.**

1) श्री संदिप बद्रिप्रसाद अग्रवाल

स्मृती अग्रसेन रोड, धरमपेठ, नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर

1) जन माहिती अधिकारी तथा
त्हसिलदार नागपूर (ग्रामीण) ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 3/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व त्यांचे वकील हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रतिनिधी म्हणून अन्नधान्य वितरण अधिकारी यांना पाठविले आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.3.2006 रोजी 1) मौजा सुराबर्डी मे कितनी एकड सरकारी जमीन है! उनके खसरा नंबर, सर्व्हे नंबर, क्या है! उन सरकारी जमीनों में से कौन कौन सी जमीन किस विभाग की है! उसकी संपूर्ण माहिती नक्शे व 7/12 के साथ दी जाय!

2) मौजा सुराबर्डी में उन सभी सरकारी जमिनो मे से किन किन जमिनो पर किसी व्यक्तिगत ने अतिक्रमण किया है क्या? अगर किया है तो विभाग द्वारा उसपर क्या

कार्यवाही की गयी है! अतिक्रमण की गयी जमिनों की संपूर्ण माहिती नक्शेके साथ व की गयी कारवाई के कागजातों के साथ दी जाय!

3) मौजा सुराबर्डी में हमारी जानकारी के अनुसार किसी व्यक्ती विशेष ने कयी सरकारी रास्ते, पायधन, नैसर्गिक पहाडों पर कब्जा कर उसे बंद कर दिया गया है! क्या यह सही है क्या? और अगर यह सही है क्या विभाग ने उन्हे कोई अनुमती दी है क्या? अगर अनुमती दी है तो उसके सारे कागजात दिये जाय! अन्यथा विभाग ने उसपर क्या कारवाई की इसके कागजात दिये जाय!

4) मौजा सुराबर्डी मे कई नैसर्गिक पहाडी है! क्या यह पहाडियॉ सरकारी है या निजी मालकी की है और उन पहाडियों पर भी बडे पैमाने पर अतिक्रमण हो रहा है! उसे रोकने के लिये विभाग ने क्या कारवाई की है! संपूर्ण कागजात के साथ माहिती दी जाय!

सदरची माहिती पोष्टाने घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 7.4.2006 रोजी नायब तहसिलदार नागपूर यांनी पत्राद्वारे नागपूर (ग्रामीण) तालुका मौजा सुराबर्डी प.ह.नं. 5 अ येथील सरकारी जमीनीचा 7/12 व नकाशा तसेच संपूर्ण जमिनीविषयीची माहिती त्वरीत या कार्यालयातील नायब नाझर यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. त्यानंतर दि. 10.4.2006 रोजी पुन्हा मौजा सुराबर्डी येथील सरकारी जमिनीचे खसरा नंबर व 7/12 अंदाजे 350 ते 400 आहेत. त्याचप्रमाणे त्या सर्व सर्व्हेनंबरचे नकाशे असे एकुण 1000 रु. स्वतः या कार्यालयात त्वरीत जमा करावे असे कळविले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. 27.4.2006 रोजी रु. 1000 हे जमा केलेले आहे. त्यानंतर दि. 20.5.2006 रोजी आपण अग्रीम राशी नायब नाझर यांच्याकउे जमा केल्यानंतर 4 दिवसानी मौजा सुराबर्डी येथील शासकीय जमिनीचे 7/12 व नकाशे नायब नाझर योचंकडे नेले नाही ते घेवून जावेत असे कळविले आहे. दि. 25 मे 2006 रोजी अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे परंतु

सदरची माहिती अपूर्ण आहे व 176 7/12 चे उतारे दिलेले आहेत. त्यामुळे रु. 2 प्रती प्रमाणे रु. 354 होतात एकुण 1074 रु. भरणा केलेला आहे त्यामुळे रु. 720 हे परत करावे असा अर्ज केलेला आहे. परंतु सदरचे जमा रकमेपैकी रु. 720 हे परत न केल्यामुळे प्रथम अपील दि. 8.9.2006 रोजी दाखल करण्यात आले होते व प्रथम अपीलामध्ये रु. 720 हे परत करावे असे म्हटले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय झाला आहे किंवा नाही हा आढळून येत नाही परंतु दि. 22.6.2006 रोजी तहसिलदार नागपूर ग्रामीण यांनी पुन्हा अपीलकर्ता यास पत्र देवून मौजा सुराबर्डी येथील शासकीय जमिनीचा मुद्दा क्र. 1 ते 4 मध्ये नमुद केल्याप्रमाणे माहिती दि. 19.5.2006 रोजी रु. 1074 प्राप्त झाले. मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचे पत्र क्र. राजस्त/कार्या 3/कावी 93/06 दि. 19.6.2006 च्या पत्रान्वये मौजा सुराबर्डी येथील मुद्दा क्र. 1 ते 5 मध्ये नमुद केलेली माहिती ती तलाठी दप्तराशी संबंधित असून ती प्रमाणीत आहे तरी आपण मौजा सुराबर्डी येथील तलाठी कार्यालयात प्रत्यक्ष जावून प्रमाणीत प्रतीची योग्य ती फी भरुन संबंधित माहिती प्राप्त करावी असे कळविले आहे. पुन्हा दि. 17.7.2006 रोजी अपीलकर्ता यास मागितलेली माहिती ही मौजा सुराबर्डी येथील कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे तसेच सर्वप्रथम माहिती अधिकारी हे मौजा सुराबर्डीशी येथील असल्यामुळे आपण मागितलेली माहिती मिळविण्याकरीता सर्वप्रथम मौजा सुराबर्डी येथील तलाठी यांचेकडे माहितीच्या अधिकारा अंतर्गत अर्ज करावा. सदरच्या निर्णयामुळे अपीलकर्ता यांनी व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी दि. 27.3.2006 रोजी केलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अपीलकर्ता यास तलाठी किंवा नायब नाझर यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले. परंतु माहितीचा अर्ज मात्र त्यांचेकडे हस्तांतर केला नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. तो नियमाप्रमाणे हस्तांतर करुन त्याप्रमाणे कारवाई करावयास पाहिजे होती. असे असले तरी अपीलकर्ता यांना नायब तहसिलदार यांनी माहिती उपलब्ध करुन

देण्याकरीता रु. 1000 चा भरणा करण्यास कळविले होते असे दिसते. माहिती ही अतिशय व्यापक स्वरुपात असल्यामुळे व मोघम स्वरुपाची असल्यामुळे अंदाजे असा शब्द वापरुन रु.1000 भरावे असे कळविलेले दिसते. अशा प्रकारे व्यापक व मोठया प्रमाणात व मोघम स्वरुपात माहिती मागितलेली असली तरी त्याबाबत माहिती अधिकारी यांनासुध्दा कोणत्याही प्रकारचा अंदाज घेता येत नाही परंतु माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की जी माहिती अपीलकर्ता यांनी मागितलेली आहे ती अतिक्रमणाशी संबंधित असून तशा प्रकारची माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये उपलब्ध नसते व ती तयार करुन द्यावी लागेल. मात्र त्याकरीता त्यांची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागेल. त्यामुळे व तसेच अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये अभिप्राय येईल असे प्रश्न सुध्दा उपस्थित केलेले आहे व त्या प्रश्नाची माहिती अभिप्राय स्वरुपात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे अपेक्षित नाही. म्हणून ती दिली नाही. वास्तविक अपीलकर्ता यांनीसुध्दा माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागतांना ती मोघम किंवा विस्तृत स्वरुपात मागितली असल्यास त्याबाबतचे निश्चित असे तपशिल दिल्यास माहिती उपलब्ध करुन देणे सोयीचे होते. माहिती मोघम मागावयाची, विस्तृत प्रमाणात मागावयाची व ती पुन्हा विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नाही ही तक्रार करावयाची हे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी आज माहिती मागितलेली असली तरी ती विहित मुदतीत उपलब्ध करुन देताच येईल असे नाही पुन्हा माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती उपलब्ध करुन देता येते. माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. व त्यामुळे तशाप्रकारे माहिती ही उपलब्ध करुन दिलेली दिसत नाही. त्याबद्यल अपीलकर्ता यांची फारशी तक्रार दिसत नाही. परंतु अपीलकर्ता यांचेकडून माहितीच्या करीता रु. 1000 हे भरुन घेतलेले आहे. सुरुवातीला माहिती किती उपलब्ध होईल हा अंदाज जरी नसला तरी माहिती उपलब्ध करुन दिल्यावर उर्वरीत रक्कम त्यांना परत करावयास पाहिजे होती व तीच अपीलकर्ता यांची मागणी त्यांनी प्रथम अपीलातसुध्दा केली होती.

प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या बद्दल कागदपत्र दाखल केलेले नाही हा प्रथम अपीलीय अधिकारी यांचा बेजबाबदारपणा आहे. स्वतः त्यांना हजर राहावयाचे नव्हते त्यामुळे तरी त्यांनी अधिक काळजी घ्यावयास पाहिजे. यापुढे आयोगा पुढील चौकशीच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी विशेष काळजी घेणेबद्दल जिल्हाधिकारी यांनी याबाबत दखल घेणे आवश्यक आहे. सदरच्या प्रथम अपीलीच्या नंतर सुध्दा जे पत्र अपीलकर्ता यांना पाठविले आहे ते कोणत्या आधारावर पाठविले आहे त्याबाबतचाही कोणताही अर्थबोध होत नाही. जेव्हा केव्हा वाटेल तेव्हा त्यांना उत्तर द्यावयाचे अशा प्रकारची कार्यपध्दती दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये जेव्हा विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे व त्याकरीता शास्ती लावण्याची तरतुद आहे त्याच वेळेस या अधिनियमाखालील अर्ज हे काळजीपूर्वक हाताळले पाहिजे ही जाणीव विशेषतः महसुल विभागात राहावयास पाहिजे होती परंतु ती अजुनपर्यंत झालेली दिसून येत नाही. याबाबतसुध्दा विभागीय आयुक्त यांनी दखल घेणे आवश्यक आहे. सदरच्या प्रकरणी अपीलकर्ता यास तातडीने रु. 720 हे परत करणे आवश्यक राहिल व त्याचप्रमाणे त्यांना त्यांनी मागितलेली पुढिल सर्व माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून त्यांना रु. 720 हे तातडीने परत करण्यात यावे. तहसिलदार नागपूर (ग्रामीण) यांनी अपीलकर्ता यांनी त्यांचे माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध होवू शकेल त्या स्वरुपात त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) निर्णयाची प्रत ही जिल्हाधिकारी नागपूर व विभागीय आयुक्त नागपूर यांना दखल घेण्यासाठी पाठविण्यात यावी.

6

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 12.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 406/2007.**

1) श्री विकास गणपत शेंडे
रा. राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे
हिन्द नगर, वर्धा ता.जि.वर्धा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,
9, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर,
मुंबई – 400 01.

1) जन माहिती अधिकारी तथा
श्री लक्ष्मिकांत टिके
प्रभारी प्रबधक, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,
9, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर,
मुंबई – 400 01. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 24/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रेसुध्दा दाखल केलेली नाहीत. माहिती अधिकारी यांनीसुध्दा कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2006 रोजी 1 ते 4 मुद्यांवर माहिती अधिकारी यांना माहिती मागितली होती. व ती रजिस्टर पोष्टाने पाठवावी असे कळविले. माहितीचा कालावधी 2/3 वर्षाचा आहे असे नमुद केले आहे. 1) दि. 8.7.2004 ला माहिती मागण्याचा अधिकार 2002 अंतर्गत केलेल्या अर्जावर माहिती कां दिली नाही करणे द्यावी 2) दि. 9.8.2004 ला वरिल नियमांतर्गत केलेल्या अपीलावर अपिलीय अधिका—याने उत्तर दिले नाही स्पष्टता द्यावी.

3) वरील नियम/कायदा आपल्या कार्यालयास लागू होत नाही काय? किंवा वरील नियम/कायदा सचिव, राज्य मानव आयोगास समजला नाही. कारणासहित निवेदन द्यावे.

4) प्रकरण नं. राज्य आयोग 1164/03/5580 दि. 18.11.2004 मध्ये दिलेला निर्णय खालील बाबीवरुन योग्य वाटतो काय?

अ) दि. 25.12.2004 चे पत्र पाहावे राज्य मानव आयोगाने विचारात कां घेतले नाही

ब) उपपोलीस आयुक्त नागपूर यांनी दिलेला नि.अहवाल बोगस वाटत नाही काय? नागपूर सुधार प्रन्यासने मागतलेला पोलीस फोर्स पत्र अजनी पोलीस स्टेशन व उपपोलीस आयुक्त यांना मिळाले नाही काय? जर मिळाले असेल तर फोर्स कां दिला नाही.

क) नागपूर सुधार प्रन्यासने कायद्याप्रमाणे अनधिकृत बांधकाम असून सुध्दा 1994 पासून कार्यवाही केली नाही याबद्यल त्यांच्यावर आरोपपत्र कां दाखल केले नाही.

ड) म्हाडा नागपूर यांनी सुध्दा कायद्याप्रमाणे कारवाइ केली नाही. त्यामुळे मानव अधिकाराचे हनन झाले नाही असे होत नाही काय? आरोपपत्र दाखल करण्यास पुरेसा कारण होत नाही काय? पूर्ण पैसे घेवून नियमाप्रमाणे बांधकाम/सुविधा नसणे हा अकायदेशीर व्यवहार आयोगास वाटत नाही काय?

इ) शासनाने बनविलेले नियम/कायदा पाळणे आयोगांस काय वाटते. जर आयोगास

कायदा पाळणे बंधनकारक वाटत नसेल तर माझे वरील अकायदेशीर कृतीमुळे 25 लाख रुपयाचे नुकसान झाले. ते आयोगाने देण्याचे द्यावे. 1996 पासून मला स्वतःच्या घरात राहण्याबद्यल वरिल कार्यालयाने संरक्षण दिले नाही माझ्यावर खोटे आरोप केले. याबद्यल नुकसान भरपाई द्यावी. याबद्यल आयोगाने स्पष्टता द्यावी. माहिती अधिकारी यांनी दि. 30.6.2006 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे दिसते. सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 25.7.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय न देता दि. 28.7.2006 रोजी अपीलीय अधिकारी यांनी उत्तर पाठविलेले दिसते. सदरच्या उत्तरानेसुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 7.6.2006 च्या माहितीच्या अर्जामध्ये दि. 8.7.2004 ला माहिती मागण्याचा अधिकार 2002 अंतर्गत केलेल्या अर्जावर माहिती कां दिली नाही कारणे द्यावे याबद्यलची माहिती विचारली होती. परंतु माहिती अधिकारी यांनी ‘‘महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 अंतर्गत महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने शासकिय माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांची नेमणूक दि. 29.12.2000 च्या आदेशान्वये करण्यात आली. त्यामुळे आपला दि. 8.7.2000 चा अर्ज दि. 9.8.2000 ची अपील आपले प्रकरण क्र. 1164 2003 ची संदर्भित सदस्याकडे पुढिल कार्यवाही करीता पाठविण्यात आले होते’’ असे उत्तर दिले आहे. यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी विचारलेली माहिती व माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे विसंगत आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या खाली केलेला माहितीचा अर्ज व अपील ही स्वतंत्र कार्यवाही आहे. त्यात विचारलेली माहिती जरी प्रकरणात क्र. 1164 शी संबंधित असली तरी त्याबाबतचे स्वतंत्र उत्तर देणे अपेक्षित होते. याचा अर्थ अजुनही दि. 8.7.2004 चा अर्ज व दि. 9.8.2004 त्यावरील अपील हे अनुत्तरीत राहाते. व

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 अंतर्गत सदरच्या अर्जावर व अपीलावर कोणतीही कारवाई केलेली दिसून येत नाही. व याबाबत उत्तर चुकीचे दिलेले आहे हे अर्जदार यांचे म्हणणे बरोबर दिसून येते. मुद्या क. 3 व मुद्या क. 4 वरील दिलेली माहिती ही योग्य आहे. प्रथम अपीलीच्या संदर्भातसुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत सुनावणी घ्यावयाची असते. अपीलकर्ता यांस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावयाची असते. व प्रशासकीय आदेशाप्रमाणे आदेश न काढता कारणासहीत निर्णय द्यावा लागतो ही अपीलाची संकल्पना आहे. त्याप्रमाणे दि. 28.7.2006 चे निर्णय दिसून येत नाही. त्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 व कलम 19 मधिल तरतुदींचे तंतोतंत पालन केलेले दिसून येत नाही त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींची माहिती घेवून त्याप्रमाणे माहिती अधिकारी यांनी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरची प्रकरणे हाताळावीत. अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे माहितीच्या अधिकारामध्ये मुद्या क. 1 ची माहिती ही चुकीची दिलेली असल्यामुळे माहिती अधिकारी हे दोषी ठरतात. व त्याबाबत मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष यांनी दखल घेणे आवश्यक आहे. यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे आलेला अर्ज व त्यावरील प्रथम अपील याची हाताळणी होईल याची अपेक्षा करण्यास हरकत नाही. अपीलकर्ता याच्या माहितीच्या अधिकारातील अर्जातील मुद्या क. 1 ची माहिती अनुत्तरीत असल्यामुळे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. अन्यथा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 जरी निरसीत झालेला असला तरी महाराष्ट्र माहितीचा अधिकार (निरसीत) अधिनियमाच्या कलम 2 प्रमाणे सदरचे अर्ज व अपील हे प्रलंबित आहे असे समजून त्यावरील कार्यवाही झालेली नसल्यामुळे मा. लोक आयुक्त यांचेकडे त्याबाबतचे द्वितीय अपील अपीलकर्ता यास करता येईल. व त्याच अधिनियमाप्रमाणे मा. लोक आयुक्तांना सदरच्या बाबत निर्णय घेता येईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांचे माहितीचे अर्जातील मुद्या क्र. 1 प्रमाणे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या तरतुदीप्रमाणे दि. 8.7.2004 चा अर्ज व 9.8.2004 चे अपील याबाबतची कार्यवाहीचे उत्तर त्यांना सदरचा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत देण्यात यावा.

2) अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार (निरसीत) 2005 च्या कलम 2 प्रमाणे मा. लोक आयुक्त यांचेकडे द्वितीय अपील सादर करावे.

3) तात्कालीन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यास त्यांच्या दि. 27.7.2006 च्या अर्जातील मुद्या क्र. 1 वरील माहिती ही चुकीची दिलेली असल्यामुळे त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत आहे. तसेच तात्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी घेतलेली नसल्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्याबाबत सुध्दा त्यांना समज देण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 12.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 408/2007.**

1) श्री ओमप्रकाश गोकुलचंद ओझाा
रा. गुरुवार बाजार, संजय व्हिडीयोजवळ
वाशिम ता. जि. वाशिम ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय आयुक्त,
अमरावती विभाग अमरावती.

1) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी (जिल्हा चौकशी अधिकारी)
अमरावती. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 27/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जिल्हाधिकारी वाशिम करीता अतिरिक्त जिल्हाधिकारी उपस्थित होते.

2. वास्तविक अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये राज्य जन माहिती अधिका–याचा तपशिल हा जिल्हा चौकशी अधिकारी जिल्हाधिकारी अमरावती, व अपीलीय अधिकारी जिल्हाधिकारी अमरावती असे नमुद केलेले आहे. माहितीचा अर्ज यामध्ये सुध्दा माहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी अमरावती, जिल्हा चौकशी

अधिकारी अमरावती असे नमुद केलेले आहे. प्रथम अपीलातसुध्दा विभागीय आयुक्त अमरावती विभाग अमरावती असे प्रथम अपील प्राधिकरणाचे नाव, पदनाम व पत्ता दिलेला आहे व त्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि. 23.8.2007 रोजी नोटिस जिल्हा चौकशी अधिकारी अमरावती व विभागीय आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांना काढलेला आहे. हया कार्यालयाच्या नोटिसीमध्ये किंवा अर्जदाराच्या अर्जात व अपीलात वाशिम येथील माहिती अधिकारी असा उल्लेख कोठेही नाही. तरीसुध्दा अमरावती विभाग अमरावती करीता ज्या अधिका–याने सही केलेली आहे त्यांनी दि. 31.8.2007 रोजी जिल्हाधिकारी वाशिम यांचेकडे पत्राने कळविले आहे. जिल्हाधिकारी वाशिम करीता सुध्दा ज्या कोणी अधिका–याने सही केलेली आहे त्यानी मात्र सदरचे अपीला संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांचेशी संबंध नाही असे राज्य माहिती आयोगाकडे कळविलेले आहे. तरीसुध्दा अतिरिक्त जिल्हाधिकारी वाशिम हे हजर होते. मात्र जिल्हाधिकारी अमरावती या कार्यालयातून कोणीही सदरच्या अपीलाच्या सुनावणीस हजर नाही. विभागीय आयुक्त कार्यालय यांचेकडून उपलेखापाल यांना पाठवून दिले आहे.

3. वर नमुद केल्याप्रमाणे अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय व अमरावती विभागीय आयुक्त कार्यालय यांचा गलथान कारभार दिसून येतो. सदरच्या गलथान कारभाराच्या संदर्भात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालून विभागीय आयुक्त अमरावती विभागात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 तरतुदींच्या बद्यल अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे असे दिसते. राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीस कोणत्याही अधिका–याला पाठवून देणे हा राज्य माहिती आयोगाचा अवमान आहे. व त्यास विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी अमरावती हे जबाबदार आहेत. त्याकरीता

त्याकरीता प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दखल घेवून योग्य ती कारवाई अमरावती महसुल विभागाच्या बाबत करणे आवश्यक आहे.

4. अपीलकर्ता यांनी दि. 8.8.2006 रोजी माहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी अमरावती, जिल्हा चौकशी अधिकारी अमरावती, माहिती अधिकारी अमरावती, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती अशाप्रकारे संबोधुन माहितीचा अर्ज दिला होता. ज्या संदर्भात त्यांना विहित मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही असे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी दि. 8.1.2007 रोजी विभागीय आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांचे कडे प्रथम अपील कुरीअरनी दाखल केलेले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. व तसेच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) प्रमाणे व कलम 20 प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सिध्द करण्याची जबाबदारी ही माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची असते. परंतु हा निर्णय देईपर्यंत जिल्हाधिकारी अमरावती यांचे कार्यालयातून कोणताही अधिकारी हजर नव्हता परंतु आता निवासी उपजिल्हाधिकारी हे हजर झाले आहेत. त्यांनी असे सांगितले की त्यांनी दि. 18.8.2006 रोजी अपीलकर्ता यांना पत्र दिले होते व त्याप्रमाणे त्यांना नगर परिषद वाशिम कडून माहिती उपलब्ध करुन घेण्यास सांगितले होते. परंतु सदरचे पत्र हे अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. तसेच अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचे कागदपत्र त्यांनी मागितले नव्हते तरी अहवालाच्या संदर्भातील तारीख व जावक क्रमांक मागितलेले होते. त्यामुळे नगर परिषद वाशिम यांचे कडून कोणतीही माहिती उपलब्ध करुन घेण्याचा प्रश्नच उदभवत नाही. त्यांनी मागितलेली माहिती ही जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती या कार्यालयातून उपलब्ध होवू शकते असे त्यांचे म्हणणे आहे. यावरुन पुन्हा असे दिसून येते की अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आलेले अर्ज वाचण्याचा प्रघात दिसत नाही. आलेले अर्ज

काळजीपूर्वक वाचले असते तर अपीलकर्ता यांची माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देता आली असती. परंतु अर्ज न वाचताच अपीलकर्त्यास नगर परिषद वाशिम कडून माहिती घ्यावी असे उत्तर देण्याचा प्रसंग आला नसता. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या माहिती अधिकारी यास शास्ती लादण्याची तरतूद आहे. असे असून सुध्दा सदरच्या कायद्याच्या तरतुदीबद्दल अज्ञान किंवा उदासिनता दाखविणे ही शास्तीची भिती नाही असेच दिसून येते. त्यामुळे माहिती अधिकारी यांनी ज्याप्रमाणे तरतुदींचे उल्लंघन केले आहे त्याचप्रमाणे विभागीय आयुक्त कार्यालयात जे प्रथम अपीलीय अधिकारी असतील त्यांनीसुध्दा सदरच्या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे. आजही माहिती अधिकारी हे उपस्थित नाहीत. त्यावरुन सुध्दा विभागीय आयुक्त अमरावती यांच्या विभागात माहिती अधिकारी हा जबाबदार असतो याबद्यलही माहिती नाही असे दिसून येते. आयोगा पुढिल सुनावणीस कोणत्याही अधिका–याला पाठवून दिल्यास माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची जबाबदारी कमी होत नाही. कायद्यात शेवटी तेच जबाबदार आहेत. त्यामुळे सदरच्या प्रकरणी माहिती अधिकारी हे दोषी दिसून येतात. त्याबाबत विभागीय आयुक्त अमरावती यांनी दखल घेणे आवश्यक असून त्याबाबत योग्य ती प्रशासकीय कारवाई त्यांचे विरुध्द करणे आवश्यक राहिल. सदरच्या अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे सुध्दा कलम 20 प्रमाणे ते शास्तीस पात्र राहतील. परंतु शास्ती लादण्यापूर्वी संधी देणे आवश्यक असल्यामुळे सदरच्या बाबत माहिती अधिकारी यांनी दि. 29.9.2007 रोजी सकाळी 10.30 वाजता त्यांचे म्हणणे आयोगापुढे सादर करणे संयुक्तिक राहिल.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांनी (जिल्हा चौकशी अधिकारी) (संबंधित माहिती अधिकारी) यांनी अपीलकर्ता यांस त्यांच्या दि. 8.8.2006 च्या अर्जा प्रमाणे सदरचा निर्णय उपलब्ध झाल्यापासून 8 दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) माहिती अधिकारी यांचे विरुध्द कलम 20 प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी दि. 29.9.2007 रोजी सकाळी 10.30 वाजता आयोगा पुढे करावा. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दखल घेतलेली नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे विभागीय आयुक्त यांनी त्यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रधान सचिव, (महसुल विभाग) मुंबई यांना पुढील कारवाईसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 12.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 410/2007.**

1) सौ. चंद्राबाई परसराम नितनवरे
रा. बोखारा पो. गोधनी (रेल्वे)
ता. नागपूर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी नागपूर

1) जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार कामठी
ता. कामठी जिल्हा नागपूर. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक 11/10/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ती यांनी दिनांक 15.7.2006 रोजी मौजा रनाळा येथील जुना ख. नंच 16/2 क्षेत्र हे. 10 आर 45 चा घेतलेला फेरफार दि. 25.2.19983 व खं. नं. 121/6 चा घेतलेला फेरफार खं.नं. 16/2 चा आपसी वाटणीत कोणती वाटणी पत्राने झाली शेतजमीनीचे आपसी वाटणी केलेली वाटणीपत्र ज्या वाटणीपत्राच्या आधारे दि.25.2.83 वाटण्या झाल्या ते वाटणीपत्र आवश्यक आहे व दि. 14.12.2005 रोजी घेतलेला फेरफार क्र. 4001/14.12.2005 खं. नं. 121/6 हे. 1.34 चा फेरफार कसा काय घेण्यात आला

आहे. माहिती टपालाद्वारे आवश्यक आहे असे नमुद करुन माहिती मागितली आहे. सदरची माहिती तहसिल कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे रनाळा येथील तलाठी यांचेकडून माहिती मागितली व सदरची माहिती ही उपलब्ध झाल्यावर अपीलकर्ता यांना दि. 30.8.2006 रोजी कळविण्यात आले. अपीलकर्ता यास माहिती लवकर उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलीच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 8.9.2006 रोजी तहसिलदार कामठी यांना पत्राने लिहुन माहिती मागितली होती. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने दि. 4.11.2006 रोजी पुन्हा अपीलकर्ता हिस दि. 1.11.2006 चे पत्रानुसार माहिती मागविण्यात आलेली आहे असे कळविलेले दिसते. अपीलकर्ता यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांनी कृषी भूखाते पुस्तिकाची झेरॉक्स प्रत त्याचप्रमाणे अधिकार अभिलेख पंजी स.नं.16/2 च्या संदर्भामध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे सोबत नकाशापण उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यानंतर 7/12 चे उतारे पण उपलब्ध करुन दिलेले आहे. सदरच्या अधिकार अभिलेख पंजीमध्ये तोंडी वाटण्याप्रमाणे नोंद करण्यात आली असा शेरा दिलेला आहे. त्याचप्रमाणे भूमापन 121/6 वर मृत्युपत्र क्र. 4001 दि. 14.12.2005 प्रमाणे नोंद घेतलेली दिसून येते. व या संपूर्ण कागदपत्राच्या आधारे त्यांना दि. 30.8.2000 च्या पत्रासोबत तलाठयाने दिलेला अहवाल पाठविलेला आहे. तलाठयाने दिलेल्या अहवालातसुध्दा आपसी तोंडी वाटणीप्रमाणे नोंद घेतलेली आहे व मृत्युपत्राप्रमाणे नोंद घेतलेली आहे. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात, अभिलेख्याच्या स्वरुपात किंवा कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल त्या स्वरुपातच ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. तलाठी यांनी ज्याप्रमाणे अहवाल तयार करुन दिलेला आहे त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिल्यास नंतर अर्जदार त्याबाबत आक्षेप घेत असतात व त्यामुळेच माहिती तयार करुन देणे अपेक्षित

नाही. सदरच्या प्रकरणी सुध्दा ज्या वाटण्या झालेल्या आहेत त्या वाटण्या आपसी झालेल्या आहेत ही मुळातच माहिती माहितीच्या अधिकाराच्या अर्जात दिलेली आहे. 1983 मध्ये ज्या काही नोंदी घेतलेल्या आहेत त्या आपसी तोंडी वाटणीपत्रा प्रमाणे घेतलेल्या असल्यामुळे सदरचे वाटणीपत्र हे उपलब्ध नाही असे दिसते. मात्र अपीलकर्ता यास माहिती असूनसुध्दा तेच वाटणीपत्राच्या प्रतीचा त्यांना आग्रह आहे. अपीलकर्ता यांनी पुढे सदरची नावे कशी आली अशाप्रकारची तक्रार ज्या वेळेस केली होती त्यावरुनच अपीलकर्त्यास कारवाई करुन पाहिजे आहे असे दिसते. परंतु अशा प्रकारची कारवाई करण्याचे अधिकार अधिनियमाप्रमाणे नाही. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता यास तक्रार करावयाची असल्यास महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 प्रमाणे त्यांना जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार अर्ज दाखल करता येईल. व त्याप्रमाणे त्यांनी अर्ज दाखल करुन योग्य तो न्याय मिळवून घ्यावा. सदरच्या प्रकरणावर नमुद केल्याप्रमाणे मात्र त्यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामुळे फेरफार कसा काय घेण्यात आला याबद्यलचे उत्तर मात्र माहितीच्या अधिकारत मिळू शकत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 12.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 413/2007.**

1) श्रीमती आभा सुनिल खंडेलवाल
समृध्दी संकुल, बिल्डींग नं. 5–1,
प्लॉट नं.106, हिस्लॉप कॉलेज जवळ
सिव्हील लाईन नागपूर–440 001. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 32

1) जन माहिती अधिकारी तथा
अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक 3/11/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहे उत्तरवारी गैरहजर आहेत. अपीलकर्ती हिने पूर्वी अपील क. 2007/1220/02 हे मुख्य माहिती आयुक्त मुंबई येथे दाखल केले होते. सदरच्या अपीलाचा निर्णय हा दिनांक 3 ऑगष्ट 2007 रोजी झालेला आहे. सदरच्या अपीलातील दि. 6.11.2006 च्या अर्जातील विषय आणि आता आयोगापुढे असलेल्या द्वितीय अपीलातील अर्जातील विषय जरी एक असले तरी तपशिल वेगळा आहे परंतु माहिती एकच आहे असे उत्तरवादी

यांना वाटले असल्यामुळे आज ते हजर राहिले नाहीत असे त्यांनी कळविले. अपीलकर्ती हिने दि. 8.8.2006 रोजी माहिती मिळणेसाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जामध्ये हिस्लॉप कॉलेज नागपूर यांना ''शिक्षकवर्ग नेमावा लागत नसेल तरच नविन विषय सुरु करावा'' या अटीवर संगणकशास्त्र वर्ग सुरु करण्यास परवानगी दिली होती परंतु सदरची अट ही बदल करुन विनाअनुदान तत्वार सदरचा वर्ग सुरु करण्यास परवानगी द्यावी अशा प्रकारची मागणी माहितीच्या अर्जात केली होती. सदरच्या मागणीकरीता हिस्लॉप कॉलेजनी 18.8.2004 ते 7.7.2006 पर्यंत 11 पत्रावर कारवाई काय झाली अशी माहिती त्यांना विचारली होती. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 23.8.2006 रोजी माहिती अधिकारी तथा अवर सचिव, यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात यामध्ये आर्भिक भाराचा प्रश्न असल्याने त्याबाबतची माहिती शासन पत्र क्र. नावीस 2005/(7605) मशि–3 दि. 3 मार्च 2005 व स्मरणपत्र सम क्रमांक दि. 6 जानेवारी 2006 अन्वये संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून मागविण्यात आली आहे. सदरच्या प्रती आपल्याला हव्या असल्यास रु. 4 मनिऑर्डरने या विभागाकडे पाठवावे. जेणेकरुन पत्राच्या प्रती आपणास पाठविणे सुलभ होईल असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे व्यथित होवून अपीलकर्ती हिने प्रथम अपील दि. 16.9.2006 रोजी दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी न घेता दि. 4.10.2006 रोजी माहिती अधिकार अधिनियम 2005 मधिल नियम क्र. 5 नुसार विहित नमुनयात अपील करणे आवश्यक आहे तसेच ज्या आदेशाविरुध्द अपील करावयाचे असेल त्या आदेशाची प्रत जोडणे आवश्यक आहे. आपले विहित नमुन्यात नसल्याने व सोबत ज्या आदेशाविरुध्द अपील करावयाचे आहे त्या आदेशाची प्रत जोडलेली नसल्याने आपले अपील फेटाळण्यात येत आहे असे कळविले व त्यामुळे पुन्हा अपीलकर्ती हिने व्यथित होवून द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती हिने प्रथम अपीलाचे अपील मेमोचे अवलोकन केले. सदरचे अपील मेमो हे नियमाप्रमाणे दिसून येत आहे. सदरच्या अपील

मेमोसोबत त्यांनी 23.8.2006 चे माहिती अधिकारी यांचे उत्तरपण जोडलेले दिसून येत आहे व इतर कागदपत्रेसुध्दा जोडलेले दिसून येत आहे. त्यामुळे तांत्रिक कारणावरुन अपील हे फेटाळून लावणे यास कोणतेही संयुक्तिक कारण दिसून येत नाही त्याकरीता पुन्हा सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेणे व अपीलकर्ती हिस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या बद्यल निर्णय देणे ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. व अपीलकर्ती यांचा सुध्दा आग्रह आहे की त्यांचे प्रथम अपीलाची सुनावणी घेणे आवश्यक आहे. तसेच अपीलकर्ती हिने माहिती अधिकारी यांनी रु. 4 चा भरणा करावयास कळविले असतांना रु. 5 चा भरणा केलेला होता परंतु सदरची मनिऑर्डर ही न स्विकारता परत आलेली आहे. त्याचे कारण माहिती अधिकारी यांनी दिलेले नाही. त्याबाबतही माहिती अधिकारी यांनी कोणत्या कारणावरुन अपीलकर्ती हिची मनिऑर्डर स्विकारण्यास नकार दिला आहे त्याबद्यलसुध्दा प्रथम अपीलामध्ये निर्णय करणे आवश्यक होतो. त्याकरीता सदरचे प्रथम अपीलाची पुन्हा सुनावणी घेणे आवश्यक राहिल. माहिती अधिकारी यांनी माहिती विहित मुदतीत दिलेली असल्यामुळे त्याबाबत मात्र कोणत्याही प्रकारची कारवाई माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे करणे आवश्यक वाटत नाही.

## नि र्ण य

1) अपीलकर्ती हिचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा प्रथम अपीलाची सुनावणी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात घेण्यात यावे. त्याकरीता अपीलकर्ती हिस नियमाप्रमाणे नोटिस काढून सुनावणीची तारीख कळविण्यात यावे.

2) सदरच्या निर्णयाची प्रत प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई 32 यांचेकडे पोष्टाने पाठविण्यात यावे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 13.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 415/2007.**

1) श्री श्रीराज बिसन गजभिये
श्रीमती इंदिरा गांधी नगर, बिनाकी मंगळवारी,
कांजी हौस, वार्ड नं. 27, सिध्दार्थ विद्यालय जवळ
नागपूर – 17 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सभापती,
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
स्टेशन रोड, सदर, नागपूर 1

2) जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
स्टेशन रोड, सदर, नागपूर 1 ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

सदरच्या प्रकरणी माहिती अधिकारी हे कार्यकारी अभियंता असून अपीलीय अधिकारी हे अधिक्षक अभियंता आहेत.

अपीलकर्ता यांनी दिनांक 14/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 5.1.2006 रोजी 3 मुद्यांवर माहिती मागितलेली होती.

1) संपूर्ण विकसित असून वस्त्या असून नियमितीकरण करुन विकास शुल्क तिथल्या जनतेनी का भरावे.

2) ई डब्ल एस योजना का राबविण्यात येत नाही?

3) बिनाकी खसरा क्रमांक 97 व 102 मधील सार्वजनिक जागेवर अतिक्रमण असून ना हरकत प्रमाणपत्र कां दिले अशी माहिती विचारली. सदरचे माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. 17.2.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 2.5.2006 रोजी दिला असून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही प्रश्नाच्या स्वरुपाच्या माध्यमातून अभिमत घेणारे असल्यामुळे माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. असे असले तरी माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत म्हणजे दि. 21.1.2006 रोजी अर्जदाराने उपस्थित केलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे मुद्या क्र. 3 मधील माहिती विषयी समाधान झालेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. वर नमुद केलेल्या मुद्या क्र. 3 चे उत्तर हे खसरा क्रमांक 97 व 102 मौजा बिनाकी मधील सार्वजनिक जागेवर ना हरकत प्रमाणपत्र दिल्याची तारीख नमुद नसल्यामुळे तारखे अभावी रेकॉर्ड मधून नेमके प्रकरण शोधणे व माहिती देणे शक्य नाही. त्यावर माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की सर्व्हे नंबर हे मोठे असतात व त्यामध्ये वेगवेगळे लेआउट असतात. त्यातील काही लेआउट हे गुंठेवारी पध्दतीप्रमाणे असल्यामुळे नियमित केलेले असतात व काही लेआउट हे अनधिकृत असतात व त्यामुळे अपीलकर्ता यास कोणत्या लेआउट मधून सार्वजनिक जागेवर ना हरकत प्रमाणपत्र दिल्याची तारीख नमुद नसल्यामुळे

तारखे अभावी रेकॉर्ड मधून नेमके प्रकरण शोधणे व माहिती देणे शक्य नाही असे कळविण्यात आले होते. तसेच कोणत्याही अनधिकृत लेआउटला तो लेआउटच अनधिकृत असल्यामुळे परवानगी दिली आहे हा प्रश्नच उदभवत नाही तरीसुध्दा अपीलकर्ता यास त्यांनी निश्चित माहिती उपलब्ध करुन दिल्यास त्यांला त्याबद्यलची माहिती देता येईल काय असे विचारले असता तसे देता येईल असे माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांचेकडे रितसर अर्ज करुन दि. 21.1.2006 चा पत्राचा संदर्भ देवून मुद्या क्र. 3 प्रमाणे निश्चित तारीख, निश्चित लेआउट, व निश्चित सार्वजनिक जागा याची माहिती कळविणे हे संयुक्तिक राहिल.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जास विहित मुदतीत माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली आहे तरीसुध्दा मुद्या क्र. 3 च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांना निश्चितपणे पत्राने अनधिकृत लेआउट व त्यातील सार्वजनिक जागा याबद्यलची निश्ति तारीख व नंबर, क्रमांक हे कळवावे व त्याप्रमाणे उत्तरवादी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 13.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 417/2007.**

1) श्री श्रीराज बिसन गजभिये
श्रीमती इंदिरा गांधी नगर, बिनाकी मंगळवारी,
कांजी हौस, वार्ड नं. 27, सिध्दार्थ विद्यालय जवळ
नागपूर – 17 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपपोलीस आयुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
सह पोलीस आयुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 14/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व तात्कालीन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 31.7.2006 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे मिलींद सांगोळीकर द्वारा गडर लाईन तोडकर अतिक्रमण कर संडास लाईन का अवरोध डालना व शांतताभंग करना अशा प्रकारची माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 16.8.2006 रोजी माहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त यांनी

सविस्तर उत्तर दिलेले आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलर्ता यांनी दि. 23.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाचे उत्तर दिनांक 27.9.2006 रोजी दिले असून पुन्हा त्यांना एकुण सहपृष्ठे आठ उपलब्ध करुन दिलेले आहेत. तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी सदरचे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

3. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांना मिळालेल्या माहितीच्याबद्यल विचारले असता त्यांनी असे सांगितले की विज आकोडेच्या संबंधात कारवाई करावयास पाहिजे इतर माहिती त्यांना सांगता आलेली नाही परंतु माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे स्वयंस्पष्ट असून विहित मुदतीत दिलेले आहे. प्रथम अपीलातसुध्दा अपीलकर्ता यास सहपत्रे सहा ही दिलेले आहे. त्यामुळे सदरची माहिती ही अपीलकर्ता यास विहित मुदतीत उपलब्ध झालेली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 31.7.2006 च्या अर्जा प्रमाणे व दि. 16.8.2006 प्रथम अपीलाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 13.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 422/2007, 423/2007, 424/2007, 425/2007, 426/2007.**

1) श्री जगन्नथ दयाराम रेवतकर
रा. खर्रा पो. गंगाझारी
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री बी. एस. ठाकरे उपवनसंरक्षक,
उपवनसंरक्षक कार्यालय भंडारा
ता. जि. भंडारा

2) जन माहिती अधिकारी तथा
श्री डी. एच. राउत सहा. वनसंरक्षक, (तेंदुपाने)
वनविभाग भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक 20/7/2006 रोजी एकुण 5 द्वितीय अपीले माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये सादर केलेले आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 422/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक 7.8.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जामध्ये त्यांनी मौजा जुनेवाणी आदिवासी खसरा प्रकरणातील गट क्र. 56, 59, 60 मधिल झाडे कटाई इत्यादी केल्याचे दस्तऐवज.

माहितीचा कालावधी 1998–99 व माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केले असून एकुण 22 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्ता यांना काही माहिती ही दि. 21.9.2006 रोजी व काही मुद्यांवरील माहिती 27.9.2006 रोजी मिळाली होती परंतु तत्पुर्वी दिनांक 20.9.2006 रोजी त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपील दाखल केल्या नंतर त्यांना पुन्हा 22.12.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली होती. सदरची माहिती ही अपूर्ण आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले. त्यांना अर्जातील मुद्या क्र. 10, 17,18,19,20,21,22 या मुद्यांवरील माहिती अद्याप पर्यंत मिळालेली नाही. सदरची माहिती विलंबाने कां देण्यात आली याबद्यल विचारले असता माहिती अधिकारी यांनी सांगितले की माहिती ही 1998,1999 व 2000 या जुन्या कालावधीतील आहे. अपीलकर्त्याच्या दि. 7.8.2006 च्या संदर्भामध्ये अर्जदाराचे संपूर्ण नाव व पत्ता वेगळे असून अर्जावरील आपली स्वाक्षरी असल्याने अर्ज फेटाळण्यात आले होते त्यानंतर दि. 11.9.2006 रोजी चर्चेप्रमाणे दि. 21.9.2006 रोजी पुरविण्यात येत आहे असे दि. 21.9.2006 चे पत्राने कळविलेले दिसते. सदरच्या पत्रावर त्यावेळेस जी माहिती उपलब्ध झाली त्याची पोच अपीलकर्ता यांनी दिलेली दिसते. तसेच पुन्हा दि. 9.8.2006 रोजी वनक्षेत्राधिकारी (संरक्षण तिरोडा) लेखापाल राजस्व शाखा यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता पत्र लिहिलेले दिसते. पुन्हा दि. 27.9.2006 रोजी काही माहिती उपलब्ध करुन दिली आहे. प्रथम अपील दाखल झाल्यानंतर पुन्हा दि. 22.12.2006 रोजी काही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी माहिती वर नमुद केल्याप्रमाणे अपूर्ण मिळाली असे म्हटल्याप्रमणे त्यांना ज्या मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही त्या मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्ति राहिल.

3. अपील क्र. 423/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 7.8.2006 रोजी मौ. खर्रा येथील वनसंरक्षण समितीचे दस्तऐवज दि. 23.3.2001 ते 31.3.2006 पर्यंत व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन एकुण 19 मुद्यांवर माहिती मागितली होती. सदरची माहिती ही

दिनांक 21.9.2006 रोजी व 27.9.2006 रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु अपीलकर्ता यांनी 20.9.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते व त्यांना 22.12.2006 रोजी काही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. असे असले तरी सदरच्या अर्जाप्रमाणे संपूर्ण माहिती अपीलकर्ता यास मिळालेली नाही व त्यांनी अर्जातील मुद्या क्र. 1,2,3,5,6,7,8,9,10,14,17 या मुद्यांवर माहिती अद्यापपर्यंत मिळालेली नाही असे सांगितले. सदरच्या मुद्यांवर माहिती उपलब्ध होईल काय असे विचारले असता माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध होवू शकेल असे सांगितल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

4. अपील क्र. 426/2007 च्या संदर्भात अपीलकर्ता यांनी 27.9.2006 रोजी 9 कर्मचा–यांची कार्यकालाची माहिती मागितली होती. सदरची माहिती ही त्यांना दिनांक 28.12.2006 रोजी उपलब्ध करुन दिली होती. त्यातील पत्र फक्त अपीलकर्ता यांचेपर्यंत पोचले व सोबत सहपत्र म्हणून 9 कर्मचा–यांची जी माहिती आहे ती पोष्टाच्या पाकिटातून त्यांना मिळालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. सदरची माहिती 20.12.2006 रोजी आस्थापना शाखेने सहा. वनसंरक्षक (तेंदूपाने) तथा माहिती अधिकारी वन विभाग यांनी पाठविलेली दिसून येते व त्यामुळे सदरची माहिती ही अपीलकर्त्यास उपलब्ध न करुन देण्याबाबत तसे कोणतेही संयुक्तिक करण आढळून येत नाही त्यामुळे ती आता उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. सदरच्या संदर्भामध्ये दि. 7.12.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते व सदरची माहितीसुध्दा माहिती अधिकारी यांना आस्थापना व लेखा शाखेकडूनच उपलब्ध करुन घ्यावयाची असल्याने त्यांना त्या शाखेला पत्र लिहिलेले दिसतात.

5. अपील क्र. 425/2007 च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दि. 27.9.2006 रोजी आदिवासी खसरा प्रकरण मौजा जुनेवाणी वनक्षेत्र तिरोडा आदिवासी गटधारक तुलाराम डोमा टेकाम यांच्या खसरा प्रकरणी दस्तऐवज मिळणेबाबत माहिती मागितली होती व ती

एकुण 24 मुद्यांवर माहिती होती. परंतु 11 मुद्यांमध्ये माहिती प्राप्त व 13 मुद्यांवर माहिती अप्राप्त आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले. सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता माहिती अधिकारी यांनी वनक्षेत्राधिकारी (संरक्षण तिरोडा वनक्षेत्र) यांना दि. 30.9.2006 रोजी पत्र लिहिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 21.11.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाच्या संदर्भामध्येसुध्दा उपवनसंरक्षक यांनी माहिती मिळवून देण्याच्या दृष्टीने माहिती अधिकारी यांचेशी पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. लेखापाल विक्री शाखा यांनी दि. 2.1.2007 रोजी उपवनसंरक्षक वनविभाग भंडारा यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतचे पत्र लिहिलेले दिसून येत आहे. सदरची माहिती घेण्याकरीता 5.1.2007 रोजी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेले दिसते. सदरची 13 मुद्यांवरची अप्राप्त माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व माहिती अधिकारी यांनी ते मान्य केले.

6. अपील क. 426/2007 च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दि. 27.9.2006 रोजी आदिवासी खसरा प्रकरण मौजा जुनेवाणी वनक्षेत्र तिरोडा आदिवासी गटधारक गुलाबसिंग हिरासिंग मरसकोल्हे यांच्या खसरा प्रकरणी दस्तऐवज मिळणेबाबत. कालावधी 1998 ते 2005 व्यक्तिशः माहिती घेणार व एकुण मुद्ये 20. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 5.1.2007 रोजी माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही अपीलकर्ता यास दि. 13.1.2007 रोजी मिळालेली आहे असे त्यांनी सांगितले. सदरच्या माहितीमध्ये 12 मुद्यांवर माहिती प्राप्त आहे व 8 मुद्यांवर माहिती अप्राप्त आहे. ती माहिती उपलब्ध करुन देता येईल असे माहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरच्या प्रकरणी प्रथम अपील हे अपीलकर्ता यांनी दि. 21.11.2006 रोजी दाखल केले होते. प्रथम अपील दाखल झाल्यानंतर उपवनसंरक्षक वन विभाग भंडारा यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने माहिती अधिकारी यांना पत्र दिलेले दिसून येत आहे.

7. अपीलकर्ता यांनी वर उल्लेखिलेल्या त्यांच्या माहिती अर्जामध्ये माहितीचे स्वरुप अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरची माहिती ही माहितीच्या कालावधी

प्रमाणे जुनी असून ती संकलित करुन उपलब्ध करुन द्यावी लागते. वनविभागाच्या संदर्भात एक बाब लक्षात येते की वनविभागाचे क्षेत्र हे दूरवर पसरलेले असल्यामुळे व विचारलेली माहिती ही एकाच क्षेत्रातील असेल असे नसल्यामुळे ती माहिती संकलित करण्यास वनक्षेत्राधिकारी किंवा इतर लेखापाल यांचेकडून ती उपलब्ध करुन घ्यावी लागते असे दिसते. ही माहिती पुन्हा प्रत्येक अर्जामध्ये व्यापक स्वरुपात असल्यामुळे व अपीलकर्ता यांचे अनेक अर्ज असल्यामुळे माहिती विलंबाने उपलब्ध करुन देणे साहाजिकच आहे. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केली किंवा नाकारले हा निष्कर्ष काढता येत नाही. मात्र अपीलकर्ता यास मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे ती माहिती वरील परिच्छेदामध्ये उपलब्ध नाही असे म्हटले आहे ती माहिती अपीलकर्ता यास माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा. माहिती मिळण्याचे प्रत्येक अर्जामध्ये माहिती ही व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून सदरच्या सर्व अर्जामधील अप्राप्त माहितीबद्दल पुन्हा त्यांनी तपशिल दिल्यास सदरची माहिती त्यांना तातडीने उपलब्ध होवू शकेल.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे वरील पाचही अपीले ही अंशतः मान्य करण्यात येत असून त्या सर्व अपीलाच्या संदर्भातील माहितीच्या अधिकारातील अर्जातील ज्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध अद्यापपर्यंत झालेली नसेल ती माहिती अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून त्यांना तो तपशिल देवून उपलब्ध करुन घ्यावी. व माहिती अधिकारी यांनीसुध्दा ती त्यांना उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 14.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 427/2007.**

1) श्री एच. एम. राऊत

रा. टिळक नगर, वार्ड नं.4 (वडसा रोड)

ब्रम्हपूरी ता. जि. ब्रम्हपूरी 441206 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

श्री आर. पी. सव्वालाखे,

उपमुख्य कार्यपालन अधिकारी (पंचायत विभाग)

जिल्हा परिषद चंद्रपूर

ता. जि. चंद्रपूर

2) जन माहिती अधिकारी तथा

श्रीमती आर. जी. पूरी,

अधिक्षक, पंचायत उपविभाग

जिल्हा परिषद चंद्रपूर

ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 18/9/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 7.6.2006 रोजी मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे माहिती मिळणेसाठी महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम 2002 अन्वये अर्ज केला होता. सदरच्या अर्जामध्ये त्यांनी प्रशासकीय पदाचा अतिरिक्त कामाचा कार्यभार 1994 ते 1999 या कालावधीत सांभाळल्याबद्यल विशेष वेतन देय रक्कम मिळण्याबाबत अर्ज केलेले होते. सदरच्या अर्जाच्या संदर्भात कार्यवाही काय झाली याबद्यलची माहिती त्यांनी एकुण तिन मुद्यांमध्ये मागितलेली होती. परंतु सदरचा अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अन्वये नसल्यामुळे अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करण्यास्तव सदर अधिनियमा अंतर्गत नविन विहित नमुन्यात अर्ज सादर करावा असे दि. 14.8.2006 रोजी त्यांना माहिती अधिकारी तथा पंचायत उपविभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी कळविले होते. परंतु सादरचे पत्र त्यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे त्यांनी दि. 29.7.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यपालन अधिकारी (पं) पंचायत विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. परंतु दि. 14.8.2006 च्या पत्रामध्ये कळविल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी नविन अर्ज दाखल न केल्यामुळे सदरचे प्रथम अपीलाची दखल घेतली गेली नाही असे उत्तरवादी यांनी सांगितले व त्यामुळे सदरचे द्वितीय अपील हे अपीलकर्ता यांनी दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी दि. 7.6.2006 चा माहिती मिळण्यासाठीचा अर्ज जरी हा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या नमुना अर्जाप्रमाणे केलेला असला तरी तो दि. 7.6.2006 रोजी केलेला असल्यामुळे तांत्रिक बाबी बाजूला ठेवून तो माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे आहे असे समजून त्याबाबतचा निर्णय हा करता आला असता. सर्वसामान्य नागरीकाला अजुनही त्याबाबतची फारशी माहिती मिळालेली नसल्यामुळे तांत्रिक बाबीमध्ये चुका होवू शकतात. त्यांच्या दि. 7.6.2006 च्या अर्जामध्ये प्रशासकीय पदाचा अतिरिक्त कार्यभाराच्या संदर्भात विशेष वेतनाची जी त्यांनी

मागणी केलेली होती त्याबाबतीत त्यांनी सन 1998 पासून ते 2005 या कालावधीत संवर्ग विकास अधिकारी (उच्च श्रेणी) पंचायत समिती राजूरा यांना 16 अर्ज केलेले दिसते तसेच संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती नागभिड यांना सन 1999 ते 2003 पर्यंत 8 अर्ज केलेले दिसत आहे. ज्या सदरच्या अर्जाप्रमाणे दि. 17.3.2001 रोजी संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती राजूरा यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्राम पंचायत जिल्हा परिषद चंद्रपूर तसेच 28.9.2001 रोजी संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती राजूरा यांनी सचिव, ब्रम्हपूरी तालुका पेंशन असोसिएशन ब्रम्हपूरी जिल्हा चंद्रपूर तसेच दि. 6.5.2003 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेशी पत्रव्यवहार केलेला दिसून येतो व त्यातून अतिरिक्त मेहनातानाच्या संदर्भात प्रस्ताव तयार करुन मंजुरीस पाठविण्यात येत आहे असे दिसून येते. त्यातील प्रत्येक पत्राची प्रतिलिपी ही अपीलकर्ता यांना देण्यात आलेली आहे. दि. 15.2.1994 चे आदेशसुध्दा अपीलकर्ता यांनी जोडलेले आहे. या संपूर्ण पत्रव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर अपीलकर्ता यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या संदर्भात केलेल्या कारवाईचा तपशिल माहिती म्हणून अपीलकर्ता यांस पुरवणे संयुक्तिक राहिल. त्यानंतरही उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती राजूरा यांचेकडे ज्या प्रकारचा पत्रव्यवहार केलेला असेल त्या पत्रव्यवहाराची माहितीसुध्दा अपीलकर्ता यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. माहितीचा अधिकारी अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे कोणत्याही प्रकारची कारवाई करणे हे अपेक्षित नसले तरी सद्यःप्रकरणात अपीलकर्ता यांना जे अतिरिक्त कार्यभार सांभाळल्याबद्यल मेहनाताना मिळण्याच्या संदर्भात वर म्हटल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहिल व त्यामुळे त्याबाबतची सर्व माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे हे क्रमप्राप्त आहे. सदरच्या अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात अपीलकर्त्याची अर्जाच्या संदर्भातील तांत्रिक बाब ही बाजुला ठेवण्यात येत आहे.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांचे अपीले हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांस माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक 7.6.2006 च्या अर्जामध्ये नमुद केलेल्या प्रत्येक अर्जामध्ये काय कार्यवाही झाली त्या कार्यवाहीचा तपशिल त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 17.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 429/2007.**

1) श्री रामदास तेजरामजी भोयर
मु. पो. कोहळी ता. कळमेश्वर
जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर ..... **उत्तरवादी**

## <u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 20/2/2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी अनुपस्थित राहण्याकरीता परवानगी मागितलेली आहे ती मान्य करण्यात आली आहे.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 11.12.2006 रोजी माहिती अधिकारी म्हणून उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे 4 सहा. शिक्षकांच्या कायम स्वरुपाच्या मान्यतेची सप्टेंबर 2006 व डिसेंबर 2006 च्या कालावधीची कागदपत्रे व शालेय समितीच्या ठरावाची प्रत, मॅनेजमेंट समितीच्या ठरावाची प्रत, verification before Sepetember 2006 , प्रपत्र 1,2,3 ऑक्टोबर 2006 अशा प्रकारची माहिती मागितलेली होती. सदरची माहिती ही 12.12.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यास संबंधित शाळेस उपलब्ध करुन देण्याच्या बद्यल पत्र दिलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांनासुध्दा कळविलेले आहे. अपीलकर्ता यांनी सदरच्या निर्णयावर प्रथम अपील दाखल केले होते परंतु सदरच्या प्रथम अपीलात रु. 10 चे कोर्ट फी स्टॅम्प लावलेले असल्यामुळे त्याबद्यलसुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविले होते. व त्याच प्रत्राप्रमाणे मुद्या क्र. 5 ची माहिती व शाळा समिती ठरावाची प्रत त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असे माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना दि. 12.12.2006 चे पत्र हे मिळालेले नाही व ज्या प्रती मिळालेल्या आहेत त्या प्रती हया त्यांनी माहितीच्या अर्जात मागितलेल्या पाच मुद्याच्या संदर्भात नसून त्यांच्या निलंबनाच्या संदर्भातील प्रती आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की ही सर्व माहिती शाळा स्तरावर उपलब्ध असते. शाळेकडून प्रस्तावास मान्यता आल्यानंतर प्रस्तावाची छाननी केली जाते. मान्यतेचा आदेश शाळेकडे व लेखा विभागाकडे पाठविला जातो व प्रस्तावातील इतर कागदपत्रे सहा महिन्यापर्यंत ठेवून नष्ट केले जातात त्यामुळे सदरची कागदपत्रे जी अपीलकर्ता यांना अपेक्षित आहे ती शिक्षण विभागाच्या कार्यालयात उपलब्ध होवू शकणार नाहीत परंतु आदेशाची प्रत उपलब्ध होवू शकेल. परंतु असे असले तरी माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की पुन्हा एकवेळ सर्व प्रस्तावांच्या नस्त्या शोधण्याचा

प्रयत्न करता येईल. व उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यास त्यांनी मागितलेल्या 4 सहा. शिक्षकांच्या संदर्भातील प्रस्तावाच्या नस्त्याच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन देता येईल. परंतु त्याकरीता अपीलकर्ता यांनी खर्चाचे शुल्क हे भरावे लागेल. खर्चाच्या संदर्भात अंदाज घेवून कळवता येईल. दि. 27.9.2007 रोजी अपीलकर्ता यांनी श्रीमती ज्योती चव्हाण यांना भेटून सर्व माहिती उपलब्ध करुन घेता येईल.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपीले हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या 4 सहा. शिक्षकांच्या मान्यतेबद्यलच्या प्रस्तावातील कागदपत्रे ही माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असल्यास दिनांक 27.9.2006 रोजी सकाळी 11.00 वा. अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावे.

2) अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी श्रीमती ज्योती चव्हाण यांना दिनांक 27.9.2007 रोजी व्यक्तिशः भेटून त्यांनी वर नमुद केलेली माहिती उपलब्ध असल्यास खर्च भरुन उपलब्ध करुन घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 17.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 432/2007.**

1) श्री परमेश्वर शिवशंकर देशमुख
रा. मंडनगाव पो. मांडवी
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री श्रीधर साळुंके, शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
श्री एन. एस. निमगडे, शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद भंडारा ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 9/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 12.7.2006 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे बुटी विद्यालय शाळेत रुजू न केल्याबाबत व न्यायालयाच्या आदेशाच्या अवमान अर्जाबाबत दिनांक 16.6.2004 च्या केलेल्या अर्जाच्या संदर्भात, माहिती ही नोंदणीकृत टपालाद्वारे मागितलेली होती. व कामावर रुजू करुन थांबलेले पगार बिल काढण्याबाबत अर्जात

विनंती केली होती. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 24.7.2006 रोजी ''स्थानांतर बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट असून अवमान याचिका दाखल केलेले आहे. त्यामुळे कोणतेही मत व्यक्त करता येत नाही. सदर अर्जामध्ये कोणती माहिती मागितली याचा अर्थबोध होत नाही.'' असे माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसते. परंतु सदरची प्रत ही अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे त्यांना 2.9.2006 रोजी मिळाली होती. सदरच्या अर्जाच्या संदर्भात विहित मुदतीत माहिती मिळालेली नसल्यामुळे त्यांनी दि. 17.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदर प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 31.8.2006 रोजी शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांनी त्यांना विस्तारपूर्वक माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरचे पत्र त्यांना दिनांक 8.9.2006 रोजी प्राप्त झालेले दिसून येते. परन्तु अपीलकर्ता यांना कामावर रुजू करुन घेतले नाही त्यामुळे सदरच्या निर्णयाने त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 12.7.2006 च्या माहितीच्या अधिकारी जी माहिती मागितली होती त्या अनुषंगाने शेवटी त्यांना दि. 10.8.2007 राजी त्यांचे पूर्वपदावर रुजू करुन घेतले असून जनता शिक्षण संस्था (बुटी विद्यालय) खमारी यांचे संस्थेचे दि. 10.8.2007 चे रुजू पत्र त्यांनी दाखल केले असून दि. 10.8.2006 ला 1.00 वा. शाळेत रुजू झालो म्हणून त्यांनी लिहून दिले आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारामधील त्यांच्या अर्जावर कार्यवाही काय झाली हया बाबतचे उत्तर त्यांना प्रत्यक्ष रुजू होवून मिळालेले आहे. त्यामुळे सदरच्या अर्जाच्या संदर्भात पुन्हा त्यांचे काय म्हणणे आहे हे विचारले असता त्यांनी असे सांगितले की थांबलेले पगार बिल त्वरीत मिळणेबाबत त्यांची विनंती आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कारवाई ही अपेक्षित नसल्यामुळे तशाप्रकारचे आदेश हे देता येत नाही. अपीलकर्ता यांनी स्वतंत्रपणे उपसंचालक शिक्षण यांचेकडे त्याप्रमाणे अर्ज करावा व त्याबाबत न्याय मिळवून त्यांना घेता येईल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व त्यांची अपेक्षा पूर्ण झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 17.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 435/2007.**

1) श्री जी. झेड. तेलंग
मु. पो. वायगाव (निपाणी)
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री पी. एस. मानकर,
गट विकास अधिकारी, पंचायत समिती वर्धा
ता. जि. वर्धा

2) जन माहिती अधिकारी तथा
श्री ए. बी. दांडेकर,
कक्ष अधिकारी, पंचायत समिती वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 12/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 24.7.2006 रोजी बाजु मांडण्याची संधी रेकॉर्ड न देता एकतर्फी दर्शविलेल्या वसुलीबाबत 23.7.1990 ते 9.10.1991 पर्यंत हया अर्जासोबत

जोडलेल्या पत्राप्रमाणे पूर्ण माहिती देण्यात यावी अशी माहिती मागितली होती. सोबत जोडपत्र तिन जोडलेले आहे. त्यामध्ये 9 आणि 7 अशाप्रकारचे मुद्दे उपस्थित केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 29.7.2006 रोजी ग्रामपंचायत आंजीला माहिती पुरविण्याबाबत कळविण्यात आलेले दिसून येते. दि. 10.8.2006 रोजी सचिव ग्रामपंचायत आंजीने सहदिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर आर्वी यांना 2.6.2006 चे पत्रान्वये माहिती पुरविण्याकरीता व जप्त रेकॉर्डची मागणी केली होती. त्याप्रमाणे दि. 21.8.2006 रोजी अपीलकर्ता यांना पोलीस स्टेशन व ज्युडिशिअल कोर्ट आर्वी कडून रेकॉर्ड प्राप्त होताच माहिती पुरविण्यात येईल असे कळविले होते. माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे दिनांक 7.8.2006 ला प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी पुन्हा दि. 8.6.2006 रोजी माहितीच्या अधिकारीत माहिती मागण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो. परंतु अर्जाच्या संदर्भात 7.6.2006 ला सहा. माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी पूर्वी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या अंतर्गतसुध्दा माहितीचे अर्ज दाखल केलेले दिसून येतात व त्याप्रमाणेसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहिती वरुन अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की दि. 18.7.1992 रोजी जे रेर्कार्ड गावंडे पी.एस.ओ. यांनी ताब्यात घेतले होते त्यामध्ये अपीलकर्ता यांच्या कालावधीतील रेकॉर्ड नसल्यामुळे त्यांच्या कालावधीतील रेर्कार्ड जप्त झाला आहे असे समजून त्यांचेकडून जी वसुली दाखविण्यात आलेली आहे ती वसुली एकतर्फी होती व तात्पूरते निवृत्तीवेतन दिले होते परन्तु 20 महिने सेवा निवृत्ती वेतन व उपदानाच्या रकमा उशिरा मिळालेल्या आहे व त्यामुळे सदरच्या विलंबाने प्रदान केलेल्या रकमांवर व्याज देण्याबाबत त्यांचे प्रकरण शासन पातळीवर असल्याने त्यांच्या काळात कोणते अभिलेख दि. 23.7.1990 ते 9.10.1991 चा

पोलीस स्टेशन खरांगणा/कोर्टात जमा असल्याबाबत त्याच्या पोच पावतीची छायांकित प्रत देण्यात यावी ती अजून देण्यात आलेली नाही असे त्यांनी द्वितीय अपीलात नमुद केलेले आहे. या संदर्भामध्ये दि. 20.2.2006 रोजी अपीलकर्ता यास पोलीस स्टेशन खरांगणा येथे जमा असलेल्या अभिलेखाची सविस्तर माहिती पुनविण्याबाबत त्यांच्या माहितीचा अर्ज दि. 3.2.2005 च्या संदर्भात उत्तर दिलेले दिसून येते व त्या उत्तरामध्ये स्पष्टपणे प्रत्यक्षात ग्रामपंचायतला अभिलेखे जप्त केल्याची पोच उपलब्ध नाही. कोणकोणते अभिलेखे जमा केले आहे त्याची यादी व जप्त अभिलेखाची पोच पावती ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध नाही वगैरे माहिती पूर्वीच उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांना दि. 29.7.2006 रोजी उपलब्ध करुन दिलेल्या 18.7.1992 च्या अभिलेखाच्या आधारे त्यांना त्यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या संदर्भात योग्य त्या प्राधिकरणाकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल. तशी तक्रार त्यांनी शासन स्तरावर दाखल केलेली आहे असे त्यांचे दि. 18.9.2007 चे खुलाशामध्ये म्हटलेले आहे. व त्यामुळे त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे त्यांनी विसंगती दाखवून त्यांना न्याय मिळवून घेता येईल. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन दिली जाते. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये जर अनियमितता घडलेली असेल तर त्याबाबत स्वतंत्रपणे तक्रार करता येते. याप्रमाणे विचार केल्यास अपीलकर्ता यांना आतापर्यंत त्यांनी मागितलेली सर्व माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना त्यांना मागितलेली माहिती ही आतापर्यंत वेळोवेळी माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारावर झालेल्या अन्यायाच्या बद्यल त्यांना योग्य त्या संबंधित प्राधिकरणाकडे तक्रार अर्ज करुन न्याय मिळवून घेता येईल.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 18.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 441/2007.**

1) श्री एन. के. शुक्ला
रा. 51, विद्यानगर, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी भंडारा

2) जन माहिती अधिकारी तथा
श्री ए. एम. शिवरकर,
तहसिलदार, भंडारा ..... **उत्तरवादी**

**<u>वि वे च न</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कोणतेही प्रतिनिधी हजर नाहीत व त्यांनी खुलासापण सादर केलेला नाही किंवा कागदपत्र दाखल केलेले नाही.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 15.5.2006 रोजी तहसिलदार भंडारा यांचेकडे गट क्र. 38 कृषिक जमिनीपैकी क्षेत्रफळ 218.38 चौ.मी. चे अकृषिक झालेल्या बद्यलची सनद (पट्टा) मिळणेबाबत रे.के.क्र. 11/एनपी–36/98–99 माहितीचा कालावधी सन 1998–99 व माहिती व्यक्तिशः घेणार असा अर्ज केलेला होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. 17.6.2006

रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक 8.8.2006 अपील अर्ज 21.7.2006 रोजी दाखल केलेला आहे अशी नोंद घेवून सुनावणी ठेवण्यात आली होती. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.8.2007 रोजी देण्यात आला असून अपीलकर्त्याचे वापरातील जागा त्यांचे स्वतःचे नावाने नाही वापरातील जागा अकृषिक झालेली नाही किंवा अनधिकृत अकृषिक करुन ही जागा नियमाकुल केलेली नाही त्यामुळे सदर जागेसंबंधी सनद तयार झालेली नाही त्यामुळे त्यांनी मागणी केलेली सनद देता येणार नाही त्यामुळे प्रकरणात कोणताही आदेश झाला नसल्याने मागणी केलेल्या अभिलेखाची माहिती सद्यातरी पुरवता येणार नाही व सदरचा अपील अर्ज फेटाळण्यात येत असून प्रकरण नस्तीबध्द करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारातील अर्ज व प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये त्यांना कोणतीही माहिती अद्याप पर्यंत मिळालेली नाही असे त्यांनी सांगितले. परंतु दिनांक 14.7.2006 रोजी तहसिलदार भंडारा यांनी दि. 17.6.2006 चे अर्जानुसार त्यांना उत्तर दिलेले आहे पत्र क्र. प्रस्तु 1/तह./कावी/464/2006 दि. 14.7.2006 चा आहे. व सदरची प्रत अपीलकर्ता यांना मिळालेली आहे. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे अपीलाचा निर्णयसुध्दा झालेला आहे. व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये संपूर्ण वस्तस्थिती समोर आलेली असल्यामुळे ते सदरचे प्रथम अपील फेटाळलेले योग्य आहे असे दिसते. अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सन 1998–99 या कालावधीत कृषक जमिनीचे अकृषक करीता अर्ज केलेला आहे असे गृहित धरुन माहिती विचारलेली आहे असे दिसते. परंतु अशा प्रकारचा अर्ज संबंधित गृह निर्माण संस्थेनी किंवा अपीलकर्त्यानीसुध्दा त्यावेळेस केलेला नाही असे त्यांनी मान्य केलेले आहे. व असा अर्ज केल्याशिवाय कृषक–अकृषक होत नाही. अपीलकर्ता यांना दि. 26.9.2001 रोजी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 चे कलम 46 अनुसार प्राप्त अधिकारा अंतर्गत दंडात्मक कारवाई करुन गैरकृषी आकारणी हे वसुल करण्याचे आदेश

अनाधिकृतरित्या घराचे बांधकाम केल्यामुळे पारीत केलेल्या दंडात्मक रकमेचा भरणा केला म्हणजे अनधिकृतरित्या केलेला गैरकृषी वापर नियमाकुल झाला असे होत नाही व सहा महिन्याच्या आत आवश्यक कागदपत्रासह अनधिकृत गैरकृषी वापर नियमाकुल करण्याचा अर्ज सक्षम प्राधिकरणाकडे सादर करावा. सदर प्रकरणी अनाधिकृत अकृषीक गैरवापर नियमाकुल केल्यानंतरच सनद देण्यात येते परंतु सदर प्रकरणी अनाधिकृत गैरकृषी वापर नियमाकुल झाले नसल्याने त्याबाबतची सनद देण्याचा प्रश्नच उदभवत नाही असे कळविल्यावर दि. 1.2.2006 रोजी अपीलकर्ता यांनी अर्ज केलेला दिसतो व त्याबाबतची माहितीसुध्दा दि. 14.7.2006 रोजी त्यांना देण्यात आलेली आहे असे असुन सुध्दा त्यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये जो तपशिल दिलेला आहे तो तपशिल गैरलागू असून दिशाभूल करणारा असल्यामुळे सदरच्या अर्जाच्या संदर्भात कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे शक्यच नाही असे दिलेल्या उत्तरावरुन अपीलकर्ता यांनी मान्य केल्यावरुन निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी वास्तविक दि. 1.2.2006 रोजी दाखल केलेल्या अर्जावर काय कार्यवाही झाली असे विचारले असते तर कदाचित त्याबाबत त्यांना निश्चित माहिती मिळाली असती. तरीसुध्दा त्या अर्जाच्या वरील कार्यवाहीची माहिती दिनांक 17.7.2006 रोजी देण्यात आलेली आहे असे वर नमुद केले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरच्या प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली आहे व म्हणून त्यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 24.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 446/2007.**

1) श्री परमात्मा मुरलीधर सातपुते
रा. द्वारा सुग्गनबाई हाटे, बारासिंगल,
बोरकर नगर, पो. अजनी ता.जि.नागपूर 440 003 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
श्री आर. झेड. सिध्दिकी,
उपायुक्त, नागपूर महानगर पालिका नागपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी,
नागपूर महानगर पालिका नागपूर. ..... **उत्तरवादी**

<u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 26/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 1.12.2006 रोजी 2 मुद्यांवर माहिती मागितली होती.

1) मेरी सास श्रीमती सुग्गनबाई चितरु हाटे, यह मनपा वार्ड क्र. 105, झोन–4 से सफाई कामगार के पद से दि. 28.2.2005 को सेवानिवृत्त हुई है! उनकी रिक्त जगह

पर लाड कमेटी की सिफारिश एवं शासन निर्णयानुसार मेरी पत्नी सौ. रजनीबाई परमात्मा सातपुते ने दि. 17.10.2005 को नियमानुसार अर्ज दिया है!

क्या, सौ. रजनीबाई परमात्मा सातपुते को सफाई कामगार की नोकरी दी गई है? और हॉ, तो कब दी गई? और यदि नही, तो श्रीमती सुग्गनबाई हाटे के रिक्त जगह पर किसे नौकरी पर लिया गया है? यदि नही, तो सौ. रजनी परमात्मा सातपुते को रिक्त पद पर सफाई कामगार की नौकरी का आदेश कब दिया जायेगा? कृपया तारीख और समय बताये.

2) मेरे ससुर स्व. चितरु सुमेरा हाटे यह मनमा के वार्ड क्र.2, झोन क्र.01 से दिनांक 31.5.90 को सफाई कामगार के पद से सेवानिवृत्त हो गये! उनकी रिक्त जगह पर सफाई कामगार की नौकरी हेतु उनके सुपुत्र श्री सन्तोष चितरु हाटे यह सन 1990 से अब तक लगातार अर्ज दे चुके है! थ्द. 17.10.2005 को फिर से एक बार स्वास्थ्य विभाग में नियमानुसार पूरे कागजात पेश किये है!

प्रश्न है– क्या सेवानिवृत्त सफाई कामगार के वारिसदार को नोकरी देने में प्रशासन को 16 साल भी कम लगे? सोलह साल बाद भी नौकरी नही देने में मनपा प्रशासन की क्या मजबूरी है? क्या, स्व. चितरु सुमेरा हाटे की रिक्त जगह पर किसी बोगस व्यक्ती को नौकरी तो नही दि गई? यदि, नहि तो श्री सन्तोष चितरु हाटे को सफाई कामगार की नौकरी कब तक दी जायेगी? और सालह साल तक नौकरी नही देने का कारण क्या है?

सदरची माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दिनांक 14.12.2006 रोजी माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी महानगर पालिका यांनी मुद्या क्र. 1 ला श्रीमती सुग्गणबाई चितरु हाटे यांचे सेवानिवृत्तीनंतर सौ. रजनीबाई परमात्मा सातपुते यांचे व्यतिरिक्त कुणीही नोकरी मिळण्याबाबत या

कार्यालयात अर्ज केलेला नाही. मुद्या क्र. 2 नियुक्तीबाबतची कार्यवाही सुरु आहे, मुद्या क्र. 3 नियुक्तीबाबतची कार्यवाही सुरु आहे अशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. सदरच्या माहितीने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 15.1.2007 रोजी प्रथम अपील सादर केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी घेण्यासाठी दि. 28.2.2007 ही तारीख दिलेली होती. सदरच्या बाबत सुनावणी घेवून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी दि. 1.12.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी केलेल्या अर्जातील माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की मुद्यांमध्ये त्यांनी व्यक्तिगत माहितीच्या संदर्भामध्ये माहिती विचारलेली आहे. दि. 17.10.2005 रोजी अर्ज केलेला आहे. व त्यात सार्वजनिक हित दिसून येत नाही. त्या अर्जात विचारलेल्या कार्यवाहीचा तपशिल हा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देता येवू शकतो. परंतु त्यांनी कारणे विचारलेली आहेत. त्या कारणांच्या बाबत मात्र मत किंवा अभिमत हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. व त्यामुळे मुद्या क्र.1 आणि 2 आणि 3 मधिल अर्जाच्या कारवाई संदर्भात माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देणे एवढेच अपेक्षित आहे आणि सदरची माहिती ही माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्याचप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला आहे. तो योग्य आहे त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जातील माहिती ही व्यक्तिगत जरी असली तरी केलेल्या अर्जाच्या संदर्भात कारवाईची माहिती ही त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 24.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 436/2007.**

1) श्री वसंत मारोतराव ढोबे
रा. शिवनगर (देऊळगाव) पो.हमदापूर
ता. सेलू जि. वर्धा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री आर. जे. दाभेराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था वर्धा

2) श्री जे. के. ठाकूर
जन माहिती अधिकारी तथा
सहा. उपनिबंधक, सहकारी संस्था वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 11/10/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 19.12.2005 रोजी वसंत मागासवर्गीय मजुर संस्था वायगाव (नि.) रजि. नं. 905 चा 1992 ते 2005 पर्यंतचा सभासद व अध्यक्ष कोण याची तपशिल यादी व त्याबाबत निर्णय अर्जासोबत जोडला आहे. अशी माहिती वैयक्तिकरित्या घेणार म्हणून नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये मागितलेली माहिती ही सहा. निबंधक सहकारी संस्था तालुका वर्धा यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे

दिनांक 22.12.2005 रोजी सदरच्या संस्थेस माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्राने कळविले. परंतु संस्थेकडून सदरची माहिती मुदतीत मिळाली नसल्यामुळे अपीलकर्ता याने दि. 24.1.2006 रोजी प्रथम अपील जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांचेकडे दाखल केले. सदरच्या अपीलाच्या संदर्भात दि. 8.2.2006 रोजी अपीलकर्ता यास माहिती 3 दिवसात उपलब्ध करुन द्यावी असे माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसते. परंतु दि. 24.2.2006 रोजी सदरची माहिती ही अपीलकर्ता यास उपलब्ध करुन दिलेली दिसून येत आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यानी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यानी माहिती अधिकारी तथा सहा. निबंधक सहकारी संस्था वर्धा यांचेकडे संस्थेच्याबद्यल जी माहिती मागितलेली दिसून येते ती माहिती वास्तविक त्यांनी संस्थेकडीली माहिती अधिकारी यांचेकडे मागावयास पाहिजे होती. वसंत मागासवर्गीय मजुर सहकारी संस्थेमध्ये माहिती अधिकारी आहे असे सहा. निबंधक यांनी सांगितले. असे असले तरी सदरच्या संस्थेकडून दि. 22.12.2005 रोजी अपीलकर्ता यास माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पत्राने माहिती मागितलेली दिसते. संस्थेनी पुर्वी अपीलकर्ता यास माहिती दिलेली नव्हती असेही सहा. निबंधक यांनी सांगितले. त्यामुळे जोपर्यंत संस्थेकडून माहिती उपलब्ध होत नाही तोपर्यंत अपीलकर्ता यास मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नव्हते परंतु ज्यावेळेस माहिती उपलब्ध झाली ती माहिती अपीलकर्ता यास दि. 24.2.2006 रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. याचा अर्थ माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या बाबत कोणत्याही प्रकारची टाळाटाळ किंवा विलंब केलेला नाही.

4. अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलातील नमुद केलेला मजकुर वाचल्यास त्यांना त्यांचे पूर्वीचे सभासद पद समाविष्ट करण्याबाबतची मागणी त्यांनी केलेली दिसून येते. द्वितीय अपीलातसुध्दा त्यांनी पाच मुद्दे उपस्थित करुन सदरच्या मुद्याच्या संदर्भात संस्थेच्या विरुध्द कारवाई करावी अशी विनंती केलेली आहे. द्वितीय अपील दाखल करण्याच्यापुर्वी सुध्दा दि. 13.9.2006 रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अपील माहिती अधिकारी

वर्धा यांचेकडे पुन्हा तीच माहिती मागण्याचा प्रयत्न करुन आमरण उपोषणास बसण्याबाबत नोटिस वगैरे तपशिल दिलेला आहे. थोडक्यामध्ये अपीलकर्ता हा वसंत मागासवर्गीय सहकारी संस्थेचे सभासद होते. त्यांचे सभासदत्व दि. 11.9.1994 रोजीच रद्य करण्यात आलेले होते. व त्या विरुध्द त्यांनी उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे कोणत्याही प्रकारचे अपील केलेले नव्हते व त्यांना सदरच्या संस्थेचे सभासदत्व पुन्हा मिळावे हा त्यांचा प्रयत्न आहे व म्हणून ते अशा प्रकारची माहिती मागत आहे व आमरण उपोषणाच्या धमक्या देवून माहितीच्या अधिकारामध्ये पुन्हा पुन्हा अर्ज करीत आहे. यावरुन असे दिसते की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती यातून कोणतेही सार्वजनिक व्यापक हित दिसून येत नाही व ती सदरची माहिती ही त्यांनी वैयक्तिक हिताकरीता मागितलेली दिसून येते. वास्तविक अशाप्रकारे वैयक्तिक हिताकरीता मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देण्याची आवशक्यता नाही परंतु तरीसुध्दा माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत सदरच्या संस्थेस पत्र लिहून अपीलकर्ता यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 25.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 333/2007.**

1) महाराष्ट्र मोटर्स फायनांस लि.
16 सेंट्रल एव्हेन्यू रोड, नागपूर,
डायरेक्टर गौतमचंद इंदरचंद कोचर, नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
डायरेक्टर, महिंद्रा ॲन्ड महिंद्रा फायनांसियल
सर्विसेस लिमी. नारंग टॉवर 1 ला मजला,
ट्राफिक पोलीस ऑफिसचे विरुध्द पाम रोड
सिव्हील लाईन, नागपूर.

2) डायरेक्टर, महिंद्रा ॲन्ड महिंद्रा फायनांसियल
सर्विसेस लिमी. 2 रा मजला, सधन हाउस,
महिंद्र टॉवर्स मागे, 570 पी.बी.मार्ग,वरळी,मुंबई 400018..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 22/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी ही महाराष्ट्र मोटर्स फायनांस लि. कंपनी आहे. सदरच्या कंपनीचे डायरेक्टर गौतमचंद इंदरचंद कोचर यांनी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा फायनांसियल सर्विसेस लिमी. मुंबई यांचे कडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीनुसार दिनांक 10.12.2006 रोजी 3 मुद्यांवर माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या

अर्जाच्या संदर्भात दि. 19.12.2006 रोजी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा फायनांस या कंपनीने माहितीचा अधिकारी अधिनियम 2005 च्या तरतुदी कंपनीस लागू नाहीत आणि त्यामुळे अपीलकर्ता कंपनीने पाठविलेला रु. 200 चा डी.डी. परत पाठविलेला आहे असे कळविलेले आहे. सदरच्या निर्णयाच्या विरुध्द प्रथम अपील दाखल केलेले नाही मात्र आयोगापुढे प्रथम अपील म्हणून दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना 2 मुद्यांवर खुलासा करण्यास सांगितले. महाराष्ट्र मोटर्स फायनांस लि. ही कंपनी अधिनियमाच्या कलम 6 प्रमाणे माहिती मागण्यास सक्षम आहे काय व महिंद्रा फायनांस कंपनीस माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा कसा लागू होतो याबद्यल युक्तीवाद करावा परंतु अपीलकर्ता कंपनीचे डायरेक्टर श्री कोचर हे त्यांना माहिती पाहिजे यापलीकडे काहीही सांगू शकत नाही. महिंद्रा ॲन्ड महिंद्रा फायनांसीअल लि. ही कंपनी अधिनियम 1956 च्या प्रमाणे पंजीबध्द आहे आणि माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (ज) प्रमाणे ''सार्वजनिक प्राधिकरण'' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सदरची महिंद्रा ॲन्ड महिंद्रा फायनांसीअर कं. लि. ही येत नाही व त्यामुळे सदरचा अधिनियम कंपनीस लागू होणार नाही व त्यामुळे कंपनीकडून कोणत्याही प्रकारची माहिती ही देता येणार नाही. थोडक्यात महिंद्रा ॲन्ड महिंद्रा फायनांसीअल सर्व्हिसेस लि. ही खाजगी कंपनी आहे. अधिनियमाच्या कलम 2(ज) प्रमाणे ''सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ 1) संविधानाद्वारे किंवा तदर्थ 2) संसदेनी तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे 3) राज्य विधान मंडळाने तयार केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे 4) समुचीत शासनाने काढलेल्या अधिनियमाद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा गठीत करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था असा आहे व त्यात (क) समुचीत शासनाची मालकी असलेले, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय (ख) समुचीत शासनाकडून निधीद्वारे ज्यांना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो अशी अशासकीय संघटना यांचा समावेश आहे. सदरच्या व्याख्येतील

निकषाप्रमाणे महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीच्या संदर्भात तपासून पाहिले असता सदरची कंपनी ही कंपनी अधिनियमाप्रमाणे पंजिबध्द असल्या खेरीज अन्य कोणताही निकष त्यास लागू होत नाही. व त्यामुळे सदरच्या कंपनीस माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा लागू होत नसल्यामुळे सदरच्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कंपनीकडून माहिती मागता येणार नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. तसेही अपीलकर्ता यांनी कंपनीच्या निर्णयाविरुध्द प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अधिनियमाच्या कलम 19 (1) अन्वये अपील दाखल केलेले दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णया विरुध्दच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करता येते. त्याबाबतही अपीलकर्ता कंपनी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे पालन केले नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र मोटर्स फायनांशिअल लि. ही कंपनी सुध्दा खाजगी कंपनी दिसून येते व त्या कंपनीस सुध्दा सार्वजनिक व्यापक हित नसल्याने अशा प्रकारे अधिनियमाच्या कलम 6 (1) प्रमाणे माहिती मागता येणार नाही व त्यामुळे पुन्हा सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे वरील कारणास्तव निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 25.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 365/2007.**

1) श्री शंकरराव सखारामजी सुपारे
149, चंद्रमाउली, गणेशनगर, (आदमशा ले आउट)
नागपूर – 440 009. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री गोविंदराव नांदेडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक, नागपूर क्षेत्र नागपूर
झिरो माईन, पटवर्धन हायस्कूल जवळ, सिताबर्डी नागपूर.

2) श्री माणिक साखरे
जन माहिती अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक, नागपूर क्षेत्र नागपूर
झिरो माईन, पटवर्धन हायस्कूल जवळ,
सिताबर्डी नागपूर. ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 23/8/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 24.6.2006 रोजी माहिती अधिकारी म्हणून उपसंचालक शिक्षण विभाग नागपूर यांचेकडे 5 मुद्यांवर माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता तसेच पुन्हा दि. 24.6.2006 रोजी 3 मुद्यांवर माहिती मागण्याकरीता अर्ज केला होता. सदरच्या

अर्जाच्या अनुषंगाने दि. 17.6.2006 रोजी सदरची माहिती ही शिक्षणाधिकारी (मा.) जिल्हा परिषद नागपूर व भंडारा यांचेकडे उपलब्ध होवू शकेल व त्यांचेकडून ती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविण्यात आले होते. परंतु अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी (मा.) नागपूर व भंडारा याचेकडे माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा पुन्हा प्रथम अपील उपसंचालक यांचेकडेच दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 27 जुलै 2006 रोजी अपीलकर्ता व शिक्षणाधिकारी (मा.) जिल्हा परिषद नागपूर यांना पत्राद्वारे दिनांक 31.7.2006 रोजी उपस्थित राहावे असे कळविण्यात आले होते. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपीलामध्ये त्यांनी केलेल्या दोनही अर्जातील माहिती एकत्रित करुन द्वितीय अपील दाखल केले आहे. अधिनियमाच्या तदतुदीप्रमाणे माहितीचा एक अर्ज व त्यावर एक प्रथम अपील व एक द्वितीय अपील अशी तरतुद आहे. वेगवेगळया तारखांना दोन अर्ज करुन त्यावर एकच अपील दाखल करणे अशा प्रकराची तरतुद नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना त्यांचा कोणता अर्ज सुनावणीस घ्यावयाचा आहे असे विचारले असता त्यांनी दोनही अर्ज घ्यावे असे सांगितले. त्यांच्या दोनही अर्जाचा विचार केला असता असे दिसून येते की त्यांनी दि. 24.6.2006 च्या प्रथम अर्जामध्ये प्रश्नाच्या स्वरुपातून न झालेल्या कारवाई बद्यल कारणे विचारण्याची माहिती विचारलेली आहे जी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) व (त्र) प्रमाणे अपेक्षित नाही. ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात म्हणजे अभिलेखे, दस्तऐवज, इलेक्ट्रॉनिक उपकरणे या माध्यमात जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही बाबीबाबत का व कसे या प्रश्नाची उत्तरे अपेक्षित नाही त्यामुळे अपीलकर्ता यांचा प्रथम अर्ज हा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नसल्यामुळे त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नसावी. अपीलकर्ता यांचा दुसरा अर्ज यामध्ये जी 3 मुद्यांवर माहिती मागितलेली आहे ती शिक्षणाधिकारी यांच्या अधिकाराच्या बद्यल मागितलेली आहे. वास्तविक अपीलकर्ता हे शिक्षणसंचालक आहेत व

त्यामुळे त्यांना शिक्षण अधिका–यांचे अधिकाराबाबत पूर्वीच माहिती असावयास पाहिजे हे गृहीत आहे. परंतु तरीसुध्दा त्याबद्यलचे शासन निर्णय किंवा परिपत्रके ज्या स्वरुपात उपलब्ध असतील त्या स्वरुपात त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. परंतु अपीलकर्ता यांना दोनही अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती ज्या कार्यालयात उपलब्ध असेल त्या कार्यालयामधून ही माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले असून सुध्दा त्यांनी पुन्हा अपील हे उपसंचालक यांचेकडेच केलेले दिसून येते व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही ही तक्रार मान्य करण्यासारखी होत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अन्वये ज्या ज्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या ज्या स्तरावर माहिती उपलब्ध आहे त्या स्तरावर माहिती अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. अन्यथा माहिती एका सार्वजनिक प्राधिकरणात आणि मागितली दुस–या सार्वजनिक प्राधिकरणात अशा प्रकारची माहिती ही अर्जदारास कदापी उपलब्ध होवू शकणार नाही हा त्यामागील उद्येश आहे. परंतु अर्जदारसुध्दा अधिनियमाच्या तरतुदीचा अभ्यास न करता आपल्या कल्पनेप्रमाणे अर्ज करीत असतात व त्यामुळेच त्यांना माहिती ही वेळेत तर उपलब्ध होतच नाही परंतु निरनिराळया प्राधिकरणांना त्या त्या अर्जावरील निरर्थक अशी कारवाई मात्र करावी लागते. अर्जदाराचा दुसरा अर्ज त्यामधील माहिती ही शासन निर्णय किंवा परिपत्रकाच्या संदर्भात असल्यामुळे ती उपसंचालक शिक्षण संचालनालय नागपूर यांचे कार्यालयात उपलब्ध असल्यास त्यांनी ती अपीलकर्ता यांना पुरवावी किंवा शिक्षणाधिकारी (माध्य.) नागपूर, भंडारा यांचे कार्यालयातून अपीलकर्ता यांनी उपलब्ध करुन घ्यावी.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 24.6.2006 च्या अर्जाच्या मधील 3 मुद्यातील माहिती ही मुद्यांचे सखोल वाचन करुन अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाच्या आंत उपसंचालक शिक्षण संचालनालय नागपूर यांनी उपलब्ध करुन द्यावी व ती

अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात म्हटल्याप्रमाणे व्यक्तीशः उपलब्ध करुन घ्यावी. सदरच्या माहितीच्या करीता अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नियम 4 प्रमाणे जो खर्च येईल तो खर्च भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 25.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 456/2007.**

1) श्री विठ्ठल दुधरामजी पोगळे
रा. खाटीक गुरुजी यांचे घरी,
शिवनगरी जवळ, तुलसीनगर, खात रोड, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी भंडारा

2) श्री माणिक साखरे
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक, भूमी अभिलेख भंडारा
ता. जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4/10/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व अधिक्षक भूमी अभिलेख भंडारा हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी भंडारा हे आवश्यक पक्षकार नाही. परंतु अपीलकर्ता यांनी तसे द्वितीय अपील मेमोमध्ये नमुद केलेले असल्यामुळे जिल्हाधिकारी भंडारा यांना नोटिस काढण्यात आलेली दिसते.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 17.1.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी अधिक्षक भूमी अभिलेख भंडारा यांचे कडे त्यांचे पत्र दि. 5.2.1996, आमदाराचे पत्र क्र. 10672 दिनांक

22.3.97 क्र. 10254 दि. 24.12.96 च्या संदर्भात मौजा जैतपूर तालुका लाखांदूर येथील अपीलकर्त्याच्या नावाने असलेल्या जमिनीची अभिलेखात नावाची व क्षेत्राची दुरुस्ती करण्याबाबत. मौजा जैतपूर तालुका लाखांदूर साझा क्र. 11 सर्वे नंबर 508 व 519 पोगळे विठ्ठल दुधराम, भैय्या दुधराम, व राईबाई दुधरामजी पोगळे असे होते परंतु पुनर्मोजनी अभिलेखात पोगळे ऐवजी पागोटे करण्यात आले होते. गट क्र. 508 मधील जमीन 0.68 आर. इतकी होती पण नविन अभिलेखात 0.60 इतकी करण्यात आली इत्यादी बाबत दुरुस्ती कां झाली नाही अशी माहिती मागितली होती. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 27.1.2006 रोजी अपीलकर्ता यास सदरच्या प्रकरणात अपर जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडून दि. 10.11.1997 ला आदेश पारीत करण्यात आले असून तालुका निरीक्षक भूमी अभिलेख लाखांदूर यांचेकडे तलाठी अभिलेख दुरुस्ती करीता या कार्यालयाकडून पाठविण्यात आले आहे. तसेच 3.12.1997 च्या पत्राच्या अन्वये तालुका निरीक्षक भूमी अभिलेख लाखांदूर यांचे कार्यालयास संपर्क साधनेबाबत पत्रान्वये कळविण्यात आले आहे व त्यामुळे कोणतीही माहिती दिली नाही असे म्हणणे संयुक्तिक नाही. तरी आपण तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय लाखांदूर यांचेशी संपर्क साधून आपले समाधान करुन घ्यावे असे कळविलेले दिसून येते. तसेच दि. 3.2.2006 रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख लाखांदूर यांनीसुध्दा अपीलकर्ता यास ''मौजा जैतपूर तालुका लाखांदूर भूमापन क्र. 739 व 751 चे दुरुस्ती बाबत माहितीचा अधिकार या सदराखाली अधिक्षक भूमी अभिलेख भंडारा यांचेकडे खोटी तक्रार दाखल केली आहे. आपल्या तक्रारी प्रकरणात फेरफार क्र. 261 दि. 19.1.1998 ला तलाठी अभिलेखात दुरुस्ती झालेली आहे. अभिलेखाची शहानिशा न करता आपण वरिष्ठांकडे खोटी तक्रार केली आहे गट नं. 508 क्षेत्र 0.08 आर. कमी असल्याचे अर्जात नमुद आहे. मोक्यावर चौकशी समयी आज कायम भू.क्र. 751 चे क्षेत्र 0.60 आर असल्याची लगत धारकाचे

इसमा समक्ष आपणास समज दिली व तसे लेखी जबाब आपणाकडून कार्यालयाने लिहून घेतले आहे व वरिष्ठांची दिशाभूल केलेली आहे'' असे कळविलेले असूनसुध्दा अपीलकर्ता यांनी दि. 1.3.2006 रोजी पुन्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे तक्रार अर्ज सादर केलेला दिसून येतो. दि. 28.7.2006 रोजी मुदती नंतर प्रथम अपील जिल्हाधिकारी भंडारा तथा अपीलीय अधिकारी भंडारा यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रकरणामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हाधिकारी भंडारा हे नसल्यामुळे त्याची सुनावणी झालेली दिसून येत नाही. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे व त्यातही जमिनीच्या क्षेत्राची दुरुस्ती व आडनावाची दुरुस्ती न केल्याबद्यल तसेच माहिती अधिकाराच्या सदराखाली खोटी माहिती दिल्याबाबत कारवाई करण्याच्या संदर्भात विनंती केलेली आहे.

3. अधिक्षक भूमी अभिलेख यांनी माहिती अधिकारी म्हणून विहित मुदतीत माहिती दिलेली आहे. तसेच आयोगाकडे खुलासा करतांना अर्जदारानी दि. 5.2.1996 ला केलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत दाखल करुन दि. 28.11.1997 ची अधिक्षक भूमी अभिलेख भंडारा यांचेकडे तक्रार अर्जाच्या संदर्भात संबंधित जमिनीच्या दि. 6.11.1997 चे दुरुस्ती प्रस्तावाची प्रत व त्यातील आदेश हा दाखल केलेला असून सदरच्या आदेशावरुन असे दिसून येते की जुन्या अभिलेखाप्रमाणे व पुनर्मोजनी अभिलेखाप्रमाणे व प्रस्तावित दुरुस्ती प्रत क्षेत्र दाखवणारा तक्ता व त्यावर जिल्हाधिकारी भंडारा यांची सही असून त्यात अधिक्षक भूमी अभिलेख भंडारा यांना सदर दुरुस्ती आदेशाप्रमाणे मुळ अभिलेखात तसेच तलाठी अभिलेखात दुरुस्ती करुन अहवाल सादर करावा असे आदेश दिसून येतात त्यात पूर्वीचा गट क्र. 508 नवीन भू. क्र. 751 व पूर्वीचा गट क्र. 519 व नवीन भू. क्र. 539 यांचे संबंधात पागोटे नावाऐवजी पोगळे हे नाव दुरुस्ती केलेली दिसून येत आहे. मात्र 0.68 आर. च्या ऐवजी 0.60 हे क्षेत्र दिसून येत आहे. दि. 28.11.1997 च्या पत्राची झेरॉक्स सुध्दा दाखल केलेली असून ती 3.12.1997 ला अपीलकर्ता यास मिळालेली

दिसून येत आहे. भू. क्र. 739 चा 7/12 चा उतारा 1997–98 चा पाहिला असता त्यावर दुरुस्ती झालेली दिसून येत आहे. भू. क्र. 751 चा 7/12 चा उतारा 1997–98 चा पाहिला असता त्यावर दुरुस्ती झालेली दिसून येत आहे. व त्यामुळेच तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी अपीलकर्ता यांनी शहानिशा न करता तक्रार केल्याबद्यल त्यांना कळविण्यात आले आहे. राज्य माहिती आयोगाकडेसुध्दा अपील दाखल करतांना अपीलकर्ता यांनी 19.6.2002 रोजी मागितलेली जैतपूर प.ह.नं.39 येथील एकत्रित केलेल्या जमिन दर्शविणारे पत्रकाचा उतारा दाखल केलेला आहे. परंतु त्याबाबत भूमी अभिलेख यांनी असे सांगितले की एकत्रिकरणाच्या संदर्भातील कारवाई आता बंद झाली व त्याबाबतचे अभिलेख बंद झाले असून अपीलकर्ता यांनी दाखल केलेले पत्र हे आता गैरलागू आहे. आता पुनर्मोजनी भूमी अभिलेख सुरु आहे व त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांचे जमिनीच्या संदर्भात दुरुस्ती झालेल्या आहेत. यावरुन अपीलकर्ता यांनी आयोगाचीसुध्दा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. अन्यथा त्यांनी 7/12 चे उतारे दाखल केले असते. यावरुन अपीलकर्ता यांना भू. क्र. 508 मधील क्षेत्र 0.68 आर हे पूर्ववत करुन घेण्याच्या दृष्टीनेच माहितीच्या अधिकारातील कारवाई करुन मिळाली तर प्रयत्न करुन पाहावा असे दिसते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे कोणत्याही प्रकारची प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश देता येत नाही. माहिती ज्या स्वरुपात सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असते त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देणे एवढेच अपेक्षित असते. मिळालेल्या माहितीच्या आधारे योग्य त्या प्राधिकरणाकडे तक्रार करावयाची असते व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या अपेक्षेप्रमाणे कोणत्याही कारवाईचा आदेश हे देता येणे शक्य नाही. अपीलकर्ता यांना पूर्वीच माहिती ही उपलब्ध होती त्यानंतरही अधिक्षक भूमी अभिलेख भंडारा यांनी व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी विहीत मुदतीत अपीलकर्ता यांना माहिती पुन्हा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## निर्णय

1) अपीलकर्ता यांना माहितीच्या अधिकाराच्या अर्जाच्या पूर्वीच संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली होती व त्यानंतरही विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 26.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 457/2007.**

1) श्री विठ्ठल दुधरामजी पोगळे
रा. खाटीक गुरुजी यांचे घरी,
शिवनगरी जवळ, तुलसीनगर, खात रोड, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री डी. एन. जनरोडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ अजनी
अजनी नागपूर

2) श्री एच. के. भैसे
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 4/10/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 13.7.2006 रोजी माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे त्यांचे मार्च 1999 ते फेब्रुवारी 2001 पर्यंतचे रु. 1980/– आर डी कमीशन मिळण्याबाबत तसेच प्रवास भत्ता देयकाची रक्कम मिळण्याबाबत त्यांनी दिनांक 15.11.1999, 13.2.2000, 9.1.2000, 1.3.2001, 4.8.2003, 14.2.2003, 29.6.2003, 24.9.2004, 15.11.2003 रोजी पाठविलेल्या पत्रान्वये कारवाई बद्यल माहिती विचारली होती. व त्या पत्रान्वये कारवाई न करण्याची कारणे व कारवाई न करणा–या कर्मचा–यांची नावे, ही माहिती पंजीबध्द डाकेने मागितली होती. सदरच्या पत्राच्या संदर्भामध्ये दि. 31.7.2006 रोजी अपीलकर्ता यास रु. 30 पोष्टाचे खर्चासह कार्यालयात रोखीने किंवा मनिऑर्डरने भरण्यात यावे असे कळविले होते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. दि. 31.8.2006 रोजी पुन्हा अपीलकर्ता यास पत्र पाठविलेले दिसून येते व त्या प्रत्रात पुन्हा दि. 31.7.2006 च्या पत्राचा उल्लेख करुन कळविण्यात आलेले दिसते. दि. 28.8.2006 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्या संदर्भात दि. 6.9.2006 रोजी उत्तर देण्यात आलेले असून पुन्हा 31.7.2006 व 31.8.2006 च्या पत्राप्रमाणे अद्याप फी जमा केलेली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे उत्तर दिलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील पाठविलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती विचारली असता सदरच्या अर्जाच्या कोणत्याही प्रती अपीलकर्ता यांचेकडे नाहीत व सदरचे अर्ज हे कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात आढळून येत नाही असे अपीलकर्ता स्वतः व उत्तरवादी यांनी सांगितले. वास्तविक अपीलकर्ता हे त्याच कार्यालयात वरिष्ठ लिपीक म्हणून होते. ते सेवानिवृत्त दि. 31.1.2001 ला झालेले असल्यामुळे कमीत कमी त्यांचे पत्र दि. 15.11.1999, 13.2.2000, 9.1.2000 हे पत्र तर ते स्वतः तिथे असल्यामुळे कार्यालयात उपलब्ध असावयास पाहिजे होते. किंवा मार्च 1999 ते फेब्रुवारी 2001 पर्यंतचे आर डी कमीशन व प्रवास भत्ता देयके त्यांनी स्वतः त्या ठिकाणी आहेत किंवा नाही ही

खात्री त्यांना करुन घेता आली असती याबाबत ते गायब केले असे म्हणतात. परंतु कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयातील विद्यमान वरिष्ठ लिपीक यांनीसुध्दा सांगितले की अपीलकर्ता अर्जदार यांचे पत्र आणि आर डी कमीशनची देयके कार्यालयात उपलब्ध नाहीत. वास्तविक ते स्वतः तो टेबल सांभाळत असल्यामुळे त्यांनी ती देयके सादर करावयास पाहिजे होती. प्रवासभत्ता त्यांना मिळालेला आहे. असे असतांना कोणती माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता रु. 30 चा टपाल खर्च मागितला हे विचारले असता जे पत्र त्यांना द्यावयाचे होते त्या पत्राचा टपाल खर्च हा मागितलेला होता. सदरच्या पत्राची मुळ प्रतची झेरॉक्स प्रत त्यांनी सादर केलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी टपाल खर्च न भरल्यामुळे सदरच्या पत्रास जावक क्रमांक वगैरे दिलेला नाही असे उत्तरवादी यांचे म्हणणे आहे. सदरच्या पत्रामध्ये आर. डी कमीशनची देयके अप्राप्त असल्यामुळे कोणत्याही कर्मचा–याकडे सोपविण्याचा प्रश्न होत नाही व त्यामुळे पुढील प्रश्न उपस्थित होत नाही व सर्व माहिती माहित असल्यामुळे कारवाई करण्याची आवश्यकता नाही अशाप्रकारचे उत्तर तयार केलेले दिसून येते तसेच देयके प्राप्त झाले असते व कारवाई केली नसती तरच कर्मचा–याचे नावाने असते. यापूर्वी आपण सादर केलेले माहे 2/99 पर्यंतचे देयकाचे या कार्यालयाद्वारे भुगतान करण्यात आले होते. आपले माहे 3/99 पासूनचे देयके विभागीय कार्यालयाकडून दिले असल्यास कोणाकडे हस्तांतरीत केले याबाबत पुराव्यासह सविस्तर माहिती पुरविण्यात यावी जेणेकरुन योग्य ती कारवाई करण्यात येईल. यावरुन असे दिसून येते की यांनी मागितलेली देयके ही कार्यालयात उपलब्ध नाही व त्यामुळेच त्यांना जी कारवाई अपेक्षित आहे ती कारवाई करता येणे शक्य नाही असे अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांनी अजुनही त्यांचेकडे असलेली कागदपत्रे म्हणजेच देयकाच्या प्रती सादर केल्यास सदरची देयकाच्या बाबत पुढील कारवाई करणे शक्य होईल असे त्यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांनीच त्यांचेकडे देयके उपलब्ध असल्यास माहिती अधिकारी यांचेकडे सादर कराव्यात जेणेकरुन त्याबाबत त्यांना अपेक्षित असा न्याय मिळू शकेल.

**<u>नि र्ण य</u>**

1) अपीलकर्ता यांचे दिनांक 13.7.2006 च्या अर्जाच्या संदर्भात त्यांनी उल्लेख केलेल्या आर डी कमीशनच्या देयका संदर्भात देयकाच्या प्रती या माहिती अधिकारी यांचे कार्यालयात सादर केल्यास त्यांना त्यावर कारवाई करुन अपेक्षित माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता यांनी सदरची त्यांच्याकडे सर्व उपलब्ध देयके ही निर्णय मिळाल्यापासून 15 दिवासत माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावा. त्यानंतर कोणत्याही प्रकारच्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 26.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 451/2007, 452/207.**

1) श्री वामन शंकर राणे
मु.पो.हरणखेड, ता. मलकापूर
जि. बुलढाणा 443101 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री पी. ए. वरघट
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी मलकापूर
ता. मलकापूर जि. बुलढाणा 443101

2) श्री पी. ए. इलग
जन माहिती अधिकारी तथा
मंडळ कृषी अधिकारी मलकापूर
ता. मलकापूर जि. बुलढाणा 443101 ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 26/12/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र. 451/2007 हे दाखल केले आहे. तसेच अपील क्र. 452/2007 हे दि. 30.8.2007 रोजी दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 11.9.2006 रोजी 16 मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतु सदरची माहिती विहीत मुदतीत उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी दि. 3.11.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते व तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक

26.12.2006 रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपील क्र. 452/2007 मध्ये दिनांक 30.11.2006 रोजी 16 मुद्यांवर माहिती मागण्यासाठी अर्ज केले होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भात त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे दि. 2.1.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. तरीही कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीकरीता लागणारे शुल्क अतिवृष्टी वाटप सन 2006 मधील माहितीची पाने 1500 आहेत प्रती 2 प्रमाणे 3000 रु. तसेच चिंचखेड, वडकी, हरणखेड 75 प्रती 150 रु. चालान भरुन माहिती घेवून जाणे असे पत्र दि. 29.8. 2007 रोजी दिलेले दिसून येते. परंतु सदरचे पत्र हे 10.9.2007 रोजी मिळालेले दिसून येत आहे. एकुणच कृषी खात्याचा जो कारभार आहे तो हा अनागोंदी व गोंधळाचा दिसून येतो. माहिती जरी विस्तृत प्रमाणात असली तरी सुध्दा ती माहिती उपलब्ध करुन देण्यास एक वर्षाचा कालावधी जावा हे त्या कार्यालयाच्या कार्यक्षमतेचे द्योतक आहे. सदरची माहिती जरी तालुका कृषी अधिकारी घेवून आलेले आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. सदरची माहिती जरी उपलब्ध करुन देत असली तरी ही माहिती ही माहिती विलंबाने उपलब्ध करुन देत असल्यामुळे ही माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 451/2007 व अपील क्र. 452/2007 हे मंजुर करण्यात येत असून त्यांनी दि. 11.9.2006 व दिनांक 30.11.2006 या अर्जामध्ये मागितलेली माहिती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) सदरची माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन देत असल्यामुळे माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्याने त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे विभागीय चौकशी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

3) माहिती अधिकारी यांची विभागीय चौकशी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बुलढाणा जिल्हा बुलढाणा यांना करावयाची असून विभागीय चौकशीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. सदरच्या निर्णयाची प्रत ही जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बुलढाणा जिल्हा बुलढाणा यांचेकडे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 26.9.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 461/2007.**

1) डॉ. ए. आर. आसोलकर
204, अनुसया कॉम्प्लेक्स,
छत्रपती नगर, वर्धा रोड, नागपूर – 15 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) कु. कमलसिंह
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती.

2) डॉ. भि. र. वाघमारे
जन माहिती अधिकारी तथा
परिक्षा नियंत्रक,
कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती. ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 22/2/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 3.7.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केलेला होता. सदरच्या अर्जामध्ये त्यांनी अमरावती विद्यापीठ अद्यादेश

7 अे ची अर्थफोड आणि त्याची अंमलबजावणी याबद्यलचे अभिप्राय/अभिमत मागितलेले होते. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 29.7.2006 रोजी माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी वरील विषयासंदर्भात माहितीच्या अधिकारा अंतर्गत विचारणा केलेल्या माहितीबाबत कु. अश्विनी आसोलकर यांचा एम. ए. भाग 1 (इंग्रजी) या वर्गाचा हिवाळी 1995 साली परिक्षा क्रमांक 11239 अन्वये जाहीर केलेल्या निकालासंबंधी अध्यादेश अस्त्विात असून त्यावर स्पष्टीकरण/अभिप्राय व्यक्त करणे अपेक्षित नाही. तद्वतच आपण मागणी केलेली माहिती ही माहिती या व्याख्येत अंतर्भूत होत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 24.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय हा दि. 24.8.2006 रोजी दिलेला असून माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून पुन्हा अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 3.7.2006 च्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिलेली असून अभिमत किंवा अभिप्राय हे त्यांनी देणे आवश्यक आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम (च) व (त्र) मध्ये ''माहिती'' ''माहितीचा अधिकार'' या सज्ञांची व्याख्या दिलेली आहे. ''माहिती'' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात सार्वजनिक प्राधिकरणात माहिती उपलब्ध असेल उदा. अभिलेखे, दस्तऐवज, अभिमत या स्वरुपात ही माहिती उपलब्ध असेल ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. माहितीचा अधिकार या व्याख्येतसुध्दा सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणात असलेली माहिती ही अभिलेख्याच्या स्वरुपात दस्तऐवज यांची पाहाणी करणे दस्तऐवज, अभिलेख्याच्या टिपण्या उतारे प्रमाणीत प्रती घेणे सामुग्रीचे प्रमाणीत नमुने घेणे तसेच इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहितीबाबत मुद्रीत प्रती याबाबतच्या प्रकाराचा समावेश होतो. त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे माहिती अधिकारी यांनी अभिप्राय किंवा अभिमत हे

व्यक्त करावयास पाहिजे होते हे म्हणणे बरोबर नाही. माहिती अधिकारी हा सार्वजनिक प्राधिकरणातील त्याच्या स्तरावरील अभिलेखे किंवा दस्तऐवज या माहितीचा परिरक्षक असतो. तो झालेल्या निर्णयाच्या संदर्भात निर्णय प्रक्रियेतील अधिकारी असेलच असे नाही व त्यामुळे माहिती अधिका–याकडून कोणत्याही प्रकारच्या कारणमिमांसेची अपेक्षा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे जी माहिती उपलब्ध होते त्या माहितीच्या आधारे अर्जदारास योग्य त्या संबंधित प्राधिकरणाकडे तक्रार निवारणार्थ तक्रार दाखल करता येते व न्याय मिळवून घेता येतो अशा प्रकारची संकल्पना आहे. पूर्वी माहिती मिळत नव्हती त्यामुळे अर्जदारास कशाच्या आधारे तक्रार करावयाची ही दिशा मिळत नव्हती परंतु आता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा अंमलात आल्या नंतर त्या तरतुदींच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे त्यास तक्रार करता येते व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी जी माहिती विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य असून तसेच अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांचा निर्णय हा कायम केलेला योग्य आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 27.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 463/2007.**

1) श्री सुखचंद मगरु बावणे
रा. रापेवाडा पो. कवलेवाडा
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक, कार्यालय गोंदिया

2) श्री आर. वी. सांदेकर,
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी, तिरोडा
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 26/9/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 7.12.2006 रोजी दि. 5.7.2006 पासून मुलगी घरातून लापता झाल्याबाबत ते आज पर्यंत म्हणजे दि. 7.12.2006 पर्यंत पोलीस स्टेशन गंगाझरी येथे रिपोर्ट दिल्यापासून काहीच उपयोग झाला नाही लौकर मिळवून द्या व ही माहिती व्यक्तिशः उपस्थित राहून घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 13.12.2006 रोजी माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी तिरोडा यांनी चौकशी सुरु आहे अशी माहिती उपलब्ध करुन दिली. पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक

29.12.2006 रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे तिच माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 14.1.2007 रोजी चौकशी सुरु आहे असे त्यांना उत्तर देण्यात आले होते. पुन्हा 25.1.2007 रोजी जिल्हा पोलीस अधिक्षक गोंदिया/भंडारा यांच्याकडे अर्ज केलेला दिसून येतो. दि. 25.1.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 8.2.2007 रोजी मुलगी सापडली परंतु बुधराम मुन्नीलाल मौजे वय 25 वर्षे याचेसोबत पत्नी म्हणून राहात आहे. शोध घेण्याकरीता पाठवले असता साकोली गावातले लोकांना मुंबईला जातो म्हणून घर सोडून निघून गेले असे त्यांचे शेजारी प्रशात राऊत व त्याची आई ममता राऊत यांनी सांगितले. तरी त्यांचा शोध घेणे सुरु आहे असे कळविलेले दिसून येते. आता सुनावणीच्या वेळेस सदरची मुलगी सापडलेली असून ज्या मुलाबरोबर ती गेलेली होती ते पतीपत्नी म्हणून राहात आहे असे सांगितले. यावरुन अपीलकर्ता यास त्यांनी अपेक्षित केलेली माहिती ही उपलब्ध झालेली असल्यामुळे व आज अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. वास्तविक अशा प्रकारची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. एकवेळ पोलीस स्टशनमध्ये तक्रार दाखल केल्यानंतर त्या तक्रारीचा स्वतंत्रपणे पाठपुरावा करणे हे अपेक्षित असते परंतु माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदींचा असा गैरवापर करणे हे योग्य नाही.

## <u>नि र्ण य</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 27.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 467/2007.**

1) सौ. शांता रामभाऊ वावरकर
रा. साई मंदिराजवळ, तकिया वार्ड,
भंडारा ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा)
जिल्हा परिषद भंडारा

2) श्री एम. जी. वाघाये
जन माहिती अधिकारी तथा
खंडा विकास अधिकारी (उच्च श्रेणी)
पंचायत समिती मोहाडी ता. मोहाडी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

## <u>वि वे च न</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक 23/1/2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ती यांनी दिनांक 28.2.2006 रोजी वरठी ग्रामपंचायत मध्ये ''माझ्या वडील व भाऊ यांच्या नावे असलेल्या घराची माहिती (नमुना 8) नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती घेणार'' असे नमुद करुन अर्ज केलेला होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ती हिस दि. 21.4.2006 रोजी माहिती ही विलंबाने प्राप्त झाल्यामुळे दि. 2.5.2006 रोजी

खंड विकास अधिकारी यांच्याकडे पुन्हा माहिती मिळण्याकरीता नमुनापत्र ''अ'' मध्येच अर्ज केलेला दिसून येतो. परंतु पुन्हा दि. 19.6.2006 रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते तेसुध्दा नमुनापत्र ''क'' मध्ये आहे. सदरच्या अपीलाच्या संदर्भात दि. 27 जुलै 2006 रोजी दि. 31.7.2006 रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याकरीता कळविण्यात आले होते असे दिसते. दिनांक 18.8.2006 रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्राम विकास अधिकारी यांना पत्र लिहून कळविलेले दिसून येते. त्यात दि. 25.3.2006 ला रजिष्ट्री पत्राद्वारे माहिती दिल्याच्या दि. 31.3.2007 चे आपले बयानात केले आहे तरी पुराव्या दाखल रजिष्ट्री केल्याची पोष्टाची पावती या कार्यालयास सादर करावी अन्यथा आपणावर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे कळविलेले दिसते. त्यावर दि. 25.3.2006 रोजी माहिती पुरविली असे पत्र दिसून येत आहे. परंतु रजिष्ट्रीची पावती मात्र दिसून येत नाही. मात्र दिनांक 20.9.2006 रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांनी अपीलकर्ती हिस ग्राम विकास अधिकारी यांनी दि. 25.3.2006 ला रजिष्टर पोष्टाने पाठविल्याचे ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत वरठी यांनी आपले पत्रात नमुद केले असून सोबत रजिष्ट्रीची पावती सादर केली आहे. नमुद केल्यानुसार माहिती 30 दिवसाचे आंत दिल्यामुळे संबंधितावर दंडात्मक कारवाई करता येत नाही. यासंदर्भात ग्राम विकास अधिकारी यास विचारले असता त्यांनी अर्ज मोघम असल्यामुळे व अर्जामध्ये घर नंबर किंवा मालकाचे नाव नसल्यामुळे दि. 12.3.2006 रोजी जाहिरनामा काढण्यात आलेला होता व त्यावरुन पुन्हा दि. 22.3.2006 रोजी पुरुषोत्तम चिंतामणराव दहेकर यांनी माहिती देवू नये असे लिहून दिलेले दिसून येते. तरीसुध्दा दि. 25.3.2006 रोजी माहिती अपीलकर्ती हिस का पाठविली असे विचारले असता माहितीच्या अधिकारात ती माहिती पाठवावी लागते म्हणून पाठविली असे त्यांनी सांगितले. दि. 25.3.2006 च्या रजिष्ट्रीची पावती मात्र अपीलकर्ती हिच्या नावाची असून त्यावरील तारीख मात्र ओळखू येत नाही. यावरुन ही सर्व कागदपत्रे संशयास्पद वाटत आहेत व त्याची सखोल चौकशी होणे जरुरीचे दिसते. त्याकरीता खंड विकास अधिकारी यांनी ग्राम विकास अधिकारी

यांची या प्रकरणाच्या संदर्भात चौकशी करुन तसा अहवाल आयोगास सादर करणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ती हिस माहिती विलंबाने मिळालेली असली तरी अपीलकर्ती यांनीसुध्दा माहितीचा अर्ज हा मोघम लिहिलेला असल्यामुळे विलंबाचे कारण हे विचारात घेता येत नाही.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ती हिचे अपील अंशतः मंजुर करण्यात येत असून माहिती अधिकारी यांची सदरच्या वर विवेचन केलेल्या माहिती देण्याच्या संदर्भात सखोल चौकशी खंड विकास अधिकारी मोहाडी यांनी एक महिन्यात करावी व तसा अहवाल आयोगास सादर करावा.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 27.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 399/2007.**

1) श्री तुषार धनंजय मांडलेकर
सचिव,इंटरनॅशनल सोसा. फॉर रोड, ट्रान्सपोर्ट ॲन्ड सेफटी,
20, एनआयटी कॉम्प्लेक्स, हिल रोड,
गांधीनगर, नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, मधु इंदस्ट्रियल इस्टेट,
1 ला मजला, पांडूरंग बुधकर मार्ग, वरळी मुंबई 13.

2) श्री सुरेश सोनी
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त/अधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर. ..... **उत्तरवादी**

## <u>वि वे च न</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 15/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आहेत व जन माहिती अधिकारी आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 29.3.2006 रोजी श्री शरद जिचकार यांचे विरुध्द झालेली चौकशी क्र. 8458/2002 व 9516/2002 कालावधी 1.1.2001 ते 31.12.2003

या चौकशीतील कागदपत्रे व निर्णयाची प्रत टपालाने घेणार असे नमूद करुन मागितली होती. सदरच्या अर्जासोबत परिशिष्ट अ मध्ये ॲन्टी करप्शन ब्युरो बरोबर केलेल्या पत्रांची यादी दिलेली आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 17.4.2006 रोजी पोलीस उपआयुक्त/पोलीस आयुक्त ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर यांनी ''सदर कागदपत्रामध्ये गैरअर्जदाराचे (श्री शदर जिचकार) उत्पन्नाचे स्त्रोत व बचत तसेच अपसंपदा इत्यादी गैरअर्जदाराची वैयक्तिक माहिती समाविष्ट आहे. सदरची माहिती सार्वजनिक स्वरुपाची नाही. सदर प्रकारणातील कागदपत्रांचे निरीक्षण करण्यास आपणास परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार आपण या कार्यालयात उपस्थित राहून सर्व कागदपत्रांचे निरीक्षण करुन टिपणे लिहून घेतलेली आहेत व त्यावरुन सदर कागदपत्रांची मागणी केलेली आहे. तथापी आपण मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्यास व आपणाकडून सदर कागदपत्रांना सार्वजनिक स्वरुप दिले गेल्यास गैरअर्जदाराच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन होईल त्याचप्रमाणे सदर कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी संबंध नाही तसेच त्यामुळे कोणतेही व्यापक लोकहित साधले जाणार नाही. त्यामुळे सदर कागदपत्रे आपणास उपलब्ध करुन देणे समर्थनीय नाही. यास्तव आपण केलेली विषयांकीत मागणी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 8 (जे) नुसार फेटाळण्यात येत आहे.'' ''परंतु न्यायालयात किंवा इतर सक्षम प्राधिकारी यांचेकडे याचिका किंवा अर्ज दाखल केल्यास सदर कागदपत्रांची सक्षम प्राधिकरणाने मागणी केल्यास सदरची माहिती या कार्यालयाकडून सक्षम प्राधिकरणास सादर करण्यात येईल'' असेही कळविले होते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 15.6.2006 रोजी होवून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला होता व प्रथम अपील फेटाळण्यात आले होते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी श्री शरद जिचकार यांचे विरुध्द ॲन्टी करप्शन ब्युरो यांचेकडे तक्रारी केल्या होत्या. परंतु तक्रारीच्या संदर्भामध्ये जी चौकशी झालेली आहे त्या चौकशी अहवालाची प्रत त्यांनी त्यांच्या दि. 29.3.2006 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली दिसून येते. उत्तरवादी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 8 (जे) अन्वये जरी माहिती अहवालाच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्याचे नाकारले होते तरीसुध्दा अपीलकर्ता यांना कागदपत्राचे निरीक्षण करण्याचे संदर्भामध्ये दि. 29.3.2006 रोजी परवानगी देण्यात आली होती. व त्याअनुषंगने अपीलकर्ता यांनी सदरच्या कागदपत्राचे निरीक्षण केलेले दिसून येते व त्या निरीक्षणाच्या संदर्भातूनच त्यांनी हा दि. 29.3.2006 चा अर्ज केलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी स्वतः तक्रार केलेली असल्यामुळे व त्याअनुषंगाने चौकशी झालेली असल्यामुळे त्यांनी द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस केंद्रीय माहिती आयोगाने चौकशी अहवालाच्या संदर्भात दिलेले निर्णय सादर केले आहेत. दैनिक हितवाद यामध्ये दि. 15 मे 2006 रोजी केंद्रीय माहिती आयोग यांनी दिलेल्या निर्णयाची माहिती आलेली आहे व ती त्यांनी त्या माहितीचे झेरॉक्स प्रती संदर्भ म्हणून जोडलेली आहे. त्यानंतर त्यांनी केंद्रीय माहिती आयोगाचे अपील क्र. सीआयसी/डब्लूबी/अे/ 2006/00267 दि. 25.6.06, नं. सीआयसी/ओके/अे/2006/00274 दि. 15.12.2006, नं. 122/आयसीपीबी/2006 एफ. नं. पीअेबी/06/108 दि. 9.10.2006, सीआयसी/ओके/अे/2006/00548 दिनांक 7.2.2007 मिधील निर्णय संदर्भासाठी जोडलेले आहे.

परन्तु सदरचे निर्णय हा राज्य माहिती आयोगावर बंधनकारक नाहीत व प्रत्येक प्रकरणपरत्वे निर्णय तपासूनच निर्णय देणे योग्य असते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी सदरचे निर्णय हे मार्गदर्शक म्हणून स्विकारावे म्हणून ते स्विकारुन त्याचा उल्लेख केलेला आहे.

4. अपीलकर्ता यांनी स्वतः तक्रार केलेली असल्यामुळे सदरच्या तक्रारीचा निर्णय हा त्यांना मिळणे आवश्यक आहे व तक्रारीच्या निर्णयाप्रमाणे त्याबाबतची कारणमिमांसासुध्दा

मिळणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रारी साधारणतः सन 2002 ला केलेल्या दिसून येतात व त्यावरुन चौकशी पूर्ण झालेली आहे असे उत्तरवादी यांनीसुध्दा मान्य केलेले आहे. चौकशी पूर्ण झालेली असून चौकशीच्या दरम्यान कोणताही आरोप हा निष्पन्न झालेला नसल्यामुळे सदरची नस्ती बंद करण्यात आलेली आहे असे त्यांनी सांगितले. निष्कर्ष काहीही असला तरी पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने व अपीलकर्ता यांनीच तक्रार केलेली असल्यामुळे त्यांनी अहवालाची प्रत ही उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

**नि र्ण य**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून त्यांनी दि. 29.3.2006 रोजी केलेल्या माहितीच्या अर्जातील माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 8 दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 28.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 438/2007.**

1) श्री योगेश सितारामजी जोशी
रा. भामटीपूरा, दिलीप एजेंसी समोर,
वर्धा ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा

2) श्रीमती किरण मुसळे
जन माहिती अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (भूसुधार)
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा ..... **उत्तरवादी**

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12/10/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 16.3.2006 रोजी माहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे वर्धा येथील संवर्ग क्र. 17 मधील भूखंड क्र. 10–11–12/2 मोहल्ला वाणीपूरा लिज आदेशाची प्रत व नगर रचनाकार यांची एन ओ सी बद्यल कालावधी 1.6.95. सदरचा भूखंड 13/0 लगतचा आहे. आदेश क्र. (अ.का.नझूल)कावी

791/95 दि. 16.6.95 नुसार मंजुर प्रकरण एलएनडी 17/25/1985–86 जिल्हाधिकारी यांनी मंजुरी दिली आहे. प्रकरणाच्या आदेशाची सत्यप्रत नगर रचनाकारची एन ओ सी आहे किंवा नाही. श्री कन्हैय्यालाल सत्यनारायण शर्मा यांनी मंजुरी झालेली आहे अशा प्रकारची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 20.4.2006 रोजी मागणी केलेल्या माहितीसंबंधी अभिलेखाचा हया कार्यालयाचे स्तरावरुन तसेच विभागीय अधिकारी यांचे स्तरावरुन शोध घेण्यात आला होता परंतू अभिलेख उपलब्ध होवू शकला नाही त्यामुळे आपण मागणी केलेली माहिती तूर्त आपणास देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 28.4.2006 रोजी पुन्हा जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अर्जाच्या अनुषंगाने हया कार्यालयाचे पत्र क्र. अका/नझूल/कावी 2192/06 दि. 3.6.2006 अन्वये मागणी केलेला आदेश दि. 16.6.95 ची झेरॉक्स प्रत पुरविण्यात आलेली आहे. मुळ प्रकरणाचा शोध घेता आला नसल्याने नगर रचनाकार वर्धा यांच्या एन ओ सी संबंधी निश्चित माहिती कळविला येत नाही असे अपीलकर्ता यास कळविलेले आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी दि. 13.3.2006 रोजीचा जिल्हाधिकारी यांना केलेला अर्ज हा दि. 24.3.2006 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात आलेला दिसून येतो. त्यानंतर दि. 4.4.2006 रोजी जिल्हाधिकारी वर्धा, उपविभागीय अधिकारी वर्धा यांनी दि. 13.3.2006 च्या अर्जाच्या संदर्भात 3 दिवसात माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी असे पत्र दिलेले दिसून येत आहे व त्याची प्रत ही अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतु सदरची प्रत अपीलकर्ता यांनी दाखल केलेली नाही. त्यानंतर अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे केलेल्या प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा दि. 6 मे 2006 रोजी प्रभारी अधिकारी भूसूधार जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांना उद्येशून पत्र दिलेले आहे व अर्जदारास तात्काळ माहिती उपलब्ध

करुन देण्यात यावी असे कळविलेले आहे. सदरच्या पत्राची प्रतसुध्दा अपीलकर्ता यांना दिलेली आहे परंतु ही प्रतसुध्दा अपीलकर्ता यांनी दाखल केलेली नाही. त्याअनुषंगाने दि. 3.3.2006 रोजी दि. 28.4.2006 च्या अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी मागितलेला आदेश क्रमांक दि. 16 जुन 1995 ची झेरॉक्स प्रत त्यांना पुरविण्यात आलेली आहे. ती प्रत ही श्री शर्मा यांचेकडुन घेवून पुरविण्यात आली असे माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच मुळ प्रकरणाचा शोध घेण्यात येत आहे नगर रचनाकार वर्धा यांची एन ओ सी संबंधी निश्चित काही कळवता येत नाही असे त्यांना कळविलेले आहे. व अंतिमतः दिनांक 21.6.2006 रोजी त्यांना निर्णय कळविण्यात आलेला आहे. यावरुन असे दिसून येते की जिल्हाधिकारी कार्यालयातून व तत्कालीन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातून अपीलकर्ता यास माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता प्रयत्न करण्यात आलेले आहेत. माहिती उपलब्ध करुन न देणे किंवा माहिती देण्याची टाळाटाळ करणे अशा प्रकारचा निष्कर्ष त्यावरुन काढता येत नाही. माहिती अधिकारी यांनी दि. 19.9. 2007 रोजीसुध्दा नगर रचनाकार वर्धा यांचेकडे माहिती उपलब्ध असल्यास मिळवून देता येईल या उद्येशाने पत्र दिलेले दिसून येते व सदरच्या पत्राच्या अनुषंगाने दि. 24.9.2007 रोजी विषयांकित प्रकरणी संदर्भित पत्रान्वये शिट क्र. 17 भूखंड क्र. 13/0 मधील श्री कन्हैयालाल सत्यनारायण शर्मा यांच्या नावाचे जागा मंजुरी संबंधिचे प्रकरण कार्यालयाने अभिलेखामध्ये आढळून येत नाही त्यामुळे या प्रकरणामध्ये या कार्यालयाने जागा मंजुरीबाबत केलेल्या शिफारसपत्राची प्रत पुरवता येणे शक्य होत नाही असे कळविलेले दिसून येत आहे. आता सुनावणीच्या वेळेस सुध्दा निवासी उपजिल्हाधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी सदरची माहिती उपविभागीय अधिकारी यांचेकडूनसुध्दा मिळविण्याचा प्रयत्न केला होता परंतु कार्यालयात सुध्दा श्रीयुत शर्मा यांचे संदर्भातील प्रकरण आढळून येत नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे जाणूनबुजून अपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे आणि या प्रकरणात

जिल्हाधिकारी (नझूल) यांनी प्रकरण शोधात येवून दिसत नाही असे म्हणण्यानुसार यांनी प्रकरण नष्ट करण्यात आलेले आहे असे दिसून येत आहे हे म्हणणे झालेल्या पत्रव्यवहारावरुन बरोबर नाही असे दिसून येते. नष्ट करण्यात आलेले असेल तर त्याबाबत चौकशी झाल्याशिवाय निर्माण करण्ता येणार नाही. अपीलकर्ता यांनी फक्त त्यांच्या म्हणण्याप्रमाणे निर्णय दिला पाहिजे असा त्यांचा आग्रह दिसतो व त्यामुळे निर्णय देत असतांना ते बाहेर निघून गेले आहेत. असे असल्यामुळे अपीलकर्ता यांचा मुळ हेतू हा वेगळाच दिसून येत आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वाप्रमाणे व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे चौकशी करुनच निर्णय द्यावा लागतो. अपीलकर्त्याच्या स्वतःच्या समजूतीप्रमाणे निर्णय देता येत नाही. ना हरकत प्रमाणपत्र द्यावे लागते किंवा नाही दिले किंवा नाही याबद्यल अपीलकर्ता याची निश्चित माहिती नाही. माहिती अधिकारी व जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातून प्रकरणाचा शोध घेतला असे जरी दिसत असले तरी पुन्हा सदरच्या प्रकरणाचा कसून शोध घेता येईल व तशा प्रकारे स्वतः अपीलकर्ता यांनी सदरच्या कार्यालयात जावून माहिती अधिकारी यांचेकडे रितसर अर्ज देवून माहिती अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय तसेच नगर रचनाकार यांचे कार्यालय या कार्यालयामध्ये अपीलकर्त्या बरोबर नायब तहसिलदार यांची नियुक्ती करुन सदरच्या प्रकरणाचा शोध घेवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे हा एक कलम 18 आणि 19 च्या तरतुदीप्रमाणे मार्ग आहे. व त्या दृष्टीने अपीलकर्ता याचें अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून संबंधित माहिती अधिकारी यांना अपीलकर्ता यांनी तारीख व वेळ कळविल्यावर एक नायब तहसिलदाराची नियुक्त करुन अपीलकर्ता व नायब तहसिलदार दोघांनी मिळून त्यांचे कार्यालयातील अभिलेख्यांमध्ये व उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात व नगर रचनाकार वर्धा यांचे कार्यालयात श्री कन्हैयालाल सत्यनारायण शर्मा

यांचे संबंधातील संबंधित नस्तीचा शोध घेवून त्यातून अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेले ना हरकत प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास त्याची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 1 महिन्यात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावे.

2) अपीलकर्ता यांनी सुध्दा सदरच्या अभिलेख्याच्या संदर्भात निरीक्षण करण्याच्या करीता माहिती अधिकारी यांना तारीख व वेळ कळविण्यात यावी व त्याप्रमाणे कारवाईच्या नंतर वरील एक प्रमाणे माहिती अधिकारी यांनी कारवाई करावी.

3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 28.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 440/2007.**

1) श्री संदिप दयारामजी वरु
द्वारा मोटर प्रोव्हीजन, भामटीपुरा,
वर्धा ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त प्रादेशिक संचालक
नगर पालिका प्रशासन
आयुक्त कार्यालय नागपूर

2) श्री एस. एम. नांदा
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर परिषद वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

## वि वे च न

अपीलकर्ता यांनी दिनांक 23/10/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 31.3.2006 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे एकुण 8 मुद्यांवर माहिती मागितलेली होती.

1) नगर परिषद, वर्धा च्या मिलकीयत (प्रॉपर्टी) बाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी साधारण सभेत किंवा स्थायी समितीची मंजूरी घेणे किंवा स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे का?

2) जिल्हाधिकारी वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली जलतरण तलाव बाबत चर्चा करुन घेण्यात आलेले निर्णय न.प.वर्धाच्या नियमान्वये किती योग्य आहे?

3) सदर चर्चा वर घेण्यात आलेल्या निर्णयाला न.प.च्या स्थायी समितीत किंवा साधारण सभेत पारीत करुन घेण्यात आले काय?

4) जर पारीत करुन घेण्यात आले नसेल तर त्याची कारणे काय?

5) जिल्हाधिकारी वर्धा यांचे अध्यक्षतेत खालील सभेत न.प.च्या तरण तलाव ज्या संस्थेना देण्यात आला त्या सभेची प्रोसीडींगची सत्यप्रत, व सदर सभेत उपस्थित न.प.चे स्थायी समितीचे सदस्यांची नावे देण्यात यावी.

6) न.प.वर्धा व पोलीस वेलफेअर वर्धा यांच्यामध्ये तरण तलावाबाबत करार झाला आहे काय? केले असेल तर त्याची सत्यप्रत देण्यात यावी, केले नसेल तर त्याची कारणे काय?

7) तलावाबाबतचे दस्तऐवज (फाईल) चे निरीक्षण करु देण्यासाठी तारीख व वेळ निश्चित करुन त्याप्रमाणे मला कळवावे.

8) न.प.च्या माहिती अनुसार पुर्वी 10 रु. शुल्क आकारण्यात (दैनिक शुल्क) येत होता. आता सदर संस्थेकडून कोणताही दैनिक शुल्क नसून फक्त मासिक अधवार्षिक तिमाही व वार्षिक शुल्कस आकारण्यात येत आहे. सर्व साधारण जनतेला हे शुल्क परवडणारे दिसून येत नाही व त्यामुळे सर्व साधारण जनता याचा लाभ घेवू शकत नाही. असे न.प. ला वाटत नाही का? वरील मागणीसाठी लागणारे खर्च मी करण्यास तयार आहे. ही माहिती अत्यंत महत्वाची असून तो लोकहिताच्या दृष्टीने माहिती अधिका–याच्या कायदा खाली लवकरात लवकर पुरविण्यात यावी.

सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी दि. 2.5.2006 रोजी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे

असे दिसून येते. ज्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध नाही ती माहिती उपलब्ध झाल्यानंतर पुरविण्यात येईल असेही म्हटलेले आहे. व त्याप्रमाणे दि. 8.5.2006 रोजी माहिती पुन्हा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 7.6.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.7.2006 रोजी दिलेला असून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा कायम केलेला असून अपील निकाली काढण्यात आलेले आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 31.3.2006 च्या अर्जामध्ये ज्या 8 मुद्यांवर माहिती मागितलेली आहे त्या 8 मुद्यांपैकी काही माहिती ही प्रश्नाच्या स्वरुपात अभिप्रायात्मक अशी मागितलेली आहे व काही माहिती ही अभिलेखे व दस्तऐवजाच्या स्वरुपात मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) व (त्र) प्रमाणे ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या संज्ञांची व्याख्या केलेली आहे. ''माहिती'' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, दस्तऐवज किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील माहिती अशा प्रकारची माहिती ही ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सुध्दा सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली माहिती ही दस्तऐवज, अभिलेखे यांच्या स्वरुपात किंवा टिपण्या किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरुपात माहिती ही उपलब्ध करुन देता येते. दोनही संज्ञांच्या व्याख्येमध्ये ज्या प्रश्नामधून माहिती अधिकाराचे अभिप्राय अपेक्षीत आहे किंवा कायद्याच्या निकषावर नियमितता किंवा अनियमितता या बाबत प्रश्न विचारलेले असतील तर त्या प्रश्नांची उत्तरे ही अपेक्षित नाहीत. माहिती अधिकारी हा सार्वजनिक प्राधिकरणातील जी माहिती आहे त्या माहितीचा परिरक्षक असतो. माहितीच्या प्रकरणातील निर्णय प्रक्रियेतील तो कर्मचारी, अधिकारी असेलच असे नाही व त्यामुळे त्या प्रकरणातील अनियमिततेबाबत कारणमिमांसा त्यांच्याकडून अपेक्षित करता येत नाही. व त्यामुळेच प्रकरणातील कारवाईच्या संदर्भाचा अंतर्भाव हा ''माहिती'' व ''माहितीचा'' अधिकार या व्याख्येत

केलेला दिसून येत नाही. ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल ती उपलब्ध झाल्यानंतर त्या माहितीच्या आधारे अर्जदारास काही तक्रार असल्यास ती तक्रार त्यांनी त्या त्या प्राधिकरणाच्या संदर्भात जे अधिनियम अस्तित्वात असतील त्या अधिनियम किंवा नियमाच्या अनुषंगाने संबंधित अधिका–याकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेणे ही संकल्पना आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात माहिती अधिकारी यांनी अर्ज आल्या नंतर दि. 1.4.2006 रोजी श्री सुधीर खसेले नगर अभियंता बांधकाम विभाग नगर परिषद यांनी पत्र लिहून तरणतलावाच्या माहितीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे तसेच अपीलकर्ता यांना तरणतलावाची फाईल तपासणीसाठी परवानगी देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते व त्याची प्रतिलिपी ही अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. व त्यामुळे त्यानंतर जी माहिती मिळालेली आहे ती दि. 2.5.2006, 8.5.2006 या दोन तारखांना कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. परंतु अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की माहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात सभा झाली अशी माहिती दिलेली आहे व प्रत्याक्षात अशाप्रकारची सभा जिल्हाधिकारी कार्यालयात झाली नाही याबद्यल जिल्हाधिकारी कार्यालयाने म्हटले आहे व तो पुरावासुध्दा त्यांनी दाखल केलेला आहे. व त्यावरुन त्यांचे म्हणणे असे आहे की सदरची माहिती ही खोटी माहिती दिलेली आहे. माहितीच्या अधिकारात वर नमुद केल्याप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार करुन त्याबाबत तात्कालीन माहिती अधिकारी यांचे विरुध्द तक्रार करता येईल. तसेच जिल्हाधिकारी यांनीसुध्दा तात्कालीन माहिती अधिकारी यांचे संदर्भामध्ये चौकशी करुन त्याबाबतचा नियमाप्रमाणे निर्णय घेणे योग्य ठरेल. अपीलकर्ता यांचे म्हणणे असेही आहे की माहिती ही खोटी दिली असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या प्रमाणे आयोगास शास्ती लादणे आवश्यक राहिल. परंतु या संदर्भात वर नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र नगर परिषदा अधिनियमाप्रमाणे सक्षम अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी हे असल्यामुळे त्याबाबतची कारवाई करणे योग्य

ठरेल किंवा नगर परिषदेच्या आमसभेमध्ये त्याबाबतचा प्रश्न उपस्थित करणे हे नियमानुसार ठरेल. अपीलकर्ता यांचे म्हणणे असेही आहे की सदरचा तरणतलाव हा पोलीस कल्याण समिती यांचेकडे हस्तांतर केलेला असल्यामुळे व त्यांनी जे शुल्क आकारलेले आहे ते शुल्क मासिक, अर्धमासिक, तिमाही व वार्षिक शुल्क हे सर्वसाधारण जनतेला परवडणारे दिसून येत नाही व त्यामुळे सर्वसाधारण जनता त्याचा लाभ घेवू शकत नाही त्याकरीता सर्वसाधारण जनतेला परवडेल अशा प्रकारचे शुल्क आकारण्यात यावे अशी त्यांची अपेक्षा आहे. परंतु अशा प्रकारचे आदेश हे राज्य माहिती आयोगास देण्याचा अधिकार नसल्यामुळे त्यांनी हा प्रश्न योग्य त्या समितीकडे उपस्थित करुन त्याबाबतचा फेरनिर्णय करुन घेणे योग्य राहिल.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 31.3.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) जिल्हाधिकारी कार्यालयात सभा झालेली आहे अशा प्रकारची माहिती तात्कालीन माहिती अधिकारी यांनी दिलेली असल्यामुळे सदरचे बाबत जिल्हाधिकारी यांनी चौकशी करावी व योग्य ती कारवाई ही तात्कालीन माहिती अधिका–याच्या विरुध्द करावी व तसा अहवाल आयोगास सादर करावा.
3) सदरच्या निर्णयाची प्रत ही जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे पोष्टाने पाठविण्यात यावी.
4) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 28.9.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.